


# आदिवासी संस्कृती व विकास

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

# हाकारा

ऑक्टोबर - डिसेंबर २००९

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ

### २००७ – २०१०

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष व संस्थापक | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| उपाध्यक्ष | : | डॉ. हेमंत आपटे |
| कोषाध्यक्ष | : | ग. शां. पंडित |
| सचिव | : | डॉ. अभय कुदळे |
| सहसचिव | : | सज्जु जोसेफ |
| सदस्य | : | डॉ. रजनीकांत आरोळे |
| | | डॉ. चंद्रकांत पांडव |
| | | डॉ. सुभाष वाळींबे |
| | | डॉ. राम गंभीर |
| | | जयवंत मंत्री |
| | | डॉ. बाबुल पठाण |
| | | डॉ. कल्पना मुटाटकर |
| | | विदुला पुरोहित |

कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ।।
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
रामचंद्र मुटाटकर

# हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
ग. शां. पंडित

वर्ष : ३० वे | ऑक्टोबर-डिसेंबर २००९ | अंक : चौथा

## अनुक्रमणिका

संपादकीय २

आदिवासी परंपरा व संस्कृती - वाहरु सोनवणे ५

हिंगोली जिल्ह्यातील आंधांचे लोकसाहित्य - प्रा. राजेश धनजकर ११

ग्रामीण विकासनीती - मिलिंद बोकील १५

आदिवासी धोरणाचा पर्यायी समुदा २३

अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत जंगलवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम २००६ ३७

जमातीतील जोडीदाराची निवड - प्रा. साधना बी. जावळे ४६

• **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
टेलिफॅक्स (०२०)२५८९७२९८

अंक मूल्य ४०/- रूपये

• **अक्षर जुळणी**
नंदू हि. दिघे

• **मुद्रण स्थळ**
ओम एंटरप्राईजेस, पुणे

• **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

• **मुखपृष्ठ छायाचित्र**
आदिवासी उत्थान कार्यक्रमाच्या
कार्यक्षेत्रातील छायचित्रे

**या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

## संपादकीय

# ‘आदिवासी संस्कृती व विकास’

‘हाकारा’ चा ३० व्या वर्षातला हा वर्षअखेरीचा अंक आपल्या हाती देताना आनंद होत आहे. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने ३५ व्या वर्षाच्या दिशेने वाटचाल सुरु केली असताना ‘हाकारा’ नियतकालिकाने देखील ३० वर्षांचा टप्पा पार केला आहे. म्हणजे ‘हाकारा’ ची तीन दशकांची वाटचाल अव्याहतपणे चालू आहे. आणि म्हणूनच प्रत्येक अंकाची निर्मीती आमच्यादृष्टीने आनंददायीच आहे.

‘हाकारा’ चा प्रत्येक अंक विशेषांक असतो, तसाच हा अंक देखील ‘आदिवासी संस्कृती व विकास’ विषयावर आधारीत आहे. सुप्रसिध्द आदिवासी कवी व सामाजिक कार्यकर्ते श्री. वाहरु सोनवणे यांना ‘आदिवासी परंपरा व संस्कृती ’ या लेखातून आदिवासींच्या वैशिष्टयपूर्ण जीवन-संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. आदिवासींचे जीवन हे समूहप्रधान असून त्यांच्या जीवनातील प्रत्येक टप्प्यावर, सण-उत्सवात, लग्न, मृत्यू इत्यादी गोष्टींत सामूहिकतेचा अनुभव येतो. आदिवासी संस्कृतीची नीतीमूल्ये निसर्गवादी, विज्ञाननिष्ठ व उच्चप्रतीची वस्तुनिष्ठ आहेत. आदिवासींत वर्णभेद किंवा चातुवर्ण्य व्यवस्था नाही. चोरी, लुटमार, भीक मागणे, फसवणूक करणे, आत्महत्या करणे त्यांच्या धर्मसंस्कृतीत मान्य नाही. त्यांच्या सण-उत्सवाच्या, जन्म-मरणाच्या, लग्नाच्या परंपरा वैशिष्टयपूर्ण आहेत. त्या त्यांच्या जीवन व्यवहारातून, समूह जीवनातून दिसून येतात. वाहरु सोनवणे म्हणतात त्याप्रमाणे आदिवासी संस्कृती मानवी मूल्यांनी कितीतरी प्रगल्भ आहे. असे असताना देखील आदिवासी संस्कृती मागास, अंधश्रध्दाळू, रानटी, अडाणी आहे, अशी अवहेलना, घृणा, तिरस्कार का? असा प्रश्न वाहरु विचारतात.

आदिवासींना मूळ प्रवाहात आणण्याचा प्रयत्न देखील चालू आहे. पण ‘मूळ प्रवाह’ म्हणजे नेमका कोणता? असाही प्रश्न उपस्थित होतो. कारण आदिवासींमध्ये समूहाला, समानतेला फार महत्व दिलेले आहे. हुंडयाची प्रथा आदिवासींत नाही, नवऱ्याला देव मानून आयुष्यभर बाईने छळ सहन करण्याची प्रथा त्यांच्यात नाही. श्रमाला प्रतिष्ठा देणारी संस्कृती आहे. त्यांचे सर्व व्यवहार केवळ विश्वासावर होतात. मुलींना जोडीदार निवडण्याची मोकळीक आहे. बलात्कारासारखा हीन प्रकार त्यांच्यात नाही, म्हणजे भोगवादी संस्कृती नाही. स्त्री-भृण हत्या नाही. मग एवढे सगळे आदिवासी संस्कृतीत असताना मुख्य प्रवाहातील संस्कृतीत यातले काय आहे? खरेतर आदिवासी संस्कृतीच्या प्रवाहानेच मुख्य प्रवाह स्वच्छ करण्याची वेळ आली आहे, असे म्हणावे लागेल.

साहित्य हे संस्कृतीचे वाहक आहे. संस्कृती परिवर्तनाचा तो आरसा आहे. म्हणूनच त्या त्या समाजाच्या साहित्यात त्या संस्कृतीचे दर्शन घडत असते. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने आदिवासींमधील लेखक-कवींना प्रोत्साहन देण्यासाठी

'हाकारा' कायमचे व्यासपीठ दिले आहे. बरेचवेळा कार्यशाळांचे आयोजन करुन मार्गदर्शन केलेले आहे. 'समानतेवर आधारलेली आदिवासींची संस्कृती शाबूत ठेवून जतन करण्याचा विचार आणि आदिवासी मुक्ती, मानव मुक्तीचा विचार ज्या ज्या साहित्य चळवळीत आहे त्या त्या साहित्य चळवळीशी आमचे नाते मैत्रीचे राहील.' हे साहित्य विषयक धोरण परिषदेचे राहिले आहे. आणि म्हणूनच आदिवासींमधून प्राथमिक स्वरुपाचे लेखन करणाऱ्यांचे साहित्य 'हाकारा' तून प्रकाशित केले जाते.

आदिवासींचे साहित्य विषयक वा विकासाचे धोरण असो या सर्वांवरच परिषदेने कायम व्यापक चर्चा घडवून आणली आहे. दिनांक ८ व ९ मे २००४ रोजी 'प्रयास' संस्थेच्या सहकार्याने परिषदेने 'आदिवासी विकास धोरणाच्या मसुद्याच्या' अनुषंगाने एक चर्चासत्र आयोजित केले होते. आदिवासींच्या विविध प्रश्नांवर व्यापक विचार विनिमय होऊन राष्ट्रीय विकास धोरणाच्या मसुद्यासाठी मार्गदर्शक सूचना मांडल्या जाव्यात या उद्देशाने चर्चासत्र होते. 'हाकारा'ने २००४ मध्ये 'आदिवासी विकास धोरण' या विषयावर अंक देखील प्रकाशित केला आहे. या मसुद्याचे स्वरुप विशद करणारे टिपण या अंकात दिले आहे. त्यातून आपल्या लक्षात येईल की, मसुद्यात नेमके कोणत्या मुद्यांना स्थान दिले आहे. या मसुद्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत विकासाचा मुद्दा विचारात घेतला गेलेला नाही. आदिवासींचे परंपरागत स्वशासन नवीन पंचायत राज्य व्यवस्थेत देखील मान्य केले आहे; परंतु केंद्रीय मसुद्यात त्याचा समावेश आढळत नाही.

आदिवासींची वनजमिनींवरील मालकी हा देखील विकास धोरणाचाच एक भाग आहे. आज आदिवासी वस्ती असलेल्या विभागातील बहुतेक जमिनी आदिवासींच्या मालकीच्या होत्या व ते त्या कसत होते. परंतु ब्रिटीश राजवटीपूर्वी त्या नोंदी पध्दतशीरपणे ठेवल्या गेल्या नाहीत. आणि म्हणूनच आज आदिवासी भूमीहीन झालेले दिसतात. वनजमिनींवरील आदिवासींची अतिक्रमणे हटविणे व त्यासाठी हातातोंडाशी आलेली पिके नष्ट करणे यांसारखे अतिरेकी उपाय दरवेळेस योजिले गेले. परंतु ही अतिक्रमने रीतसर करुन जमिनीची मालकी ती कसणाऱ्यांना द्यावी असा कायदा इतक्या वर्षात होऊ शकला नाही. संस्था-संघटनांचे आंदोलनाचे पडसाद विधान सभेत उमटू लागल्याने दरवेळेस शासनाने अतिक्रमणे रीतसर करण्यासाठी आदेश काढले; परंतु ते विशिष्ट जिल्ह्यांपुरते मर्यादित राहिले.


२००५ मध्ये केंद्रशासनाच्या आदिवासी मंत्रालयाने आदिवासींची वनजमिनींवरील अतिक्रमणे नियमित करणाऱ्या विधेयकाचा मसुदा 'अनुसूचित जमाती व अन्य-परंपरागत जंगलवासी (वनअधिकार मान्यता)' या नावाने प्रसिध्द केला. पुढे हे विधेयक संसदेत मान्य होऊन - २९ डिसेंबर २००६ रोजी राष्ट्रपतींनी त्यावर सही करुन मंजूर केले. आदिवासींच्या दृष्टीने हे विधेयक अतिशय महत्त्वाचे आहे. या अंकात या मंजूर कायद्याचे मराठी भाषांतर दिलेले आहे.

आदिवासींच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयांवर आधारीत या अंकावरील आपल्या प्रतिक्रियांचे आम्ही स्वागत करु.

*संपादक*



# हार्दिक अभिनंदन !



**माननीय श्री. माणिकरावजी गावीत**
खासदार तथा माजी गृहराज्य मंत्री,
भारत सरकार

**मा. ना. श्री. पद्‌माकर वळवी**
राज्यमंत्री आदिवासी विकास व कामगार,
महाराष्ट्रराज्य तथा पालकमंत्री, नंदूरबार जिल्हा

*आपण नंदूरबारमधून सलग नऊ वेळा लोकसभेचे सदस्य (खासदार) म्हणून विजयी झालात. एक सुस्वभावी, निगर्वी व कार्यक्षम खासदार म्हणून आपला नावलैकिक नंदूरबारमधील आदिवासी जनतेत व लोकसभेतही आहे. एक निष्ठावंत व्यक्ती म्हणून आपणास भारताचे गृहराज्य मंत्रीपद देखील मिळाले आहे.*

*आपल्या सलग ९ वेळा निवडून येण्याच्या विक्रमाबद्दल आपले हार्दिक अभिनंदन व पुढील कारकीर्दीस मनःपूर्वक शुभेच्छा.*

*आपण संस्थेचे १९९१ ते २००३ या कालावधीत कार्यकारी सदस्य होता. एक तळमळीचा व झुंजार तरुण कार्यकर्ता म्हणून आपली महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात आदिवासी विकास व कामगार खात्याचे राज्यमंत्री म्हणून निवड झाली. नंदूरबार जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणूनही आपली निवड झाली. आमच्यादृष्टीने ही अत्यंत आनंदाची बाब आहे.*

*आपल्या मंत्रीपदाच्या निवडीबद्दल आपले हार्दिक अभिनंदन व पुढील कारकीर्दीस मनपूर्वक शुभेच्छा.*

**अध्यक्ष व कार्यकारी मंडळ, संपादक मंडळ, 'हाकारा'**
**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**

# आदिवासी परंपरा व संस्कृती

**वाहरु सोनवणे**

आदिवासी संस्कृती हा जीवनाचा पाया मानून आदिवासी आपले जीवन जगत आहे. अनादी काळापासून आदिवासी श्रम, समूह आणि सहकार्य याच मानवी जीवनमूल्यांच्या आधारे आपले जीवन जगत आहे. आजही आदिवासींच्या जीवनातील प्रत्येक हालचाल किंवा जीवन व्यवहार श्रम, समूह आणि सहकार्य याच्याच आधारे होत असते. होत आहे. सण, उत्सव, मरण-धरण, लग्न-विवाह, समूहनाच-समूह गीत, सहकार्यावर आधारीत लाहे ची शेती परंपरा, गावात गाव पंचाद्वारे न्याय-निवाडा, हिरवा, गाव दिवाळी, होळी इत्यादी प्रसंगी सामूहिक पूजा विधी, अशा प्रकारे आदिवासींचे जीवन समूहप्रधान आहे.

आदिम अवस्थेत आदिवासी टोळी करुन समूह जीवन जगत होता. आदिम काळात आदिवासीला अन्न शोधायचे असेल किंवा शिकारीला जायचं असेल तरी हिंस्त्र-समूहानेच जावे लागत असे. एखाद्या प्राण्यांपासून संरक्षण करायचे असेल किंवा प्रतिकार करायचा असेल तर टोळी या समूहानेच प्रतिकार करु शकत होता. थोडक्यात म्हणजे त्या काळात आदिवासींचे सुख-दु:ख, सारे जीवन समूहात एकवटलेले होते. त्याकाळात आदिवासीला समूहाशिवाय जीवनच नव्हते.

आदिवासी समाजात आज समूह जीवनाचे अनेक पैलू आहेत. ते लक्षात घेतले तर आदिवासी संस्कृती मानवी मूल्यांनी किती प्रगल्भ आहे याची प्रचिती येईल.

१) आदिवासीत 'लाहे'ची परंपरा आहे. या परंपरेत एखाद्या आदिवासीचे घर बांधायचे असेल किंवा शेत नांगरायचे असेल तेव्हा अशा आदिवासी गावात 'लाहे' बोलवतो. 'लाहे' बोलावल्यावर गावातील आदिवासी स्वत:चे काम बाजूला सारुन ते 'लाहे' (मदतीला) जातात. दिवसभर ते लाहे बोलावणाऱ्या आदिवासींचे विनामोबदला काम करतात. घर बांधतात किंवा शेती नांगरतात. या कामाची मजुरी घेत नाहीत. ही सहकार्याची परंपरा आदिवासी समाजात अजून अस्तित्वात आहे.

२) आदिवासी गावात भांडण-तंटा झाला किंवा एखादा प्रश्न उद्भवला तर त्याचा न्याय निवाडा करण्यासाठी किंवा त्या प्रश्नासंबंधी विचार करण्यासाठी गावात पंच बसतात आणि सामूहिकरित्या पंचांच्याद्वारे न्याय- निवाडा होतो. गावाच्या प्रश्नाच्या बाबतीत सामूहिक विचार-विमर्श होतो.

३) आदिवासी लग्न कार्यक्रमात कोणी मोठा लहान असा भेदभावपूर्ण व्यवहार नसतो. लग्नाच्या मंडपात अंथरलेल्या पट्टीवर सर्व समान असतात आणि सर्व सन्मानाने बसतात.

४) आदिवासी गावात कुणी मेले तर सारा गाव त्या दु:खात सहभागी होतो. त्या दिवशी गावात कुणीही पाणी भरत नाही. चूल पेटवत नाही आणि अंगणही झाडत नाही. पण इतर जातीत किंवा शहरात असे दिसून येते की शेजारी कुणी मेले तरी शेजारी दरवाजा बंद करुन जेवन करतो तर काही-काही व पक्वाने-अन्न तळून खातात. यात मानवता कोणत्या संस्कृतीत आहेत, ते लक्षात घ्यायला पाहिजे.

५) आदिवासी लग्न व्यवहारात आदिवासी प्रधान (आदिवासींचे लग्न लावणारा) लग्न मंडपात उभा राहून पंचा मध्ये आहेर करताना विचारतो-उच्चारतो देखा पंचस्वन, वडगाववाला रुमाल्या नाईक, बहिनी करता, देड सो रुपयांनी, साडी लिवनास, कबूल ?

लग्न मंडपातले बसलेले पंच 'कबूल' असा होकार जाहीर करतात तेव्हा ते बजवत असलेला आहेर स्वीकारले जातो म्हणजे आदिवासींचा प्रधान आहेर स्वीकारताना पंचांची संमती घेतो. म्हणजे आमच्या लग्न व्यवहारात लोकशाही आहे. तर ब्राम्हणी लग्न व्यवहारात ब्राम्हण लोकांना न समजणारा श्लोक म्हणतो आणि येथे पैसे ठेव-तेथे पैसे ठेव इथे पाणी सोड, तिथं पाणी सोड, यांच्या पाया पड, त्याच्या पाया पड अशातऱ्हेने हुकूम सोडत असतो. आदिवासी प्रधान सारखा पं·ाची लोकांची सहमती घेत नाही. इथे आपण लोकशाहीवर विश्वास ठेवणारी लग्न पध्दती ठेवायची की, हुकुम शाहीवर आधारलेली वर्चस्ववादी मूल्य जपणारी लग्न पध्दती ठेवायची याचा विचार केला पाहिजे.

६) आदिवासींमध्ये अशी परंपरा आहे की, बाळंतपण झाल्यावर आई मेली तर राहिलेल्या मुलाला संगोपन करण्याची जबाबदारी गावातील आदिवासी मसाज स्वीकारतो. त्या गावात लहान मूलवाली बाई असेल तर ती आपल्या मुलासारखंच त्या मुलाला दूध पाजते. गावात अनेक बाया असतील तर आळी-पाळीने त्या मुलाला दूध पाजतात किंवा कुणीच लहान बाळबाली बाई नसेल तर त्याच्याकडे गाय-बकरी आहे ती विनामूल्य त्या बाळासाठी दूध पुरवतात. पण इतर जातीतल्या समाजात अशी परंपरा नाही आणि त्या बाळासाठी दूध घ्यायला गेले तरी पैसे मोजावे लागतात.

७) आदिवासी समाजात लग्न किंवा मृत्यू किंवा उत्तर कार्याचा कार्यक्रम होत असेल तिथं कोणी पाणी भरताना, लाकडे फोडताना किंवा बिड्या वाटतांना दिसत असेल की, समजायचे, तो त्या घरचा जावई आहे.

आदिवासींमध्ये अशी परंपरा आहे की अशा प्रसंगी जावयाला लाकडे फोडणे, पाणी भरणे, बिड्या वाटणे इत्यादी कामे सोपवतात आणि हे काम जावई आनंदाने स्वीकारतात. एवढेच नाही तर चुकून एखाद्या जावयाला काम सोपवले गेले नसेल तर तो जावई रुसून बसतो. कुणी विचारले तर तो रुसलेला जावई म्हणतो ''मी काय त्याचा जावई आहे का?'' असे म्हणून राग व्यक्त करतो. थोडक्यात अशाप्रसंगी अंग मेहनतीचे काम करणे प्रतिष्ठेचे मानले जाते. थोडक्यात आदिवासी समाजामध्ये श्रमाला प्रतिष्ठा आहे. तर इतर जातींमध्ये लग्नात जावयाला आदर सन्मानाने बसवले पाहिजे अशी परंपरा आहे. लग्नाच्या पहिल्या पंक्तीत जेवायला बसवले नाही तर तो रुसून बसतो.

८) आदिवासीत लग्न झाल्यावर आदिवासी मुलगी नवऱ्याला देव मानत नाही. तर सुख-दुखात, आनंद उत्सवात जीवनसाथी म्हणून स्वीकारते. जर का नवऱ्याने बायकोला खूप त्रास दिला, दीर-जेठ-सासू-सासरे यांचाही छळ व्हायला लागला, तर ती आदिवासी मुलगी नवऱ्याच्या धन-संपत्तीला बघून किंवा चांदी-सोने किंवा हवेलीला बघून झिजून-झिजून जगणे तिला जमत नाही किंवा जीवावर आलीच तर आत्महत्याही करत नाही. खूप त्रास झाला तर अशा अमानुष जीवनाला कंटाळून आदिवासी स्त्री अशा नवऱ्याला ''चल फूट'' म्हणत सोडून निघून जाते आणि आवडीचा मुलगा शोधते आणि त्याच्या सोबत जीवन साथी म्हणून नांदते आणि संसार करते. या प्रकाराला समाज तिला बहीष्कृत करत नाही, तर तिला आपल्यात सामावून घेतात. थोडक्यात अदिवासीत इतरांसारखी आत्महत्या करण्याची परंपरा नाही, हे समजून घेतले पाहिजे.

९) आदिवासी समाजात इतरांप्रमाणेच देवाण घेवाणाचा व्यवहार होतो. एखादी वस्तू गहाण ठेवायची असेल तेव्हा पाच पंचांना बोलवून बसतात या पंचात जो व्यवहार होतो. तो असा ''तुझा विश्वास माझ्यावर माझा विश्वास तुझ्यावर'' बस. पण इतरांमध्ये तसे

नाही. इतरांमध्ये वस्तू गहाण ठेवण्याचा व्यवहार होतो. त्यांच्यातही पंच बसवतात, पण त्यांचा व्यवहार "तुझा विश्वास माझ्यावर आणि माझा विश्वास तुझ्यावर" अशा करार होत नाही. ते करार झाल्यावर लगेच स्टॅम्पपेपरवर लिहून घेतात. इथं हे लक्षात घ्यावे की, आदिवासी जीवनातील वस्तू गहाण ठेवण्याची परंपरा म्हणजे 'माणसावर माणूस म्हणून विश्वास ठेवणे' तर इतरांची परंपरा माणसांवर माणूस म्हणून विश्वास न ठेवणारी परंपरा असून कागदावर किंवा स्टॅम्प पेपरवर विश्वास ठेवणारी परंपरा आहे. माणसावर माणूस म्हणून विश्वास ठेवणारी संस्कृती चांगली की, कागदावर विश्वास ठेवणारी संस्कृती चांगली इथं याचा विचार व्हावा.

१०) आदिवासींची सौंदर्याची कल्पना श्रम-केंद्रीत आहे. लग्नाची नवरी काळी असली तरी श्रम करणारी आहे किंवा नाही याचा विचार केला जातो. काळ्या रंगाची काळ्या जमिनीशी तुलना करतात. काळ्या मातीत चांगले पिकते, भुऱ्या मातीत पिकते का ? असा प्रश्न करत नवरी निवडताना श्रमाला केंद्रीत करतात. श्रमाला प्रतिष्ठा देत सौंदर्याची समज विकसित करत असतात. आदिवासीत हातावर, कपाळावर, गालावर गोंदणे म्हणजे आपल्या सौंदर्याची खूण समजतात. निसर्गावर आधारीत जीवन जगणारे आदिवासी नैसर्गिक साधनां पासून उदा. फुलांपासून फुलहार, गजरा इ. चा उपयोग करुन आदिवासी आपला शृंगार करत असतात. आदिवासी मुलं-मुली चांदीचे दागीणे, रंगीबेरंगी पोषाकाने सजत असतात.

११) इतर समाजात मेळावे भरवून वधू-वर निवडण्याच्या कार्यक्रमाबाबत आज मोठे कौतुक केले जात आहे. पण आदिवासी समाजात वधू-वर निवडण्याची परंपरा आपल्या जीवनात किती सहज होणारी बाब आहे, हे समजून घ्यायला पाहिजे. उदा. होळीच्या आणि भोंगऱ्या बाजाराच्या अगोदर येणारा बाजार म्हणजे गुलाल्या बाजार. या बाजारात आदिवासी तरुण मुलं-मुली रंगबेरंगी पोषाखात दाग-दागिने सजून मोठ्या उत्साहाने बाजारात येतात. वेगवेगळ्या गावच्या मुलं-मुली आपल्या सोबत्याचे गट करुन बाजारात मोठ्या झोकात फिरत असतात. या बाजारात मुलं-मुली आपला जोडीदार निवडण्याचा एक मोका असतो. तरुण-तरुणी एक दुसऱ्यावर कटाक्ष मारत झोकात बाजारात येतात. एखाद्या तरुणाला एखादी मुलगी पसंत पडली किंवा आवडली तर तो मुलगा पसंत असलेल्या मुलीला बाजाराच्या त्या गर्दीत जावून हातातला गुलाल त्या मुलीच्या गालाला लावतो. त्याचप्रमाणे एखादी मुलीला एखादा मुलगा पसंत पडला तर ती सुद्धा त्या मुलाच्या गालाला गुलाल लावते. समजा दोघांची पसंत एक झाली तर ते जोडपे जीवन साथी म्हणून त्या बाजारातूनच पळून जातात. किंवा नंतर लग्न करायचे असेल तर मुलगा मुलीला मागणी घालतो. या गुलाल्या बाजारात मुलीच्या गालाला गुलाल लावले म्हणून भाऊ किंवा बाप कुणीच चिडत नाही किंवा भांडणही काढत नाही. जो कुणी भांडण काढेल तर त्याला वेड्याच्या गणतीत काढतात. अशा तऱ्हेने हा गुलाल्या बाजार भरत असतो ह्या बाजारात अदिवासी मुले-मुली आपला जोडीदार स्वतःच्या पंसतीने निवडतात. ही परंपरा गुलाल्या बाजाराच्या रुपाने आदिवासी समाजात अस्तित्वात आहे.

१२) आदिवासी समाजात अविवाहीत तरुण-तरुणी एकत्र राहून जीवन साथी निवडण्याची एक जागा म्हणजे गोटुल. या परंपरेत आदिवासी अविवाहीत तरुण-तरुणी गावाच्या बाहेर जिथं गावातल्या इतरांपासून कोणत्या प्रकारचा त्रास होणार नाही अशा गावच्या ठराविक अंतरावर गावाच्या बाहेर गोटूलात एक राहण्याची परंपरा आहे. या 'गोटूल' मध्ये आदिवासी तरुण-तरुणी एक दुसऱ्याचा विचाराचा व्यवहाराचा ठाव घेतात आणि नंतर आपला जोडीदार निवडतात.

श्रम समूह आणि सहकार्य आदिवासी जीवनाचे जीवनमूल्य आहे. म्हणून ह्या मूल्यांवर आधारीत आदिवासी जीवन-संस्कृती असल्यामुळे आदिवासी संस्कृती मुळापासून नष्ट करुन शोषण, विषमता, दमन, वर्चस्व आणि व्यक्तिगत हितसंबंधांवर आधारीत भोगवादी जीवनमूल्ये आदिवासी समाजात रुजवण्याचा जातीयवादी धर्मांध राजकारण करणाऱ्यांचा प्रयत्न चालू आहे. भोगवादी मूल्ये रुजवून शोषणावर आधारित भोगवादी व्यवस्था बळकट करण्याचा त्यांचा 'डाव' आहे. जेथून संपत्तीची उत्पत्ती झाली तेथूनच शोषणाची सुरुवात झाली आणि तेथूनच व्यक्तिवादावर आधारित संस्कृतीचा जन्म होतो आणि अशाप्रकारे सामाजिक हितसंबंध जपणारी आदिवासी संस्कृती आणि व्यक्तिवादी हित जपणारी भोगवादी संस्कृती यांचा एक दुसऱ्याला नष्ट करण्याच्या संघर्षाला सुरुवात होते. हा संघर्ष तेथून तर इथपर्यंत वेगवेगळ्या स्वरुपात सुरुच आहे. या संघर्षाचा भाग म्हणून भोगवादी संस्कृती आदिवासींच्या अस्तित्वाला विकृत करुन आदिवासी अस्तित्वालाच नाकारुन, नष्ट करायला सुरुवात केलेली आहे.

आदिवासींचे वनवासीकरण करणे हा त्याचाच एक भाग आहे आणि श्रम समूह आणि सहकार्यावर आधारित आदिवासींचे जीवन आणि जीवनमूल्यांकडे दुर्लक्ष करुन भोगवादी संस्कृतीची मूल्ये आदिवासींवर लादत आहेत. आदिवासींकडे मुलगा जन्माला आला की प्रतिष्ठेचा भाग म्हणून नारायणाच्या पूजेचा आग्रह आदिवासीला केला जातो. आदिवासींच्या लग्नात ब्राह्मण आणावयाचा आग्रह केला जातो. याहामोगी आणि जगदंबा एकच आहे. हिरवा (निलिचारी), इंदल आणि सत्यनारायण पूजा एकच आहे. गवालदेव आणि कृष्ण एकच आहे. याबरोबरच आदिवासी सण-उत्सव, पूजा-विधी, परंपरांना बगल देऊन त्यांच्या भोगवादी मूल्यांवर आधारित सण-उत्सव, देवी देवता आणि पूजाविधी एकच आहेत असे सांगून त्यांच्या परंपरा आदिवासींत रुजवत आहेत. या माध्यमातून आदिवासींचे आचार-विचार, नीती-नियम, सगळेच बदलून टाकत आहेत. आदिवासी पाड्यात, खेड्यात आता गणपती बसवायला सुरुवात केली आहे. गणपती बसवले की, गणपतीची आरती आली, पूजाविधी आले, त्यांचे आचारविचार आले, खान-पान आले, रहनसहन आली, निति-नियम आलेत, या सगळ्यांचा परिणाम म्हणून श्रम, समूह आणि सहकार्यावर आधारित असलेल्या आदिवासी संस्कृतीपासून आदिवासी तुटत जातो.

त्यांनी आदिवासींना 'तू मागासलेला आहे' सांगितले, आदिवासींनी ते मानून घेतले. त्यांनी सांगितले त्यांच्यावर आदिवासींनी विश्वास ठेवला आदिवासींना वाटायला लागले की, खरं आपण मागासलेले आहोत, कुठं मागासलेले आहोत ? कसं मागासलेले आहोत ? असे प्रश्न आदिवासींना कधीच पडले नाहीत. कारण आदिवासी समाज हा प्रामाणिक मानव समूह असल्यामुळे आदिवासींना वाटायचे की, आपण जसे प्रामणिक आहोत तसेच ते आपल्याला मागासलेले म्हणत आहेत तेव्हा खरंच आपण मागासलेले असले पाहिजे. म्हणून आदिवासींनी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले मानून घेतले, एवढेच नाहीतर पुढे ते असे म्हणाले की 'आम्ही तुम्हाला सुधारु तुमची सेवा करु, तुमचे प्रश्न सोडवू, तुमचा विकास करु, कल्याण करु,' तेही आम्ही (आदिवासींनी) मानून घेतले आणि म्हणून आपल्या प्रश्नासाठी आपणच उभे राहिले पाहिजे, संघटना बांधली पाहिजे हा विचार सोडून देऊन आपण आपल्या प्रश्नांसाठी त्यांच्या मागे धावत सुटतो. तेव्हापासून तर आजपर्यंत आपण त्यांच्याच दावणीत अडकलेलो आहोत.

आदिवासी मागासलेला आहे. त्यांचे जीवन विविधांगाने अनेक प्रश्नांत गुंतलेले आहे. ते प्रश्न सोडवून आदिवासींना सुधारण्यासाठी, अनेक समाज सुधारक, क्रांतिकारक व संस्था आदिवासींच्या दु:खाला वाचा फोडून, आदिवासींना संघटित करुन आदिवासींचे प्रश्न सोडवण्याचे कार्य, सेवा करीत आहेत. कोणी धर्म-पंथ घेऊन आदिवासी समाजात घुसले आहेत. कोणी पक्ष-संघटनांचे राजकारण घेऊन आदिवासीत घुसले-घुसत आहेत. तर कोणी संस्था घेऊन आदिवासींचा विकास आणि कल्याणाच्या नावाने आदिवासीत घुसले आहेत. घुसत आहेत. कोणी शिक्षण आरोग्यासाठी तर कोणी व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलनाच्या नावाखाली आदिवासींमध्ये घुसले आहेत-घुसत आहेत.

आदिवासींचा कोणी वालीच नाही. त्यांचे वाली फक्त आपणच अशी धारणा करून ते सर्व आदिवासींत घुसताहेत. प्रत्येकजण आपापल्या तत्वाप्रमाणे, नीती-नियमांप्रमाणे आदिवासींचे प्रश्न सोडवण्याचा ते प्रयत्न करीत आहेत, मेहनत घेत आहेत. एवढेच नव्हे तर काहीजण आपला जीव धोक्यात टाकून काम करीत आहेत, हे नाकारुन चालणार नाही. तरी इथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, आदिवासींचे प्रश्न सोडवायचे, विकास करणे, सुशिक्षित करणे, सुधारणे, कल्याण करणे म्हणजे नेमके काय ? हे आपण जाणून घेतले पाहिजे. त्यांच्या या सर्व धडपडीचा अर्थ एकच की, त्यांच्या तत्वाप्रमाणे, त्यांच्या नीती नियमांप्रमाणे वागायला लावणे, जगायला लावणे आणि जर का त्यांच्या नीती-नियमांप्रमाणे, किंवा तत्वाप्रमाणे वागले नाही किंवा त्यांचे ऐकले नाही तर अशावेळी ते म्हणतात की 'आदिवासी सुधारणारच नाहीत' म्हणून खूप हिणवतात, आणि जर का त्यांची नीती नियमांप्रमाणे वागले तर मग त्या आदिवासींचे खूप-खूप कौतुक करतात.

आदिवासींत काम करणारे सर्व एकाच विचाराचे किंवा एकाच तत्वाचे असतात, असे नाही. प्रत्येकजण आपल्या प्रभावाखाली असलेल्या आदिवासी समूहावर आपला हक्क सांगत असतात. कारण त्या-त्या विभागातील आदिवासी त्यांच्या त्या-त्या नीती-नियमांप्रमाणे, तत्त्वाप्रमाणे वागत असतात. श्रम, समूह आणि सहकार्यावर आधारीत आदिवासी संस्कृती हा आपला पाया मानून जगणारा एकसंघ आदिवासी सांस्कृतिक जीवनापासून दूर होतो. वैचारिक पातळीवर विभागला जातो. तो इतका कडवा होतो की, आदिवासी संस्कृतीसाठी एकत्र यायला तयार होत नाही. एकत्र येणे सोडाच, पण तो जी संघटना किंवा विचार स्वीकारतो; त्याप्रमाणे एक आदिवासी दुसऱ्या आदिवासीला आपला शत्रू समजायला लागला आहे. काही-काही ठिकाणी हा आदिवासी एक दुसऱ्यावर हिंसक हल्लेसुद्धा करताना दिसतो. गुजरातमध्ये डांग जिल्ह्यात धर्मांच्या नावाने आदिवासी-आदिवासींत मोठा संघर्ष झाला. तर राजकारणावरुन ठाणे जिल्ह्यात आदिवासी - आदिवासी संघर्ष उभा राहिला.

या संघर्षातून आदिवासींचे जीवन किती सुरक्षित झाले, किती विकसित झाले याचा विचार करण्याची गरज आहे. आदिवासींत जाऊन, आदिवासींचे प्रश्न सोडवणाऱ्यांनी, कल्याण आणि विकास करणाऱ्यांनी आजपर्यंत कोणीही असा प्रयत्न केलेला नाही की, श्रम, समूह आणि सहकार्यावर आधारीत आदिवासी संस्कृतीला 'पाया' म्हणून आदिवासींच्या प्रश्नासाठी, आदिवासी नेतृत्व पुढे यावे, आपल्या ताकदीवर आपला प्रश्न सोडवावा, या आत्मविश्वासाने, आजपर्यंत आदिवासीला कोणीच उभा केलेला नाही. प्रत्येकाने हरघडीला आदिवासी आपल्यावर अवलंबून राहावा, असाच प्रयत्न आजपर्यंत केलेला आहे.

कोणीही आदिवासींच्या जीवनात विकास किंवा बदल घडवून आणला असेल तर असा विकास करणाऱ्याला आदिवासी समाजात आदिवासी संस्कृती, अस्तित्व, अस्मिता, आत्मसन्मान, शिक्षण, इतिहास, विकास, स्वावलंबन आणि आत्मविश्वास जागवत असेल तर या कार्याला आमचा पाठिंबा असेल; पण हा बदल त्यांचा धर्म वा पक्ष वाढवण्याच्या दृष्टीने किंवा आपमतलबीपणाने शोषण, विषमता, पुरुषप्रधानतेवर आधारीत भोगवादी संस्कृती आणायचा प्रयत्न करत असेल तर हा त्यांचा प्रयत्न आम्हाला मंजूर नाही.

आदिवासी संस्कृती जपणे समूहता, सहजता, मानवता, माणसा-माणसांतले प्रेम आणि विश्वास जपणे. आदिवासी संस्कृती समूहात बहरते आणि भोगवादी संस्कृती व्यक्तीवादावर अवलंबून असते. म्हणून ही संस्कृती शोषण, विषमता, वर्चस्व, पुरुष प्रधानता जपते.

आज असे सांगितले जाते की, आदिवासी शिकले सवरले, नोकरीला लागले, मोठ्या हुद्यावर गेलेत, अधिकारी झालेत; पण ज्या समाजात जन्म घेतला त्या समाजाला विसरुन गेलेत. समाज आहे तिथेच आहे. शिकणाऱ्या आदिवासींकडून समाजाच्या बऱ्याच अपेक्षा होत्या. समाजाचा अपेक्षाभंग झाला. शाळा, कॉलेज शिकून नोकरीला लागले. आदिवासींपासून इतके दूर गेले आहेत की, त्यांना आपली आदिवासी बोली, माय-बोली सुद्धा

बोलता येत नाही आणि ज्यांना बोलता येते त्यांना आपली आदिवासी मायबोली बोलायला लाज वाटते. एवढेच नाहीतर काही स्वत:ला आदिवासी म्हणवून घ्यायला तयार नाहीत. त्यांना अप्रतिष्ठेचे किंवा कमीपणाचे वाटते. अशाप्रकारे काही आदिवासी श्रम, समूह आणि सहकार्यावर आधारित आदिवासी संस्कृतीपासून दूर जातात आणि शोषण, विषमता, पुरुष-प्रधानता आणि व्यक्तीवादावर आधारीत भोगवादी संस्कृतीच्या प्रभावाने स्वत:भोवती व्यक्तीवादी हितसंबंधांचे कुंपण घालून जीवन जगायला लागतात.

या आदिवासींच्या मनात आपल्या समाजाबद्दल एवढा तिरस्कार का ? एवढी घृणा का ? आदिवासींच्या डोक्यात ही एवढी नफरत कोण भरतो ? आदिवासींच्या मनात आदिवासींबद्दल अशा तऱ्हेची नफरत का ? यामागची कोणती कारणे असावीत, याबाबत जाणून घेतले पाहिजे.

खरे म्हणजे आदिवासी जीवनात, आदिवासी संस्कृती म्हणजे मानवी मूल्यांचे भांडार. अशा संस्कृतीत जन्मणाऱ्या मानवाला वर्चस्ववादी भोगवादी संस्कृतीतले लोक स्वत:ची संस्कृती श्रेष्ठ ठरवण्यासाठी दुसऱ्या संस्कृतीला, आदिवासी संस्कृतीला, कमी लेखतात, हिणवतात आणि याचा भाग म्हणून आदिवासीला रानटी, लुच्चा, लफंगा, चोर, दरोडेखोर, अंधविश्वासू, दारुडे, जंगली, अस्वलाचे मांस खातात, तमक्यांचे मांस खातात, घाण राहतात, फाटके, लंगटे अशा तऱ्हेने हिणवतात आणि आदिवासी चुपचाप ऐकून घेतो. आदिवासी जीवनाला ते इतके हिणवतात की, आदिवासी शरमेने चूर चूर होतो.

अशाप्रकारे हिणवल्यावर आदिवासींना वाटायला लागते की, आपण इतके हीन ? आदिवासी होणे म्हणजे पाप अशी भावना आदिवासींच्या मनात येते आणि मग अशा प्रकारे विचार करणारा आदिवासी स्वत:ला आदिवासी म्हणवून घ्यायला तयार नसतो. एवढेच नाहीतर आपल्या समाजात काहीच प्रतिष्ठा नाही. असा विचार करुन तो आदिवासी प्रतिष्ठा कुठे आहे, याचा शोध घेतो. ब्राह्मणी संस्कृतीत प्रतिष्ठा आहे. अशा तऱ्हेची शिकवण भोगवादी संस्कृती आदिवासीला देते आणि याच संस्कृतीचा परिणाम म्हणून नोकरीला लागलेले आदिवासी आपली मायबोली बोलत नाहीत. त्यांना मायबोली बोलायला लाज वाटते.

जो आदिवासींच्या हाकेवर धावून जातो, त्याला आदिवासी आपल्या हृदयात बसवतात आणि ते सांगतील ते करायला, मरायला तयार होतात याचाच फायदा घेऊन आपमतलबी लोक आदिवासी संस्कृती विकृत करतात आणि नंतर नष्ट करण्याचा प्रयत्न करतात. हेच लोक आदिवासींना आदिवासी न म्हणता 'वनवासी' म्हणत आहेत. याचा विचार करण्याची गरज आहे. श्रम, समूह आणि सहकार्यावर आधारीत आदिवासी संस्कृती त्यांना नष्ट करावयाची आहे. शोषण, विषमता, वर्चस्व, दमन, पुरुषप्रधानता आणि व्यक्तिवादी हितसंबंधावर आधारित भोगवादी संस्कृती फुलवून ही समाजव्यवस्था आहे तशीच राहावी, म्हणजेगरीब-श्रीमंतीची दर उतरंडीवर आधारित जात पात आणि पुरुष प्रधानता आहे ती तशीच कायम राहील, असे मानणारे आदिवासींना वनवासी म्हणतात आणि आदिवासी संस्कृतीचे भगवीकरण करतात. आदिवासींचे भगवीकरण रोखलेच पाहिजे.

आज देशात, आदिवासी पट्ट्यांत अनेक धर्म, पंथवाले, पक्ष-संघटनावाले-संस्थावाले काय करीत आहेत? पण प्रत्येक ठिकाणी आदिवासींच्या हातात नेतृत्व नाही. आदिवासी हा दुय्यमच आहे.

आदिवासी क्षेत्रात काम करणारे सर्व एकाच विचारांचे किंवा तत्वाचे असतात, असे नाही. म्हणून प्रत्येकाचा झेंडा वेगळा, झेंड्याचा रंग वेगळा असल्याकारणाने ते सगळे एक होऊ शकत नाहीत. आदिवासींनाही एक होऊ देत नाहीत. एकसंघ जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचे तुकडे पाडतात. समाजाचे तुकडे तुकडे होतात. प्रत्येक तुकड्यावर जो-तो आपला हक्क सांगत असतो. आपला हक्क सांगताना ते एक दुसऱ्याच्या जीवावर उठतात. मर मिटायला तयार होतात. आदिवासीला एक दुसऱ्याचा शत्रू बनवतात. देशातील आदिवासी समाजाची ही अवस्था आहे.

(पृष्ठ १४ वर पहा)

# हिंगोली जिल्ह्यातील आंधांचे लोकसाहित्य

प्रा. राजेश धनजकर

महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागात वस्ती करुन राहणाऱ्या आदिवासी समाजाच्या एकूण ४७ जमाती आहेत आणि त्यापैकीच आंध ही एक आदिवासी जमात आहे. मराठवाडा विभागातील हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी, वसमत, सेनगाव, औंढा नागनाथ व हिंगोली तालुका अशा पाच तालुक्यांचा समावेश होतो. या पाचही तालुक्याच्या डोंगराळ भागात, दऱ्याखोऱ्यात, कडेकपारीत व घनदाट अरण्यात आंध जमातीचे लोक गुण्यागोविंदाने राहतात, खातात व पितात. २००१ च्या खानेसुमारीनुसार हिंगोली जिल्ह्यातील आंधांची एकूण लोकसंख्या ७७४८६ इतकी आहे. लोकसंख्येच्या मानाने आंध जमातीचा म्हणावा तितका विकास अजून तरी झालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. आंध जमातीच्या मागासलेपणाला अनेक कारणे कारणीभूत आहेत, परंतु त्या सर्वांचा याठिकाणी उल्लेख करणे शक्य नाही. तरीपण त्यांची थोडक्यात ओळख करुन देता येईल. या समाजातील लोकसाहित्यावरही थोडाबहुत प्रकाश टाकता येईल हा या शोधनिबंधाचा हेतू आहे.

आंधांच्या वस्तीला 'वाडी' किंवा 'दरी' याच नावाने ओळखले जाते. एका वाडी किंवा दरीत साधारणत: २० ते २५ कुटुंबे राहाताना दृष्टीस पडतात आणि त्यावरुनच त्यांची गावे सहज ओळखता येतात. जसे पिंपळदरी, आमदरी, कोपरवाडी, देववाडी, भुरक्याची वाडी व काळ्याचीवाडी ही काही आंधांच्या वस्तीला दिलेली नावे आहेत. आज त्या वाड्यांचे रुपांतर गावात झाल्याचे दिसून येते. आंध समाजाचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन समजावून घेण्यासाठी त्यांचे लोकसाहित्य महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते. त्यात लोककथा, लोकगीते, लोकविश्वास, लोककला, खंडोबाचे जागरण, दंडारणनृत्य, कलापथक, लग्नातील गाणी व खेळ परंपरा एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत मौखिक परंपरेने चालत आलेल्या आहेत. आणि हिंगोली जिल्ह्यातील आंधांनी ही परंपरा जोपासल्याचे आजही दिसून येते.

### आंधाचा लग्नविधी

आंध समाजात पूर्वी पोटाला कुंकू लावणे व पाळण्याला बासिंग बांधणे अशा काही लग्न परंपरा अस्तित्वात होत्या; परंतु आज ती परंपरा कुठेही असल्याचे दिसून येत नाही. मुलगी पाहाणे, बोलाचाली करणे, कुंकू लावणे, पानवाटी करणे व त्यानंतर लग्नविधी या क्रमाने आंधांचा विवाहविधी पार पडतो. पूर्वी आंध समाजात विवाहप्रसंगी वराला मूल्य देण्याची प्रथा अस्तित्वात नव्हती. परंतु मध्यंतरीच्या काळात घड्याळ किंवा रेडिओ दिला जात असे. आज मात्र वराच्या कुवतीनुसार हुंडा दिला जातो. आंधांच्या विवाहप्रसंगी काही गीतेही म्हटली जातात. त्यात देवताविषयक गीते, खेळगीते यांचा समावेश होतो. शिवाय काही गीतांतून थट्टा मस्करीही केली जाते. त्यातील एक गीत असे -

***"सोनियाचा पाटा, चांदियाचा गोटा***
***हळदाई फोडली, हळदाई दळली***
***सवर्णाच्या ताटी, हळदाई भरली***
***वाजत गाजत देवा, मारोतीला नेली***
***हळदाई चढली देवा, या मारवतीला***
***नवऱ्या रायबरावाला"***

वरील प्रकारचे गीत हळदीच्या दिवशी सकाळी हळद दळतांना म्हटले जाते. याचा अनुभव हिंगोली जिल्ह्यातील अनेक गावात आला. नवरदेवाला वाजत-गात मारोतीच्या पारावर नेले जाते. त्याही ठिकाणी बरीच काही गीते म्हटली

जातात. जसे -

*"पार भरला हनुमंतानं*
*येस धरली येसकरानं*
*त्यावर सेला मी झाकीन*
*नवरी जिंतून नेईनं"*

नवरदेव परण्या जातो, तेव्हा तो मारोतीच्या पारावर थांबतो. त्याठिकाणी नवरदेवाच्या डोक्यावर तांदूळ टाकून गीते म्हटली जातात. यावेळी वेशीजवळ मातंग जातीचा पुरुष तोरण धरतो. तोरणावर लुगडे किंवा साडी झाकावी लागते, अन्यथा तो मातंग माणूस तोरण बाजूला सारत नाही. आज तो दक्षिणा म्हणून पैशाची मागणी करत आहे.

## मृत्यू विधी

आंध समाजात एखादी व्यक्ती मृत्यू पावल्यास जवळ जवळ आठ ते दहा दिवस दुखवटा पाळला जात असे. आज मात्र तोच दुखवटा चार दिवसांवर येऊन ठेपला आहे. आंध जमातीत विवाहित स्त्री-पुरुषाचा मृत्यू झाल्यास त्याला जाळतात किंवा पुरतात; परंतु अविवाहित मुलगा किंवा मुलगी मृत्यू पावल्यास त्याला पुरतात. विवाहित व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याच्या कपाळाला एक रुपया चिकटवून त्याला भिंतीला बसविले जाते. मयत व्यक्तीला आंघोळ घालून त्याचे अंत्यदर्शन घेतले जाते. तसेच मृत व्यक्तीच्या आठवणींना उजाळा देऊन बरीच रडापडी होते. परंतु ती काही काळापुरती मर्यादित असते. हिंगोली जिल्ह्यातील मौजे चिंचोर्डी येथील अनसूयाबाई भगाजी कुरडे वय ७८ वर्ष या आंध स्त्रीचे दि. ३०.९.२००८ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यावेळी श्रीमती सुलोचना पोटे रा. चिंचोर्डी या आंध स्त्रीने खालील गीत म्हटले.

*"सांगा सांगा गुरु धरु,*
*हातचं सुटून का गेलं माझं पाखरु*
*पाखरु चाललं रस्त्यानं, त्याच्या संगे चवघजन*
*हातचं सुटून का गेलं गं माझं पाखरु ॥धृ॥*
*पाखरु देवाच्या रुपात, उडून गेलं तिरीभुवनात*
*हातचं सुटून का गेलं ग माझं पाखरु ॥१॥*
*पाखरु रतिऊन लहान, उडता गर्जे तिरीभुवन*
*हातचं सुटून का गेलं माझं पाखरु ॥२॥*
*तुका म्हणे चक्रचारी, पाखरु मुक्ताबाईच्या घरी*
*हातचं सुटून का गेलं गं माझं पाखरु ॥३॥"*

चिंचोर्डी गावातील एखाद्या आंध स्त्री-पुरुषांचा मृत्यू झाल्यास शक्यतो वरील प्रकारचे गीत हमखास म्हटले जाते. मृत व्यक्तिला नेसवलेल्या नव्या कोऱ्या कपड्यात बांधलेल्या "विसवा" गावाच्या शिवेवर सोडल्या जातात. त्यात ज्वारी, सुपारी, खडीसाखर, हळकुंड, बदाम व खारीक आणि एक बंदा रुपया असे साहित्य असते. मृत व्यक्तीचा थोरला मुलगा सरणाला अग्नी देतो. सरणाने पेट घेतल्यानंतर त्याठिकाणी जमलेल्या सर्व स्त्रिया लगेच घराकडे येतात व पुरुष मंडळी थोड्या वेळाने येतात. तिसरा दिवस, दहावा दिवस व तेरावा दिवस असे काही विधी मृत व्यक्तीच्या नावाने पार पाडले जातात.

## आंधांच्या देवदेवता

हिंगोली जिल्ह्यातील आंध जमातीच्या देवदेवतांची माहिती संकलित करताना बऱ्याच काही देवदेवता दृष्टीस पडल्या आहेत. त्यातील सर्वाधिक देवता ह्या उघड्यावरच असल्याच्या दिसून आल्या आहेत. देवता जरी उघड्यावर असल्या तरी सुद्धा आंध लोक या देवतांची पूजाअर्चा मोठ्या भक्तीभावाने करताना दिसून येतात. धार्मिक वृत्तीचे आंध लोक आजही आप्पास्वामी, खंडोबा, वेताळबाबा, म्हसोबा, कान्होबा शाळीग्राम, दुधागिरी महाराज, भिमाजी बवा, नागोबा व लांडगादेव इ. देवतांची पूजा तर करतातच; शिवाय मरीमाय, खोकलामाय, पोचिमाय, मेसकामाय, धुरपतामाय, देमामाय, सटवाई व आसरा अशाही काही आंधांच्या खास देवता आहेत.

आंध कुटुंबावर किंवा गावावर एखादे संकट आल्यास आंध लोक लागलीच देवदेवतांचा धावा करतात व करुणा भाकतात. एवढेच नव्हे तर, घरातील एखादे लहान मूल आजारी पडल्यास प्रथम देवाच्या नावाने त्या मुलाला अंगारा लावला जातो. त्यानंतर देव किंवा देवतेला कबुल करुन घ्यावे लागते. आणि मग त्याच्या नावाने उपास-तापास सुरु

होतात. एवढे करुनही आजार बरा न झाल्यास त्या मुलाला वैदाकडे नेले जाते. त्या ठिकाणी धागेदोरे, मंत्र व गंडेदोरे टाकले जातात. वरील प्रकारामुळे प्रसंगी आंधांना आपली मुले गमाविण्याची वेळ येवू शकते. आजही मराठवाड्यातील आंधांत अज्ञान, अंधश्रद्धा, व्यसनाधिनता, लोकश्रद्धा, रुढी, प्रथा, जादूटोणा, लोकविश्वास व परंपरा यांचे अधिक प्राबल्य असल्याचे दिसून आले आहे.

**सण :**

हिंदू धर्मात साजरे केले जाणारे जवळ जवळ सर्वच सण मराठवाड्यातील आंध जमातीचे लोक साजरे करतात. याला हिंगोली जिल्ह्यातील आंधही अपवापद नाहीत. आखाडी, नागपंचमी, पोळा, दसरा, दिवाळी व होळी इ. सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. सणाच्या दिवशी घरात गोडधोड पदार्थ तयार करतात. नवविवाहीत स्त्रीच्या दृष्टीने आखाडी या सणाला विशेष महत्त्व असते. कारण की, नववधू सासरी गेल्यानंतर माहेरी येण्यासाठी ती फार अतूर असते आणि आखाडी सणाच्या निमित्ताने ती प्रथमच माहेरी येते. नागपंचमी या सणालाही तेवढेच महत्व असते. लिंबांच्या झाडाला बांधलेल्या झोक्यावर चार झोके खेळावे ही आंध स्त्रीची अपेक्षा असते. आणि ती चार झोके खेळून मनाचे समाधान करुन घेते. यावेळी फेरावरची गाणीही म्हटली जातात. आंध लोक पोळा हा सण अतिउत्साहाने साजरा करतात. या दिवशी बैलाला धुणे, त्याच्या शिंगाना वॉर्निश लावणे, शिंगांना बेगड चिकटवणे, अंगावर झुली टाकणे व अंगावर रंगीबेरगी ठिपके मारणे. अशापद्धतीने पोळ्याच्या दिवशी बैलाला सजविले जाते. बैलाची मिरवणूक काढून मारोतीच्या मंदिराजवळ त्याचे नवरी विना लग्न लावले जाते. दसरा या दिवशी आंध मंडळी शेतीस व व्यवसायास उपयोगी पडणाऱ्या अवजारांची पूजा करतात. तसेच आपट्याची पानं सोनं म्हणून देतात. वाकस, फारुळे, पासा, विड्या, विळा व कुऱ्हाड इ. साहित्याची पूजा केली जाते. दसऱ्यानंतर अवघ्या वीस दिवसांवर दिवाळी हा सण येतो. या सणाला शक्यतो मुलीबाळी ह्या आपल्या माहेरी येत असतात. यावेळी बहीण आपल्या भावाला ओवाळते. भाऊ बहिणीस ओवाळणी म्हणून पैसे व ब्लाऊज पिस देतो. होळी हा सण देखील आंध लोक साजरा करतात. या सणाच्या दिवशी गावातील तरुण मुले होळी पेटविण्यासाठी गावात लाकडे मागतात. यावेळी लाकडं ही सहज न मागता अश्लिल शब्दांचा वापर करुन पाटील किंवा सरपंच वाटलेच तर गावातला एखादा सर्व परिचित व्यक्ती यांच्या नावे शिव्या देऊन लाकडं मागीतली जातात. एक मुलगा अश्लिल वाक्याचे उच्चारण करतो आणि इतर मुले त्याच्या मागून बोंबलतात. संध्याकाळी संपूर्ण गावाची सामूहिक होळी पेटविली जाते.

**लोकगीते :**

मराठवाड्यातील आंध जमातीत आणि त्यातल्या त्यात हिंगोली जिल्ह्यातील आंधांमध्ये मौखिक परंपरेने जोपासलेली खूप काही गीते ऐकायला मिळाली. यात विवाहगीते, विधीगीते, फेरावरची गीते, श्रमपरिहाराची गीते, ओवीगीते, जागरण गीते व फुगडी गीते इ. गीतांचा समावेश आंधाच्या लोकगीतात होतो. आंध लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून, त्यांचे संपूर्ण जीवनमानच शेतीवर अवलंबून असते. आणि त्यातल्या त्यात त्यांची शेती ही पडणाऱ्या पावसावर अवलंबून असते. पाऊस वेळेवर नाही पडला तर, त्यांचे शेतीचे वेळापत्रक बिघडते. अशावेळी ते पावसाचा धावा करतात व गीतेही गातात. त्यातील एक गीत असे -

***"वरड वरड गं बेंडकोळी, सतवाच्या नारी***
***तुव सत्व घेशील, देवा दारी जाशील***
***देवा घरी जाशील, पाणी घेऊन येशील***
***साळी दाळी पिको, पयसा पायली इको"***

पाऊस लवकर व वेळेवर पडावा यासाठी वरील प्रकारचे गीत म्हटले जाते. पाऊस तर वेळेवर पडावाच; शिवाय शेतीतून झालेल्या धान्याला योग्य भाव मिळावा अशीही त्यांची अपेक्षा असते. मौखिक परंपरेने जशी आंध जमातीत स्त्रीगीते आहेत. तशीच काही पुरुष गीते सुद्धा आहेत. फरक एवढाच की, पुरुष गीताच्या मानाने स्त्री गीतांची संख्या ही अधिक असल्याचे दिसून आले आहे.

हिंगोली जिल्ह्यातील आंध जमातीच्या लोकांचे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवन जाणून

घेण्यासाठी त्यांचे लोकसाहित्य फार महत्त्वाची भूमिका पार पाडते. शिवाय त्यांच्या व्यवसायाचे ज्ञान होण्यासाठी सुद्धा लोकसाहित्य उपयोगी पडू शकते. आजही आंधांचे लोकनृत्य, लोकविधीनाट्य व लोकगीते ही शहरी संस्कृतीला भुरळ पाडणारी आहेत. उदा. दंडारणनृत्य, रामलीला व शिराळाची गाणी ही त्याचीच उदाहरणे आहेत. समाजात आज थोड्या प्रमाणात का होईना, शिक्षणाचा प्रसार होत आहे. शिकून-सवरुन काही मुले नोकरी करु लागले आहेत. शिवाय शासनाच्या विविध विकास योजनांचा लाभही काही आंध तरुण उठवत आहेत. ही एक या समाजासाठी समाधानाची बाब आहे. कुठल्याही समाजाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी प्रथम त्या समाजाच्या सर्व स्तरात शिक्षणाचा प्रसार होणे गरजेचे असते. आज खरी गरज आहे तीच आदिवासी आंध समाजाला. त्याशिवाय विकास होणार नाही, एवढे मात्र खरे आहे.

● ● ●

---

(पृष्ठ १० वरुन पुढे)

आदिवासींना मुख्य प्रवाहात आणायला पाहिजे असा काहींचा प्रयत्न चालू आहे आणि ही एक चांगली गोष्ट आहे, असे म्हटले जात आहे.

आदिवासींना मुख्य प्रवाहात आणायचा प्रयत्न म्हणजे आदिवासी संस्कृतीवर हल्ला आहे. आदिवासी संस्कृतीचे विकृती करण आहे. श्रम, समूह आणि सहकार्यावर आधारीत आदिवासी संस्कृती नष्ट करण्यासारखे होईल. म्हणून अगोदर मुख्य प्रवाहाची व्याख्या स्पष्ट झाली पाहिजे.

हा मुख्य प्रवाह कोणी तयार केला ? कोणत्या निकषावर तयार केलेला आहे ? या मुख्य प्रवाहाच्या अंतर्गत कोणत्या गोष्टी, कोणती मूल्य येतात याबाबत स्पष्टता होण्याची गरज आहे.

आदिवासींना मुख्य प्रवाहात आणायचा प्रयत्न चालू आहे तेव्हा हा मुख्य प्रवाह निर्माण करणाऱ्यांनी प्रवाह निर्माण प्रक्रियेत आदिवासींच्या सहभागाची गरज वाटते का ?

आज धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक, आणि लिंग भेद इत्यादीच्या माध्यमातून मानव जीवनात शोषणाची प्रक्रिया चालू आहे. या शोषणातून मुक्त करणारा प्रवाह म्हणजेच मुख्य प्रवाह अशीच स्पष्ट व्याख्या असायला पाहिजे.

आज आदिवासी आधुनिक विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होणे यालाच मुख्य प्रवाह म्हणत असतील तरी याच्यात फक्त आर्थिक विकास संभव आहे. पण त्याबाबत ही स्पष्टता नाही. अशा या प्रवाहात आदिवासी सहभागी होणे म्हणजे आदिवासींनी श्रम, समूह आणि सहकार्यावर आधारीत जीवनमूल्य सोडून शोषण, वर्चस्व, दमन आणि विषमतेवर आधारित धर्म-जातीत विलीन होण्यासारखे आहे.

आदिवासीला जातीत सहभागी करुन घेणे म्हणजे जातीय भेदभावाच्या खालच्या पायरीवर ठेवणे होय.

आदिवासींना मुख्य प्रवाहात आणल्यावर, सामावून घेतल्यावर कोणत्याही धर्मांतील कोणत्याही जातीतील समाजाबरोबर सन्मानाने रोटी-बेटी व्यवहार करता येईल का ? आणि आजच्या पुरुषप्रधान व्यवस्थेत फक्त आदिवासीच नाही तर कोणत्याही जाती धर्मातील स्त्रियांचे पुरुषांकडून होणारे शोषण थांबेल का ?

आदिवासी संस्कृती धर्मपूर्व संस्कृती आहे. यात मानवी मूल्यांना मोठा साठा आहे. आणि मानवी जीवनामध्ये मानवी मूल्य जपणे अत्यंत आवश्यक आहे. मानवी मूल्य जपणारा मुख्य प्रवाह आपण सगळ्यांनी मिळून निश्चित केला पाहिजे. ज्यांच्यातून मानवी जीवनातील सर्व शोषण थांबले पाहिजे आणि श्रम, समूह आणि सहकार्यावर आधारीत मूल्य जोपासणारी मानवी संस्कृती जपली पाहिजे. मानवी जीवनात माणसा-माणसा बद्दल चे द्वेष, भांडण तंटे, मारामाऱ्या, अन्य-अत्याचार, युध्द-पिपासूपणा नष्ट झाला पाहिजे तरच मानवी जीवनात शांतता प्रस्थापित होईल, माणसा-माणसाबद्दल प्रेम आणि विश्वास निर्माण होईल आणि याच आधारावर पुढे मानवी जीवनाचा विकास होईल. असा मुख्य प्रवाह आपण सगळ्यांनी मिळून तयार करु या: धन्यवाद !

● ● ●

# ग्रामीण विकासनीती

मिलिंद बोकील

*ग्रामीण विकासनीतीची चर्चा करायची म्हटली की कुणाच्याही मनात प्रथम हाच प्रश्न येईल की ही चर्चा करून उपयोग आहे का ? कारण आपल्या समाजाचे झपाट्याने शहरीकरण होत आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात आजच ४० टक्क्यांहून जास्त लोकसंख्या शहरात राहते. पुढच्या वीस-पंचवीस वर्षात हे प्रमाण आणखीनच वाढेल. आजमितीस जवळ जवळ सर्व खेड्यांमध्ये रस्ते, वाहने, वीज आणि टेलिव्हिजन पोहोचलेले आहेत. अनेक ठिकाणी नळाचे पाणी व स्वयंपाकाचा गॅसही पोहोचलेला आहे. पुढच्या पाच-दहा वर्षात त्यामध्ये मोबाईल फोन, एटीएम यंत्रे आणि कॉम्प्युटर्सची भर पडणार आहे. सिमेंट, स्टील आणि प्लॅस्टीक पोहोचून तर अनेक वर्षे झाली. केवळ तालुक्यांची गावेच नाही तर वीस-पंचवीस हजार वस्तीचे कोणतेही गाव शहर मानावे अशी आज परिस्थिती आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण लोकांच्या आशा-आकांक्षा ह्या शहरी लोकांप्रमाणेच होत आहेत. ग्रामीण व शहरी समाजरचनेतील आणि मनोवृत्तीतील फरक दिवसेंदिवस मिटत जाणार आहे.*

*ह्या सर्व घडामोडी होत असल्या तरी ज्या मुख्य गोष्टीवरून ग्रामीण व शहरी असा भेद होतो - म्हणजे शेतीवरचे अवलंबन - ती अद्याप शाबूत आहे. सध्याच्या व्याख्येप्रमाणे पाच हजारापेक्षा जास्त वस्ती, नगरपालिकेसारखे प्रशासन आणि ७५ टक्क्यांहून जास्त लोकसंख्या बिगर-कृषी व्यवसायावर अवलंबून असेल तर त्या भागाला शहरी भाग म्हणतात. यातील पहिल्या दोन अटींची पूर्ती होणे कठीण नाही. पण शेतीवरचे अवलंबन मात्र इतके कमी झालेले नाही. एकूण राष्ट्रीय उत्पन्नामधील शेतीचा सहभाग कमी कमी होत असला तरी अद्यापही फार मोठ्या संख्येने लोक शेतीवर अवलंबून आहेत. कृषिक्षेत्र हेच रोजगार पुरवणारे सर्वात मोठे क्षेत्र आहे. त्यामुळे शहरातल्या सुखसोयी जरी पोहोचल्या तरी शेती हे ग्रामीण भागाचे जे अंगभूत वैशिष्ट्य ते पुढची निदान पंचवीस वर्षे तरी टिकून राहीलच. ह्या कारणाने ग्रामीण विकासनीतीची चर्चा स्वतंत्रपणे करणे योग्य आहे.*

शेती हीच गाव आणि शहर यामधली विभाजक रेषा आहे. हे लक्षात घेतले म्हणजे विकासनीतीची चर्चा करण्यास एक दिशा मिळते. भारतातील किंवा विशेषत: महाराष्ट्रातील शेतीच्या समस्या दोन : लहान जमिनी आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य. ब्रिटिश राजवटीच्या काळात ग्रामीण उद्योगधंद्यांची वाताहत झाल्याने शेतीवरचा माणसांचा बोजा वाढला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जमीन मालकीत सुधारणा करुन आणि कारखानदारी उद्योगांची वाढ करुन तो बोजा कमी करण्याचे प्रयत्न झाले. पण ते पुरेसे यश्वी झाले नाहीत; कारण कारखानदारीची वाढ मंद राहिली आणि लोकसंख्या बेसुमार वाढली. प्रत्येक पिढीत जमिनीची विभागणी झाल्याने जमिनीचे कुटुंबागणिक असणारे प्रमाण झपाट्याने घसरत गेले. आजमितीस महाराष्ट्रातील ६५ टक्के शेतकरी खाती ही पाच एकराच्या खालची आहेत आणि त्यांची जमीन धारणा दोन एकर आहे. पुढच्या पिढीत ती आणखी कमी होईल.

दुसरी समस्या म्हणजे ही शेती मोसमी पावसावर अवलंबून आहे. हा पाऊस लहरी आहे तसाच अपुराही. त्यामुळे महाराष्ट्रासारख्या राज्याचा दोनतृतीयांश भाग हा नेहमीच दुष्काळाच्या छायेत असतो. पाणी अडवण्याचे आणि साठवण्याचे कितीही प्रयत्न केले तरी पर्यावरणामध्ये

जो अंगभत शुष्कपणा आहे त्याचा परिणाम जीवसृष्टीवर होतोच. पर्यावरणातला हा कोरडेपणा दिवसेंदिवस वाढतो आहे.

ह्याशिवाय शेतमालाला मिळणारा अपुरा भाव, राजकीय अर्थव्यवस्थेकडून शेतीचे होणारे शोषण, पारंपरिक शेतीची मर्यादित उत्पादकता आणि शेतीसाठी लागणाऱ्या भांडवलाचा अभाव या कारणांनीही काही अपवाद सोडले तर बहुतेक शेती आतबट्ट्याची झालेली आहे. शेतीच्या अशा अवस्थेमुळे ग्रामीण भागात दारिद्र्य तर निर्माण झालेच आहे; पण विकासाचे अनेकविध प्रश्नही तयार झाले आहेत. शिवाय जीवनातही एक प्रकारची अस्वस्थता आहे. या अस्वस्थतेचे स्वरूप निरनिराळ्या भागात निरनिराळ्या प्रकारचे आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या दुष्काळी भागात पाण्याच्या दुर्भिक्ष्यतेमुळे आणि स्थानिक रोजगाराच्या अभावाने अनेक लोकांना स्थलांतर करावे लागते. बीड-उस्मानाबाद जिल्ह्यातले शेतकरी-शेतमजूर वर्षानुवर्षे ऊसतोडणी कामगार म्हणून जगतात. बागायती भागात पाणी आहे, पण त्याचा वापर अडाणीपणाने होत असल्याने जमिनी क्षारयुक्त होऊन नापीक तर होत आहेतच, पण रासायनिक शेतीमुळे उत्पादनाचा खर्च हाताबाहेर गेलेला आहे. काही ठराविक लोकांच्या ताब्यात सत्ता व संपत्ती एकवटल्यामुळे दंडेली आणि मुजोरपणा वाढलेला आहे. विदर्भासारख्या भरवशाच्या पावसाच्या प्रदेशात कापसासारख्या पिकाला रास्त दर न मिळाल्याने शेतकरी चिंताक्रांत असतो. कोकणात औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या दबावामुळे शेतजमिनी विकून टाकण्याकडे कल वाढतो आहे. तिथे पर्यावरणाच्या प्रदूषणाचे प्रश्न आहेत ते वेगळेच.

ग्रामीण भागाच्या विकासविषयक समस्यांचा सुटा सुटा विचार करून त्यावर वेगवेगळे उपाय सुचवण्याचे व काही प्रमाणात ते अमलात आणण्याचे पुष्कळ प्रयत्न झालेले आहेत. उदाहरणार्थ, जमिनीची फार विभागणी होऊ नये म्हणून तुकडेबंदी कायदा आहे आणि एकत्रीकरणाला उत्तेजन दिले जाते. पावसाचे पाणी वाया जाऊ नये म्हणून ठिकठिकाणी बंधारे घालून ते अडवायचे आणि पाणलोटक्षेत्राच्या आधारे त्याचे नियोजन करण्याचे प्रयोग केले जातात. कालव्याच्या पाण्याची उधळपट्टी होते; म्हणून ते पाणी मोजून द्यायची व शेतकऱ्यांच्या संस्थांमार्फत त्याचे वाटप करायची कल्पना प्रसारित होते आहे. मुळातच पाणी जमिनीच्या आधारे न देता माणसांच्या गरजांप्रमाणे द्यावे असा विचार मांडला गेला आहे. सावकारांमार्फतचे शोषण थांबावे म्हणून सहकारी चळवळीचा उदय होतो. पण त्या सहकाराने पुरुषवर्ग जेव्हा कर्जबाजारी व नादार बनतो तेव्हा मग स्त्रियांच्या बचतगटांची चळवळ सुरु होते. देशी जनावरांची दूध देण्याची क्षमता मर्यादित आहे. म्हणून संकरित जनावरांचा प्रसार करण्यात येतो. जंगले उजाड होतात म्हणून कुऱ्हाडबंदी व चराईबंदीचे प्रयोग केले जातात. गावाचे नियोजन हे मुंबई किंवा दिल्लीतून न होता गावकऱ्यांच्या मार्फतच व्हावे म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनेची मान्यता मिळवली जाते व त्यात स्त्रियांसाठी जागा राखीव ठेवल्या जातात. प्राथमिक शाळेतले शिक्षण आनंददायी करण्याचा प्रयत्न केला जातो. गावोगाव स्वच्छता व्हावी म्हणून स्पर्धा भरवल्या जातात. शौचालयांसाठी अनुदान दिले जाते. रासायनिक खतांच्या वापराने जमिनी नापीक बनतात. म्हणून नैसर्गिक शेतीची कल्पना पुढे येते. खेडेगावातली फुले-फळे दूरदेशात निर्यात व्हावी म्हणून थेट विमानसेवा सुरु करण्याचा विचार होतो.

ह्या सगळ्या कल्पना आणि उपक्रमांमागे ग्रामीण भागाच्या विकासाची दृष्टी आहे हे उघड आहे. या प्रत्येक उपक्रमांमधून एकेक पाऊल पुढे टाकले जाते आणि ग्रामीण भागातील निरनिराळ्या समस्यांवर उत्तरे शोधली जातात. त्या त्या प्रमाणात ग्रामीण भागातील अस्वस्थता दूर करण्याचा प्रयत्न होतो.

मात्र हे सर्व प्रयत्न सुट्या सुट्या स्वरूपातले आहेत. कधी कधी ते परस्पविरोधीसुद्धा होतात. ह्या सर्व प्रगतिशील

उपक्रमाचा, उत्तरांचा व पर्यायांचा समग्रपणे विचार करणे आणि विकासाच्या प्रक्रियेसाठी एक मूलभूत सूत्र शोधणे हे ग्रामीण विकासनीतीचे उद्दिष्ट असायला हवे.

ग्रामीण भागाचे मुख्य लक्षण शेती असल्यामुळे नजीकच्या काळात शेती हा केंद्रबिंदू धरून विकासनीतीची मांडणी करणे आवश्यक आहे. शेतीकडे बघण्याचा पारंपरिक दृष्टिकोन, 'शेती ही जगण्याची एक शैली किंवा जीवनपध्दती' असा आहे, तर आधुनिक दृष्टिकोण 'नफा मिळवण्याचा उद्योग' असा आहे. हे दोन्ही दृष्टिकोन सत्य आहेत आणि म्हणून वैधही आहेत. भारत किंवा महाराष्ट्र ही शंभर-दोनशे वर्षांपूर्वीची नवीन वसाहत असती तर कदाचित इथेही तथाकथित आधुनिक दृष्टिकोण रुजला असता. पण इथे ताम्र-पाषाणयुगापासून म्हणजे आठ-दहा हजार वर्षांपासून शेती केली जात असल्याने ती इथल्या लोकांची एक जीवनशैलीच झालेली आहे. इथला सर्व इतिहास, संस्कृती, परंपरा ह्या शेतीशी निगडित आहेत. त्यामुळे पारंपरिक आणि आधुनिक अशा दोन्ही दृष्टिकोणांची सांगड घालून शेतीकडे बघणे आवश्यक आहे. कोणत्याही एकाच दृष्टिकोनांतून बघणे हे भाबडेपणाचे तर होईलच पण अशास्त्रीयही होईल.

शेतीपुढच्या प्रमुख समस्यांचा विचार करताना लहान जमिनी आणि पाण्याचा तुटवडा यांचा उल्लेख अगोदर केला आहे. ह्या दोन मूलभूत समस्या सुटल्या म्हणजे शेतीचा प्रश्न सुटेल का ? कमीतकमी किती जमीन असली तर शेती परवडेल ? हा एक यक्षप्रश्न आहे. त्याचे उत्तर जमिनीची प्रत, हवामान, पाण्याची उपलब्धता, पिकाचा प्रकार, उत्पादनाचा खर्च आणि शेतमालाचा भाव या गोष्टींवर जसे अवलंबून आहे, तसेच शेतकऱ्यांच्या गरजा काय यावरही अवलंबून आहे. दोनवेळची भाकरी, वर्षासाठी दोन लुगडी, एक घोंगडी आणि वाहाणांचा एक जोड एवढीच अपेक्षा असली तर दोन एकर कोरडवाहू शेतीही पुरेशी होईल, पण त्या शेतकऱ्याला जर आपल्या मुलीला खाजगी इंजिनिअरिंग कॉलेजला पाठवायचे असेल तर ?

हीच गोष्ट पाण्याच्या बाबतीतही आहे. किती पाणी मिळाले म्हणजे शेती परवडेल ? महाराष्ट्रातील पाण्याचे समान वाटप केल्यास ग्रामीण भागात माणसी सुमारे १००० घन मीटर पाणी उपलब्ध होऊ शकेल आणि त्या पाण्याने प्रत्येकी अर्धा एकर जमीन आठमाही सिंचनाखाली येऊ शकेल असे गणित कै. विलासराव साळुंखे यांनी मांडले होते. समान पाणी वाटप केल्यास महाराष्ट्राच्या जलसिंचनाची व्याप्ती वाढेल हे खरे आहे. त्यामुळे दुष्काळाची तीव्रता आणि सामाजिक विषमताही कमी होईल. पण तरीही सगळ्यांची शेती व्यवहार्य होईल का हा प्रश्न शिल्लक राहतोच. कारण हा प्रश्न पुन्हा माणसांच्या गरजांशी संबंधित आहे. कुटुंबामागे किमान अडीच एकराला आठमाही पाणी मिळाले तर त्या कुटुंबाच्या मूलभूत गरजा भागतील आणि सर्वांच्या किमान गरजा प्रथम भागण्याच्या दृष्टीने तसे नियोजन राज्यसंस्थेने केले पाहिजे. पण तुमच्या गरजा कायम अमूक इतक्याच ठेवा असे सरकार लोकांना सांगू शकेल काय ? तशी नैतिक ताकद कोणामध्ये आहे ?

हेच शेतमालाच्या भावाच्या बाबतीत आहे. शेतमालाला उत्पादनखर्चाधारित भाव मिळाला तर शेतीच्या सर्व समस्या सुटतील असा विचार मांडला जातो. सरकार ज्या धान्यांची सक्तीने खरेदी करते तिथे सरकारने रास्त भाव द्यावा आणि इतर उत्पादनांच्या बाबतीत सर्व निर्बंध हटवावे अशी मागणी यात असते. सरकारने शेतीच्या बाजारपेठेत कोणताही हस्तक्षेप करु नये आणि केलाच तर योग्य भाव द्यावा ही मागणी बरोबर आहे. पण यामुळे सगळ्यांना शेती आपोआप परवडेल असे गणित मांडता येणार नाही. आणि मुक्त बाजारपेठेचा पुरस्कार करायचा तर मग वीज फुकट मिळाली पाहिजे, कालव्याचे पाणी बारा महिने हवे, खतावर सबसिडी हवी, इन्कमटॅक्स नको अशा मागण्या करता येणार नाहीत. शिवाय चीनमधून येणाऱ्या कांदा-लसणावर आणि अमेरिकेच्या सफरचंदांवर आयात निर्बंध घालता येणार नाहीत.

म्हणून शेतीकडे बघताना कोणताही एकांगी विचार न करता समग्रपणे ती एक 'व्यवहार्य उत्पादक व्यवस्था' कशी होईल यादृष्टीने बघायला पाहिजे. ह्या तिन्ही शब्दांमध्ये मोठा अर्थ आहे. शेती ही निसर्गातील निव्वळ घडामोड नव्हे. जमीन, पाणी, सूर्यप्रकाश, वनस्पती, यंत्रे, जनावरे आणि माणसे यांनी मिळून बनलेली ती एक 'व्यवस्था' (सिस्टम) आहे. तिला भौगोलिक आणि प्राकृतिक सीमा आहेत आणि सभोवतालच्या पर्यावरणाशी तिचा सतत संबंध येत असतो. पण ती नुसती स्थिर किंवा जड व्यवस्था नाही तर तिच्यातून सदैव नवनिर्मिती होत असल्याने ती एक 'उत्पादक' (प्रॉडक्टिव्ह) व्यवस्था आहे. ही व्यवस्था माणसाने निर्माण केलेली आणि म्हणून मानवी समाजाचे नीतिनियम लागून असणारी आहे. तिला आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दंडक आहेत. त्यामुळे ती 'व्यवहार्य' आहे की नाही हा प्रश्न उपस्थित होतो. इथे 'व्यवहार्य' शब्दामध्ये निरंतरता (सस्टेनेबिलिटी) आणि नफ्याचे तत्व (प्रॉफिटेबिलिटी) दोन्हीही सामील आहेत.

शेतीची उत्पादकता कशी वाढेल यावर पुष्कळ विचार झाला आहे. पण हा विचार, मुंबई-दिल्लीत बसणारे नियोजनकर्ते, विद्यापीठातले अर्थ आणि कृषिशास्त्रज्ञ, राजकीय पुढारी आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी केला आहे आणि इथेच मोठी चूक झाली आहे. हा विचार प्रत्येक शेतकऱ्याने स्वतंत्रपणे करायला पाहिजे. आपली जमीन किती, आपण कोणत्या हवामानात राहतो. आपल्याला किती पाणी मिळू शकेल. आपल्या घरात मनुष्यबळ किती, भांडवल किती, आपण कोणती पिके घेऊ शकतो, त्यासाठी बाजारपेठ कुठे, तिथे भाव किती मिळेल, आपण शेतीला कशाची जोड देऊ शकतो असा समग्र विचार प्रत्येक शेतकऱ्याने केला पाहिजे. शेतकरी याबाबत विचार करत नाही, असे नाही पण हा विचार सुटा सुटा आणि तात्पुरता असतो. आपली शेती ही एक उत्पादक 'व्यवस्था' आहे. तिच्यामध्ये जमीन, पाणी, सूर्यप्रकाश, वनस्पती, जनावरे, यंत्रे आणि माणसे यांचा सुयोग मेळ घालायचा आहे आणि तसे करून ती व्यवहार्य करायची आहे, असा समग्र विचार फारच थोडे शेतकरी करतात. बहुतेकजण शेती हा आपला दैवजात धंदा समजून, आकाशाकडे बघत, निमूटपणे नांगर ओढत राहतात.

शेतकऱ्याला शेतीकडे बघण्याची ही नेमकी दृष्टी देणे हे आजच्या किंवा उद्याच्या ग्रामीण विकासनीतीचे प्रमुख उद्दिष्ट असायला हवे. आपल्या शेतकऱ्यांकडे अनुभव प्रचंड आहे पण तो एकारलेला आहे. बहुसंख्य शेतकऱ्यांची दृष्टी शेती हे तगून निघण्याचे साधन अशी राहिलेली आहे. हे अर्थात परिस्थितीमुळे घडलेले आहे. पंजाब-हरियानासारखी परिस्थिती इथे असती तर इथल्या शेतकऱ्याची मानसिकताही निराळी झाली असती. पण महाराष्ट्राचा मोठा भाग कायम दुष्काळी छायेत असतो, इथला पाऊस लहरी आणि अपुरा आहे, पाण्याच्या वाटपाची पध्दत असमान आणि अन्याय्य आहे या कारणांमुळेच शेतीकडे बघण्याची दृष्टी बदलण्याची गरज आहे.

शेती व्यवहार्य व उत्पादक होण्यासाठी ज्या गोष्टी समाजाने, राज्यसंस्थेने वा बाजारपेठेने करायला पाहिजेत - म्हणजे पाण्याची उधळपट्टी थांबवणे, त्याचे न्याय्य वाटप करणे, पाणलोटक्षेत्राचा विकास करणे, सहकारी पद्धतीने विक्री करणे इत्यादी - त्या तर व्हायलाच हव्यात पण त्या करून झाल्यावर मुख्य निर्णय मात्र शेतकऱ्याने स्वत: घ्यायचा आहे. शेतकऱ्यांनी तसा तो निर्णय घेण्यात आणि त्यानुसार कृती करण्यात ग्रामीण विकासाचे सूत्र दडलेले आहे.

याच नाण्याची दुसरी बाजू अशी की सर्व उपाय करूनही आणि पुरेसा काळ वाट बघूनही जर शेती व्यवहार्य ठरत नसेल तर मग तिचा मोह सोडून उपजीविकेचे इतर मार्ग स्वीकारणे योग्य ठरेल. ज्या ठिकाणचे पर्यावरण शुष्क आणि वाळवंटासारखे झालेले आहे. भगीरथ प्रयत्न करूनही पाण्याची सोय होऊ शकत नाही, जमिनीचे अगदी लहान तुकडे झाले आहेत किंवा शेती करायला कर्ते स्त्री-पुरुष नाहीत तिथे शेतीचा अट्टाहास करणे चुकीचे आहे. दुष्काळी,

कोरडवाहू शेतकरी पोटापुरते तरी धान्य मिळावे म्हणून निकराने वर्षानुवर्षे शेती करत राहतात. पण त्यामुळे त्यांच्याभोवतीचा गरिबीचा विळखा अधिकाधिक घट्ट होत जातो. ज्यांना शेती व्यवहार्य वाटत नाही त्यांनी त्यातून बाहेर पडण्यात काहीच गैर नाही.

मात्र याबरोबरच सध्या उत्पादक असलेल्या आणि काही प्रयत्न केले तर व्यवहार्य होऊ शकणाऱ्या कृषिव्यव्यवस्था चुकीच्या धोरणापायी आपण उद्ध्वस्त तर करत नाही ना याची खबरदारी राज्यसंस्थेने घ्यायला पाहिजे. कोकणासारख्या अनुकूल हवामानाच्या प्रदेशात आणि जंगलक्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी समूहाबाबत ही शक्यता जास्त उद्‌भवते. ज्या विकासप्रकरणांचा स्थानिक जनतेला फायदा नाही अशा प्रकल्पांमुळे कृषिव्यवस्था नष्ट करण्याचे धोरण अन्यायकारी तर आहेच पण ग्रामीण विकासालाही मारक ठरणारे आहे. ज्या प्रदेशात कृषिव्यवस्था व्यवहार्य नाही अशा ठिकाणीच या प्रकल्पांचा विचार व्हावा.

आपली शेती उत्पादक आणि व्यवहार्य करण्याचा निश्चय शेतकऱ्याने केला की मग त्या शेतीच्या तंत्राचा तपशील ठरवणे सोपे जाते. याबाबत आता पुष्कळच प्रयोग झाले आहेत आणि अनेक हुशार व कर्तबगार शेतकऱ्यांनी ते यशस्वी करून दाखवले आहेत. अशा व्यवस्थेमध्ये फक्त भूसार धान्ये किंवा उसासारखी व्यापारी पिके असा एकांगी दृष्टिकोण न ठेवता तांदूळ, गहू, ज्वारी, नाचणी, हरभरा, उडीद, भुईमूग, सूर्यफूल, सोयाबिन, घेवडा, गवार, सुरण, कांदा, लसूण, आंबा, डाळिंब, दूध. लोणी, अंडी, मटण, चिकन, पोर्क, मासे, सुबाभूळ, बांबू, मश्रूम, झेंडू, जरबेरा अशा विविध पदार्थांची निर्मिती होते. यातील प्रत्येक पदार्थ हा एका विशिष्ट पीकपद्धतीचे किंवा उत्पादनतंत्राचे प्रतिनिधित्व करतो. एकाच ठिकाणी हे सर्व करता येणार नाही. पण जेवढ्या शक्य होतील तेवढ्या घटकांचा योग्य प्रकारे मेळ घातल्यास उत्पादन व्यवस्था अर्थपूर्ण होते हे नवीन प्रयोगांमधून दिसून आले आहे.

ह्या दृष्टिकोणाची व्यावहारिक बाजू काय आहे ? कोकणात भरपूर पाऊस पडतो. तिथे वर्षभर हवेत आर्द्रता असते, मुळात तो दाट जंगलांचा प्रदेश. तिथल्या जैविक विविधतेचे रक्षण करून फळे, भाजीपाला, इमारती लाकूड आणि मासे यांचे फायदेशीर उत्पादन-तंत्र तिथे निर्माण करता येईल. तिथे बाजारपेठेची अडचण अजिबात नाही. मात्र औद्योगिकीकरणाच्या विचित्र कल्पनांपोटी तिथले पर्यावरण उद्ध्वस्त होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. शिवाय तिथल्या आदिवासी समूहांचे जमिनीचे हक्क अबाधित राहतील याचीही. विदर्भातील पाऊसमान बरे आणि भरवशाचे आहे. तिथल्या जमिनीची प्रत चांगली आहे. जमिनीचा आकारही तुलनेने मोठा आहे. नैसर्गिक शेती करण्यासाठी तो आदर्श प्रदेश आहे. तसे तिथल्या शेतकऱ्यांनी सुरु केलेलेही आहेत. मातीची धूप थांबवून गाव-तळ्यांमार्फत पाण्याची साठवण केल्यास तिथली शेती उत्पादक होईल. मराठवाडा दुष्काळी प्रदेश आहे पण मध्य महाराष्ट्रापेक्षा तिथे जमिनीची आकार व पाऊसमान उजवे आहे. मराठवाड्याची मुख्य समस्या म्हणजे तिथल्या शेतीत भांडवली गुंतवणूक कमी आहे. पाणलोटक्षेत्रविकासाच्या माध्यमातून ती केली तर गवताचे उत्पादन आणि उत्कृष्ट वाणाच्या देशी जनावरांची निपज या माध्यमातून तिथल्या शेतीची सुधारणा करणे शक्य आहे. मध्य महाराष्ट्र हा पर्जन्यछायेतील मुरमाड मातीचा दुष्काळी प्रदेश आहे; पण त्याच्याशेजारी पश्चिम घाटात भरपूर पाऊस पडतो. ब्रिटिश काळात पश्चिम घाटात मोठी धरणे दुष्काळ हटवण्यासाठी बांधण्यात आली. पण त्यानंतर या कल्पनेला मूठमाती देण्यात येऊन तिथे ऊस लावण्यात आला. त्यातून निर्माण झालेल्या साखरसम्राटांनी पाण्याच्या माध्यमातून सत्ता व संपत्ती काबीज केली. दुष्काळी तालुक्यात उसाचे पीक घेणे यासारखा गुन्हा नाही आणि त्या उसापासून दारु तयार करणे हे तर निव्वळ पाप आहे. सध्या बहुतेक साखर कारखान्यांचा फायदा हा दारू बनवण्यावर आहे. दुष्काळी प्रदेशातल्या लोकांचे पाणी हिसकावून घ्यायचे आणि त्याऐवजी त्यांना दारू पाजायची

असले हे घृणास्पद राजकारण आहे. हे राजकारण करणारे पुढारी समाजात उजळ माथ्याने मिरवत असतात आणि साहित्य संमेलने भरवून लोकांना सुसंस्कृतपणाचे धडे देत असतात. आता हे साखर कारखाने इथेनॉल तयार करून पेट्रोल सोबत पुरवणार आहेत. म्हणजे पावसाच्या पाण्यावर कबजा करायचा, त्यातून ऊस लावायचा, त्याच्या रसापासून अल्कोहोल तयार करायचे आणि त्यावर मोटारी चालवायच्या. पाण्यावर मोटारी चालवण्याची ही ग्रेट मराठी जादू आहे !

महाराष्ट्रातील शेतीपुढच्या समस्यांचा अभ्यास करून पुढच्या २५ वर्षांची योजना बनविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जगप्रसिध्द कृषिशास्त्रज्ञ प्रा. एम. एस. स्वामीनाथन् यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती नेमली होती. त्या समितीचा अहवाल नुकताच सादर झाला आहे. महाराष्ट्रातील शेतीची दुरवस्था सुधारण्यासाठी या समितीने काही नेमक्या आणि बऱ्याच लंब्याचौड्या सूचना केल्या आहेत. त्यातली रोजगार हमी योजनेमार्फत फळबागा करण्याची योजना शासनाने भ्रष्टाचार न करता राबवली तरी मोठा फायदा होईल. पण या समितीने पाण्याच्या फेरवाटपाबद्दल 'ब्र' ही काढलेला नाही. किंबहुना समितीच्या कार्यकक्षेत हा विषय नव्हताच! पाण्याचे वाटप हेच महाराष्ट्राच्या विशेषत: मध्य महाराष्ट्राच्या शेतीची मुख्य समस्या आहे. तिला जोपर्यंत हात घातला जात नाही तोपर्यंत इंटनेटवरून शेतकऱ्यांना सल्ला देण्याच्या किंवा बायो-टेक्नॉलॉजी राबवण्याच्या योजना निरर्थक आहेत.

स्वामीनाथन् समितीने महाराष्ट्राची शेती सुधारण्यासाठी प्रचंड भांडवली गुंतवणूक लागेल असे म्हटले आहे पण त्याचबरोबर सरकारी तिजोरीत खडखडाट आहे, असेही म्हटले आहे (खंड १, पृष्ठ ५). सरकारी तिजोरीत खडखडाट असणारच. ७३ टक्के महसूल नोकरांच्या पगारांवर आणि उरलेला भ्रष्टाचारात खर्च केल्यावर दुसरे काय होणार? त्यात एन्रॉनसारखे घोटाळे आहेतच. समितीने असेही म्हटले आहे की सरकारकडे पैसा नसल्याने पुढच्या २५ वर्षांत शेतीमधली ९० टक्के गुंतवणूक ही खाजगी म्हणजे शेतकऱ्यांना स्वत:ला करावी लागेल. (खंड २, पृष्ठ २४५). याचाच अर्थ असा की आपली शेती उत्पादक आणि व्यवहार्य आहे की नाही याचा निर्णय शेतकऱ्याला वैयक्तिकरीत्या करावा लागेल.

शेती व्यवहार्य करण्याच्या योजनेत ज्यांच्याकडे शेतीच नाही अशा लक्षावधी ग्रामीण शेतमजुरांचे काय असा प्रश्न साहजिकच कुणाच्याही मनात येईल. यामध्ये अर्थातच सर्व उपाय करूनही ज्यांना शेती परवडत नाही अशा लहान शेतकऱ्यांचाही समावेश होईल. शेतीची व्यवस्था उत्पादक आणि फायदेशीर झाल्यास त्यात अनेक शेतमजूर खरे तर सामावले जातील. जे जाणार नाहीत त्यांच्यासाठी प्रचलित व्यवस्थेत दोन मार्ग आहेत. एक म्हणजे रोजगार हमीसारख्या योजनेत सातत्यपूर्ण मजुरी आणि दुसरे म्हणजे स्वयंरोजगाराच्या संधी. विकासाच्या अर्थशास्त्रात हे मार्ग बहुतेकवेळा हे किंवा ते अशा द्वंद्वात्मक पद्धतीने समोर आणले जातात आणि हे चांगले की ते अशा रीतीने त्यांच्या गुणदोषांची चर्चा केली जाते. पण तसा वाद निरर्थक आहे. हे दोन्ही मार्ग रोजगारासाठी आवश्यक आहेत. अकुशल, अर्धशिक्षित, कोणतेही भांडवल नसलेल्या पण धडधाकट व्यक्तीला सातत्यपूर्ण रोजगार मिळणेच आवश्यक आहे, तर जिच्या अंगात काही हुन्नर, धडाडी आणि हुशारी आहे अशा व्यक्तीला स्वत:चा धंदा, व्यवसाय सुरु करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. मात्र स्वतंत्र धंदा करणे ही जशी विकासाची प्रक्रिया आहे, तसे मजुरी करण्याचे नाही. मजुरी हा आपद्धर्म किंवा तात्पुरती व्यवस्था आहे. जे आई-बाप मजुरी करून मुलाबाळांचे पोट भरतात त्यांच्या मुलांनीही तसेच करावे, हे विकासाच्या संकल्पनेत बसणारे नाही. तर आई-बाप मजुरी करतील त्या दहा वर्षांच्या काळात मुलांनी किमान माध्यमिक शिक्षण घेऊन नोकरी-धंदा-व्यवसाय अशा निराळ्या उद्योगात पाऊल टाकले पाहिजे. तसे झाले तरच आई-बापांचे श्रम सार्थकी लागतील.

स्वतंत्र वा जोडधंदा व्यवसाय करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला भांडवलाची साथ न मिळणे ही महाराष्ट्राच्या समाजव्यवस्थेतील एक मोठी कमतरता राहिलेली आहे. कोरडवाहू शेतीतून भांडवलाची निर्मिती न होणे हे त्यांचे पहिले कारण आणि अशा धंदेव्यवसायाची परंपरा नसणे हे दुसरे. यावर उपाय म्हणून सहकारी प.त पुरवठ्याची चळवळ महाराष्ट्रात सुरू झाली. तिला बऱ्याच प्रमाणात यश मिळाले पण नंतरच्या काळात स्वार्थी राजकारणाने तिचा कब्जा घेतला. सहकारी पतपुरवठ्याचाच नवीन आविष्कार म्हणजे स्त्रियांच्या बचतगटांची चळवळ. ही चळवळ खेडोपाड्यात चांगले मूळ धरते आहे. स्त्रियांचे धन स्त्रियांकडेच ठेवण्याची आणि त्याचा व्यवहार्य, उत्पादक कामांसाठी उपयोग करून विकासाची प्रक्रिया गतिमान करण्याची मोठी ताकद या चळवळीमध्ये आहे. ग्रामीण भागातील पतपुरवठ्याची उणीव या चळवळीमुळे भरून निघेल आणि सरकारी बँकांकडील तुंबलेला पैसाही मोकळा होऊ शकेल. ज्यांना परंपरेने सामाजिक दर्जा व आर्थिक पत नाकारली आहे अशा भटक्या व विमुक्त समाजातील हुशार, तडफदार स्त्री-पुरुषांना या चळवळीचा मोठा फायदा होऊ शकेल, मात्र बचतगटांची चळवळ ही लिंगभाव समानतेच्या चळवळीसोबत हातात हात घालून जायला हवी. घरातल्या बाईची बचत व पत वापरताना तिला जमिनीच्या मालकीत व इतर संपत्तीतही निम्मा हक्क दिला तरच ही चळवळ फलदायी होईल.

शेतीतील सुधारणा असो वा स्वयंरोजगाराचे स्वप्न, त्यासाठी मूलभूत गोष्ट म्हणजे शिक्षण. दुर्दैवाने ग्रामीण भागात शिक्षणाचा जेवढा विचका झाला आहे तेवढा कशाचा नाही. याचे खापर सरकारवर फोडणे शक्य आहे, पण खरे कारण म्हणजे ग्रामीण आई-बापांनी मुलांच्या शिक्षणाकडे केलेले दुर्लक्ष. या दुर्लक्षामुळेच ग्रामीण समाजाला शिक्षणयंत्रणेवर वचक ठेवता येत नाही आणि त्या शिक्षणाचा दर्जा घसरत जातो. हे शिक्षण अनाकर्षक व कंटाळवाणे तर आहेच पण त्यातली मुख्य त्रुटी म्हणजे हातातील कौशल्य वाढवण्यासाठी त्याचा काहीही उपयोग नाही. किंबहुना ज्या आदिवासी-दलित मुलांच्या हातात कौशल्य आहे ते हरवून कसे टाकता येईल याच दिशेने हे शिक्षण जाते. ग्रामीण भागात रोजगार हमीवर सुशिक्षित मुले काम करताना दिसतात. 'बघा, बी.ए, एम्.ए. होऊनसुद्धा आम्हाला खडी फोडायचे काम करावे लागते.' असे ते हताशपणे म्हणतात. हाताने काम करण्यात खरे तर नामुष्की नाही आणि एम्.ए. च्या शिक्षणाशी त्याचा काही संबंधही नाही. पण एम्. ए. होईपर्यंतच्या काळात पंक्चर काढण्याचेसुद्धा शिक्षण घेतले नाही ही खरी नामुष्की आहे. ग्रामीण भागात इंजिनिअरिंगची कॉलेजेस् निघाली पण पुरेशा तांत्रिक शाळा किंवा आय. टी. आय. निघाल्या नाहीत. महाराष्ट्रातील गरिबी आणि शेतकऱ्यांची आर्थिक क्षमता लक्षात घेता पहिल्या फेरीत तांत्रिक शाळा व तंत्रनिकेतने काढून मग कॉलेजेस काढायला हवी होती. म्हणजे त्या कॉलेजेसचा फायदा केवळ उत्तर भारतातील धनिकांच्या मुलांना न होता स्थानिक शेतकऱ्यांच्या मुलांनाही झाला असता.

तरुण मुलांच्या हातात तंत्र-कौशल्य नसणे हा विकास प्रक्रियेतील मोठा अडसर आहे. जपान, चीन, तैवान, उत्तर कोरिया अशा देशांनी झपाट्याने जी प्रगती केली तिचे कारण त्यांनी आपल्या नागरिकांच्या हातात असे कौशल्य दिले, हे आहे. शेतीवरचा माणसांचा बोजा कमी करायचा असेल तर तांत्रिक शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. मात्र हे तांत्रिक शिक्षण केवळ शहरातील कारखान्यात काम मिळण्यासाठी घ्यायचे नसून ज्या व्यवस्थेत कारखान्यात काम मिळण्यासाठी घ्यायचे नसून ज्या व्यवस्थेत असू तेथील काम अधिक कौशल्याने करण्यासाठी व संशोधकीय दृष्टी जागवण्यासाठीसुद्धा आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. व्यक्तिमत्व विकासाचे शिक्षण हे मातृभाषेतूनच घ्यायला पाहिजे हे उघड आहे; त्याबाबत कोणतीही शंका नको पण त्यासोबत चांगले इंग्रजी व गणित शिकले पाहिजे. ग्रामीण भागात या विषयांची फार हेळसांड होते. मुख्य म्हणजे या विषयांवर विद्यार्थ्यांना, मेहनत घ्या, असे सांगण्याऐवजी कॉपी करण्याचे दरवाजे खुले करून दिले जातात. ग्रामीण

विकासासाठी इंग्रजी व गणिताचे ज्ञान अनिवार्य आहे. गणिताच्या योगाने भौतिकशास्त्रे, अर्थव्यवहार आणि संगणकाचे ज्ञान होईल तर इंग्रजीच्या परिचयाने सरंजामी बुरसटलेपणा जाऊन मनोवृत्ती अधिक प्रगल्भ, मोकळी आणि सुसंस्कृत होईल.

ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी ग्रामीण उद्योगांची निर्मिती झाली पाहिजे असे मत अनेकदा मांडले जाते. उपजीविकेचे बिगर-कृषी साधन अशी जर त्यामागची कल्पना असेल तर ती योग्य आहे; पण वस्तुत: उद्योगांमध्ये ग्रामीण व शहरी असा भेद नसतो. उद्योग हे नैसर्गिक साधनांवर प्रक्रिया करणारी यंत्रणा असते. ते शहरात असू शकतात तसेच खेड्यातही पिठाची चक्की, लोखंडी खिडक्या बनवणारे वर्कशॉप, पावाची बेकरी जशी खेड्यात असू शकते तशी शहरातही. ग्रामीण उद्योग याचा अर्थ छोटे, घरगुती उद्योग असा असेल तर असे उद्योग शहरातच मोठ्या प्रमाणावर असतात. ग्रामीण उद्योग याचा अर्थ कृषी-आधारित उद्योग म्हणजे कृषीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग असा असेल, तर त्यांना एकूण अर्थव्यवस्थेमध्ये निश्चितच स्थान आहे. मग ते उद्योग शहरात असोत की खेड्यात. दुधापासून आईस्क्रिम बनवणारा किंवा संत्र्यापासून जॅम बनवणारा उद्योग कृषिव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे पण म्हणून त्याला ग्रामीण उद्योग म्हणता येईल असे नाही. सारांश, शेतीला उद्योगाची जोड हवी पण ते उद्योग कोणते? कशा प्रकारचे आणि कुठे असायला हवेत ? हे त्या उद्योगांच्या उत्पादकतेवर, व्यवहार्यतेवर आणि देश-काल-परिस्थितीवर अवलंबून राहतील.

ग्रामीण कृषिव्यवस्था ही नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असल्याने त्या संपत्तीवर अधिकार कोणाचा हा प्रश्न या निमित्ताने साहजिकच समोर येतो. याबाबतीत सध्या दोन विचारप्रवाह आहेत. एक विचार म्हणतो की अशी सर्व संपत्ती ही राष्ट्राच्या मालकीची समजायला हवी आणि तिचा वापर व वाटप करायचा अधिकार केंद्र सरकारला असायला हवा. तर दुसरा विचार असे मानतो की त्या त्या ठिकाणच्या साधनसंपत्तीवर त्या त्या मानवसमूहाचा अधिकार असायला हवा आणि त्यांच्या अनुमतीशिवाय त्याचा वापर होऊ नये. पाणी, जंगले, खनिजे इत्यादी सादनसंपत्तीबाबत या दोन विचारगटांकडून हिरीरीने परस्पराविरोधी भूमिका मांडल्या जातात.

एक सर्वसाधारण, तटस्थ नागरिक म्हणून आपण या वादाकडे पाहिले तर असे दिसेल की या दोन्ही भूमिका सत्य आहेत आणि त्यामध्ये परस्पराविरोधी असण्याची आवश्यकता नाही. नदीसारखी साधनसंपत्ती जेव्हा दोन-तीन राज्यांमधून जाते तेव्हा तिला राष्ट्रीय संपत्ती समजले पाहिजे आणि राष्ट्रीय सहमतीने तिचे वाटप केले पाहिजे. या उलट एखाद्या गावातले तळे हे त्या गावची संपत्ती समजून त्याच्या वापराचा अधिकार त्या गावाच्या ग्रामसभेकडे असला पाहिजे. अर्थात हा प्रश्न इथेच थांबत नाही. समजा एखाद्या आदिवासी पाड्याखाली बॉक्साईडची खाण सापडली तर ? ती त्या आदिवासी पाड्याची संपत्ती मानता येईल का ? बॉक्साईड हे भूगर्भातील निसर्गनिर्मित खनिज असल्याने ती आपोआप त्या आदिवासी पाड्याची संपत्ती मानता येणार नाही हे उघड आहे. पण त्याच वेळेला त्या बॉक्साईडच्या खाणीतून अॅल्युमिनियमचा धूर बाहेर पडत असताना त्या आदिवासींना मात्र भुकेकंगाल राहावे लागणे हेही मान्य होणारे नाही.

पण दुर्दैवाने तसे होते म्हणून बॉक्साईडवर अधिकार कोणाचा हा प्रश्न ऐरणीवर येतो. या प्रश्नाचे उत्तर त्या आदिवासींना प्रकल्पग्रस्त ठरवून आणि त्यांच्या तोंडावर चार नोटा फेकून देता येणार नाही. तर राष्ट्राचे सन्मान्य नागरिक म्हणून त्यांच्या उदरनिर्वाहाची पूर्ण सोय लावून आणि त्यांना त्यांच्या मानवी क्षमतांचा पूर्ण विकास करण्याची संधी देऊन शोधावे लागेल. मात्र त्याबरोबरच केवळ ते तिथे राहतात म्हणून त्या संपत्तीचे तेच मालक आहेत असेही समजता येणार नाही. कारण अशीच खाण उद्या अंबानींच्या घराखाली सापडली तर ?

(पृष्ठ ४८ वर पहा)

# आदिवासी धोरणाचा पर्यायी मसुदा

## १. प्रस्तावना

भारत सरकारच्या आदिवासी मंत्रालयातर्फे प्रथमच आदिवासींसाठी राष्ट्रीय धोरण तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या धोरणाचा एक मसुदा सरकारने प्रसिद्धीसाठी त्यांच्या वेबसाईटवर ठेवला असून त्यावर भारतातील आदिवासी भाग असणारी राज्य सरकारे, अभ्यासक आणि कार्यकर्ते यांच्याकडून सूचना आणि प्रतिक्रिया मागवण्यात आल्या आहेत.

आदिवासी धोरणाच्या आधारावरच आदिवासींच्या विकासासाठीचे केंद्र आणि राज्य स्तरावरील कार्यक्रम आणि योजना आकारास येणे अपेक्षित असल्याने या धोरणाचे महत्त्व आदिवासी जनतेच्या दृष्टीने अनन्यसाधारण आहे. या विषयावर व्यापक व सहभागी चर्चा व्हावी या उद्देशाने महाराष्ट्रात काम करणारे अभ्यासक आणि संस्था संघटनांचे कार्यकर्ते यांचे एक चर्चासत्र पुणे येथे दि. ८ व ९ मे २००४ रोजी आयोजित केले होते. हे चर्चासत्र महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, शोषित जन आंदोलन (महाराष्ट्र), आणि प्रयास-संसाधने व उपजीविका गट, पुणे या तीन संस्थांनी संयुक्तपणे आयोजित केले होते.

या चर्चासत्रामध्ये सरकारने प्रसिध्द केलेल्या धोरणाचा समुदा आणि आदिवासींच्या विविध प्रश्नांवरती व्यापक विचारविनिमय झाला. या चर्चेच्या दरम्यान, आदिवासींचे विकासविषयक प्रश्न सोडवण्यासाठी सरकारी धोरणात समाविष्ट व्हाव्यात या उद्देशाने सहभागींनी अनेक सूचना मांडल्या. या सर्व सूचना आणि धोरणसूत्रे संकलित करुन प्रस्तुत मसुदा तयार केला आहे. या चर्चासत्रातून पुढे आलेल्या सूचनेनुसार हा मसुदा महाराष्ट्राच्या इतर भागांमध्ये, विभागवार होणाऱ्या कार्यशाळांसाठी आधारभूत टिपण म्हणून उपयोगी पडेल व राष्ट्रीय या धोरणावरील चर्चा पुढे नेण्यास उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

## २. आदिवासींच्या सद्यस्थितीचे वर्णन

स्वातंत्र्यानंतर प्रथमच भारत सरकारने अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय धोरण ठरविण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे. अनुसूचित जमातींची एकूण लोकसंख्या ६७.८ लक्ष म्हणजेच देशाच्य एकूण लोकसंख्येच्य ८.०८% एवढी आहे. राज्य घटनेच्या ३४ व्या कलमानुसार राष्ट्रपतींनी प्रमाणित केलेल्या जमातींना अनुसूचित जमाती म्हणून ओळखले जाते. जमातींना 'अनुसूचित जमाती' म्हणून घोषित करण्याआधी त्यांच्या काही गुणवैशिष्ट्यांचा विचार केला जातो. जसे की, आदिमपणाची लक्षणे/मागासपणाच्या खुणा, वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, बुजरेपणा, भौगोलिक वेगळेपणा आणि सामाजिक व आर्थिक मागसलेपणा ६९ पैकी ७५ अनुसूचित जमाती आदिम / पुरातन म्हणून ओळखल्या जातात. इतर अनुसूचित जमातींच्या तुलनेने त्या अप्रगत असतात.

राज्यघटनेत अनेक कलमांच्या माध्यमातून अनुसूचित जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासाची तसेच सबलीकरणाची तरतूद केलेली आहे. पण या घटनात्मक तरतुदी प्रत्यक्षात येण्यासाठी मदत करु शकेल असे कोणतेही राष्ट्रीय धोरण अस्तित्वात नाही. १९५२ मध्ये विशद केलेल्या पाच मार्गदर्शक तत्वांनुसार (पंडित नेहरुंचे पंचशील तत्त्व) आदिवासींविषयक कामांचे प्रशासन चालवले जाते.

**पाच मार्गदर्शक तत्त्वे याप्रमाणे :**

१) आदिवासींना त्यांच्या स्वत:च्या क्षमता आणि प्रतिभेनुसार विकासाची संधी मिळावी.

२) आदिवासींच्या जंगल व जमीन यांच्यावरील अधिकारांचा आदर केला जातवा.

३) प्रशासकीय आणि कामांसाठी अनेक बिगर-आदिवासींऐवजी आदिवासी गटांनाच प्रशिक्षण दिले जावे.

४) आदिवासींच्या सामाजिक-सांस्कृतिक संस्थांना बाधा न आणता विकासविषयक कामे केली जावी.

५) आदिवासी विकासाचा निर्देशक त्यासाठी खर्च झालेला पैसा हा नसून, आदिवासींच्या जीवनमानाचा दर्जा हा असावा.

बहुसंख्य अनुसूचित जमाती दारिद्र्यरेषेखालील जीवन जगतात, आदिवासी साक्षरतेचा दर अतिशय कमी आहे. बहुसंख्य अनुसूचित जमाती कुपोषण आणि रोगराईने ग्रस्त आहेत आणि विस्थापनालाही त्या बळी पडतात याची राष्ट्रीय धोरणाने दखल घेतलेली आहे. या मूलगामी समस्यांबरोबर इतर अनेक तीव्र प्रश्नांना आदिवासींना सामोरे जावे लागते. सरकारच्या मसुद्यामध्ये अशा तेरा प्रश्नांची चर्चा केली आहे. त्या प्रश्नांची चार गटात विभागणी करुन त्यावरील मसुद्यातील चर्चेचा सारांश येथे दिला आहे.

**आर्थिक प्रश्न**

**विस्थापन आणि पुनर्वसन :** पूर्वापार चालत आलेल्या निवास-स्थानांमधून विस्थापन होणे हा विस्थापितांवर एक जबर आघात असतो. जमीन बळकावली गेल्यामुळे आदिवासींना त्यांचे राहण्याचे पारंपरिक ठिकाण तर गमवावे लागतेच, तसेच त्यांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असलेली जमीनही हिरावली जाते. देशातील एकूण विस्थापितांपैकी ५५.१६% विस्थापित हे आदिवासी आहेत. आदिवासींचे त्यांच्या जमिनीतून विस्थापन करण्याने राज्यघटनेच्या पाचव्या अनुसूचीचे उल्लंघन होते, कारण विस्थापनामुळे आदिवासींना त्यांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवरील मालकी हक्कांपासून आणि त्यांच्या जीवनपद्धतीचा अविभाज्य भाग असलेल्या जमिनीपासून वंचित रहावे लागते.

**जमिनीशी फारकत :** जमीन ही आदिवासींची सगळ्यात महत्त्वाची, मोलाची साधन-संपत्ती. तीच बिगर आदिवासींच्या हाती पडून त्यांचे नेहमीच शोषण होत असते. जल-विद्युत केंद्राची निर्मिती, खाणी, कारखाने अशा राज्य-शासनांनी सुरु केलेल्या विकासाच्या कामांमुळेही आदिवासी त्यांच्या जमिनींना मुकतात. जमीन हक्कांपासून आदिवासींना वंचित बनवणाऱ्या या विकासाच्या प्रकल्पांचा कुठलाही प्रत्यक्ष लाभ आदिवासींना होत नाही.

**जंगलातील गावे :** सुमारे ५०० जंगलातील आदिवासी गावांमध्ये जगण्यासाठीच्या कोणत्याही मुलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. केव्हाही हकालपट्टी होण्याची भीती या गावांना सातत्याने भेडसावते. ही परिस्थिती गंभीरपणे दखल घेण्याजोगी आहे.

**फिरती शेती :** फिरती शेती करणाऱ्या आदिवासींची जमिनीमध्ये 'विशेष लक्ष देण्याजोगी, काळजी घेण्याजोगी संपत्ती किंवा मालमत्ता' अशा प्रकारची भावनिक गुंतवणूक असल्याचे दिसत नाही. जशी ती बिगर आदिवासी गावांमध्ये दिसून येते.

**बौद्धिक संपत्तीवरील अधिकार :** वांशिक परंपरेतून आलेले ज्ञान व शहाणपण यासाठी अनुसूचित जमाती आपल्याला माहीत असतात. पण त्यांच्या बौद्धिक संपदेच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी मात्र कोणतीही कायदेशीर किंवा संस्थात्मक चौकट उपलब्ध नाही. म्हणूनच, आदिवासींच्या बौद्धिक संपदेवरील अधिकाराचे रक्षण करण्यासाठी आणि त्याच्या साधनसंपत्तीचा वापर व तिचे शोषण करण्याच्या औद्योगिक व इतर संस्थाच्या अधिकारावर मर्यादा आणण्यासाठी कायदेशीर व संस्थात्मक तरतुदी करणे आवश्यक आहे.

**सामाजिक प्रश्न**

**औपचारिक शिक्षण :** औपचारीक शिक्षण ही माणसाच्या सर्वांगीण विकासाची किल्ली आहे. आदिवासींना शिक्षण मिळण्यामध्ये विविध अडथळे आहेत. समाजापासूनचा तुटलेपणा, शाळा, वसतिगृह, शिक्षक अशा आवश्यक शैक्षणिक सुविधांचा अभाव, आत्यंतिक गरिबी आणि विसंगत अशा अभ्यासक्रमाबाबतची उदासीनता.

आरोग्य कुपोषण, पिण्याच्या स्वच्छ व शुद्ध पाण्याचा अभाव, अस्वच्छता आणि सांडपाण्याच्या निचऱ्याची अपुरी व्यवस्था, भरीस भर म्हणून गरिबी या सगळ्यांमुळे बहुसंख्य आदिवासींना आरोग्य सेवेची नितांत गरज असते.

### सांस्कृतिक प्रश्न

**आदिवासी भाषा :** आदिवासींच्या बोली-भाषा अप्रमाणित म्हणून गणल्या जातात. बदलत्या शैक्षणिक परिस्थितीत अनेक आदिवासी भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

**आदिम आदिवासी जमाती :** (Primitive Scheduled Tribes) आदिवासी आदिवासी जमातींची घटती लोकसंख्या, साक्षरतेचे अत्यल्प प्रमाण, प्रामुख्याने 'शिकार करणे-अन्न गोळा करणे' या शेती-पूर्व काळातील तंत्रज्ञान आणि आत्यंतिक मागासलेपणा यामुळे ओळखल्या जाणाऱ्या अनुसूचित जमाती म्हणजेच पुरातन/आदिम आदिवासी गट. या गटांची एकूण लोकसंख्या २५ लाख इतकी आहे. ही लोकसंख्या आदिवासी लोकसंख्येच्या ३.६% इतकी तर देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ०.३% इतकी आहे.

**पारंपरिक शहाणपण :** गेली अनेक शतके आदिवासींनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शाश्वत पद्धतींनी उपजीविका चालविण्याचा विपुल आणि मौल्यवान असा अनुभव मिळवलेला आहे. त्यांच्या अमूल्य ज्ञानाची सुयोग्यपणे नोंद करुन त्याचे जतन करणे आवश्यक आहे.

### राजकीय प्रश्न

**अनुसूचित जमाती आणि अनुसूचित भाग :** अनुसूचित आणि आदिवासी भाग निश्चित करण्यासाठी स्वीकारलेली संकल्पना आणि त्याची पद्धती याबाबत राज्यघटनेला पुरेशी स्पष्टता असली तरी तिची अंमलबजावणी करण्यांमध्ये मात्र त्याबाबत काहीसा गोंधळ आहे.

**संशोधन :** आदिवासींचे वांशिक तपशील, त्यांच्या प्रश्नांची व्याप्ती आणि संभाव्य प्रश्न, विकास-प्रक्रियेतील अडथळे, योजना आणि प्रकल्पांचे पर्यवेक्षण आणि मूल्यमापन यांसारख्या विषयांवरील संशोधनांकडे अग्रक्रमाने लक्ष देण्याची गरज आहे.

**प्रशासन :** कामाची गुणवत्ता आणि विकासाचे निकष या दोन्हींच्या संदर्भात सध्याच्या राज्यातील आणि जिल्ह्यातील प्रशासन यंत्रणेची कामगिरी समाधानकारक नाही.

### ३. समस्यांची कारणमीमांसा

सरकारी मसुद्यात या तेरा प्रश्नांची कारणमीमांसा न करता त्या प्रत्येक प्रश्नावर वेगवेगळे उपाय सुचवले आहेत. परिणामी, मसुद्यातील धोरणामध्ये तुटकपणा, विखुरलेपणा आला आहे. अशा तुटक व विखुरलेपणामुळे आदिवासींच्या मूळ समस्यांना हात घालण्याची ताकद धोरणामध्ये येत नाही. अर्थात , त्यासाठी या तेरा प्रश्नांच्या गाभ्यामध्ये कोणती कारणे आहेत याची मीमांसा स्पष्टपणे मांडायला हवी. मसुद्यावरील चर्चेमधील मांडणीप्रमाणे आदिवासी समाजाला भेडसावणाऱ्या या तेरा व इतर प्रश्नांच्या मुळाशी आदिवासी समाजाची विविधांगी (म्हणजे आर्थिक, सामजिक, सांस्कृतिक व राजकीय) दुर्बलता हे कळीचे कारण आहे. आदिवासींचे कुपोषण, निरक्षरता, दारिद्र्य व इतर सारे प्रश्न हे या विविधांगी दुर्बलतेचे परिणाम आहेत. आदिवासी समाजासमोरील समस्यांची कारणमीमांसा करताना ह्या विविध प्रकारच्या दुर्बलतेचे विश्लेषण करावयास हवे.

**आर्थिक दुर्बलता :** आर्थिक दुर्बलतेच्या अनुषंगाने आदिवासींच्या सद्यस्थितीकडे पाहिल्यास यामध्ये प्रामुख्याने तीन प्रकारच्या अडचणी जाणवतात.

१. आदिवासी विकासाचा आर्थिक अंगाने विचार केल्यास आदिवासी विकासाचे धोरण आणि कार्यक्रम यावर औद्योगीकरणावर आधारित विकासाच्या प्रस्थापित प्रतिमानाचा प्रभाव असल्याचे दिसून येते. या प्रक्रियेला जोडूनच देशात सुरु असणाऱ्या आर्थिक सुधारणांचा (खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण) आदिवासींची उपजीविका आणि सर्वांगीण विकास यावर दूरगामी परिणाम होत आहे. या तीन धोरणांतर्गत आदिवासींच्या नैसर्गिक संसाधनांवरील हक्कांना बाधा पोचवणारे अनेक कायदे व धोरणे अंमलात आणली जात आहेत. ह्या व्यापक धोरणांचा परिपाक म्हणून अधिकच गतिमान व अनिर्बंध होत असलेले औद्योगीकरण व त्याला जोडून होणाऱ्या प्रदूषणामुळे आदिवासींच्या जगण्याचा मुख्य आधार असणाऱ्या नैसर्गिक स्थिती खालावत चालली आहे.

व्यापारासाठी मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वैद्य आणि अवैद्य जंगलतोडीमुळे वनउपज व पाण्याची उपलब्धता कमी होत असून सिंचनासाठी आवश्यक असणाऱ्या व त्याबरोबरच पिण्याची पाण्याची कमतरता वाढते आहे. या सगळ्याचा दुष्परिणाम सर्वप्रथम आदिवासी लोकांच्या उपजीविकेवर होत आहे.

२. नैसर्गिक संसाधनांवर (जमीन, जंगल, पाणी, वन्यजीव) आदिवासींचा असणारा कायदेशीर/परंपरागत मालकी हक्क तसेच वापराचा/वहिवाटीचा हक्क यावर गदा येते आहे. देशात अनेक ठिकाणी सरकार हाती घेत असलेल्या मोठमोठ्या विकासप्रकल्पांमुळे आदिवासींचे विस्थापन व त्यांच्या संसाधनांवरच्या हक्कांची पायमल्ली होत आहे. या बरोबरच पुनर्वसन कायद्याची अपुरी आणि सदोष अंमलबजावणी, जमिनीच्या अपूर्ण आणि अव्यवस्थित नोंदी, जमिनीच्या हस्तांतरणाचे (आदिवासींकडून - इतर समाजाकडे) प्रश्न आणि अशा इतर अनेक कारणांमुळे आदिवासी समाजास नैसर्गिक संसाधनांवर (विशेषत: जमीन) कायद्याने व कागदोपत्री हक्क सिद्ध करण्यास प्रचंड अडचणी येत आहेत. त्याचबरोबर इतर सामूहिक मालकीची संसाधने (जसे की जंगल व पाणी) याचे संवर्धन, वापर व वाटपाबाबत आदिवासींचे हक्क व भूमिका तत्संबंधी कायदे व धोरणामधे नेमकेपणाने स्पष्ट नसल्याने उपजीविकेसाठी नैसर्गिक संसाधनांचा वापर करण्यास आदिवासींना प्रतिबंध होतो आहे. या सध्याच्या धोरणातील उणीवांमुळे आदिवासी लोकांना नैसर्गिक संसाधनांचा वापर करून उपजीविकेची पूर्ती करणे आणि समृद्ध जीविकेसाठी आर्थिक विकासाचे कार्यक्रम राबवणे या गोष्टी अशक्य ठरत आहेत.

३. तिसरा महत्त्वाचा प्रश्न रोजगाराचा आहे. नैसर्गिक संसाधनांबाबतचे प्रश्न त्याचप्रमाणे दुर्गमता, विकासाचा अभाव अशा विविध कारणांमुळे आदिवासी क्षेत्रामधे मोठ्या प्रमाणावर उपजीविकेसाठी संधी उपलब्ध नाहीत. परिणामी रोजगारासाठी होणारे हंगामी व कायमचे स्थलांतर हा आदिवासींचा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. स्थलांतरित मजुराचे कामाच्या ठिकाणी होणारे शोषण आणि अपुरी मिळकत यामुळे आदिवासींच्या आरोग्याची स्थिती खालावत असून पुढील पिढीचे शिक्षण, शारीरिक आणि मानसिक क्षमता यावर प्रचंड प्रभाव पडत आहे. याबरोबरीनेच आदिवासींच्या परंपरागत कौशल्यांना सध्याच्या आर्थिक व्यवस्थेत स्थान न राहिल्याने त्यांचे परंपरागत रोजगार आज नष्ट झाले आहेत. त्या परंपरागत रोजगारांचा आधार असणाऱ्या संसाधनांची मालकी आदिवासींकडून गैरआदिवासी समाज आणि ब्रिटिश शासनाने गेल्या शतकापासून हिसकावून घेतल्याने आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने याकडे पुरेसे लक्ष न दिल्याने आदिवासींचे आर्थिक दुबळेपण वाढत चालले आहे. आदिवासी समाजाचे प्रचलित बाजारव्यवस्थेमध्ये होणारे शोषण हेही आदिवासींमधील कौशल्यांचा अभाव आणि त्यांचे आर्थिक व मानसिक दुबळेपण याचे फलित आहे.

**सामाजिक दुर्बलता :** आदिवासी समाजाच्या दुर्बलतेच्या सामाजिक अंगामधे विशेषत: शिक्षण, आरोग्य आणि सार्वजनिक सुविधा या तीन बाबींसंबंधातील अडचणींचा समावेश केला आहे.

१. **शिक्षण :** शिक्षण हे आदिवासी समाजाची क्षमता वाढवून त्यांचे दुबळेपण घालवण्याचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. शासनाने आदिवासी दुर्गम भागांमध्ये शिक्षणाच्या सोयी काही प्रमाणात सुरु केल्या असल्या तरीही आदिवासींना दिले जाणारे शिक्षण हे त्यांना उपजीविका मिळवण्यासाठी आज उपयोगी पडत नसल्याचेच चित्र आहे. त्याचबरोबर सध्याच्या शिक्षणामुळे ग्रामीण - आदिवासी भागातील सुशिक्षित बेरोजगारांमध्ये भर पडत असल्याचे जाणवते. सामाजिकच नव्हे तर आदिवासींचे आर्थिक आणि राजकीय सबलीकरण करण्यासाठी देखील औपचारिक शिक्षणाला अनौपचारिक शिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे. परंतु शासनाद्वारे अशा प्रकारचा

प्रयत्न होताना दिसत नाही. शासनाने आदिवासींसाठी उभारलेल्या शिक्षणाच्या सोयी (आश्रमशाळा, वस्ती शाळा, जि. प. शाळा, एकशिक्षकी शाळा इ.) अपुऱ्या आहेत व तेथे पुरविल्या जाणाऱ्या सुविधा व शिक्षणाचा दर्जा याबाबत अनेक प्रश्नचिन्ह आहेत.

२. **आरोग्य :** आदिवासींच्या आरोग्याबाबतची स्थिती अजूनही अतिशय गंभीर असल्याचे दिसते. कुपोषण, बालमृत्यू, अशक्तपणा यांसारख्या समस्यांबरोबरच मलेरिया, कावीळ यांसारख्या गंभीर आजारांचे प्रमाण लक्षणीय आहे. आदिवासींमधील कुपोषणाचे प्रमाण व कमालीचे दारिद्र्य हे यामागील मूलभूत कारण आहे. आदिवासींच्या पांपरिक उपचारपद्धतीशी आधुनिक उपचारपद्धतीची सांगड घालण्यात आलेले अपयश आणि आदिवासींमध्ये आरोग्याविषयी जाणीव जागृती व आरोग्य शिक्षणाचा अभाव ही यामागील प्रमुख कारणे जाणवतात. सरकारी पातळीवरील आरोग्य अधिकाऱ्यांची अनास्था हेही आदिवासींची आरोग्याची स्थिती न सुधारण्यामागील प्रमुख कारण आहे.

३. **सार्वजनिक सुविधा :** सार्वजनिक सुविधेचे प्रश्न आदिवासी भागामध्ये अतिशय गंभीर आहेत. दळणवळणाच्या सोयी, पिण्याचे पाणी, सार्वजनिक स्वच्छता, वीजपुरवठा या बाबींच्या संदर्भात आदिवासी जीवनशैलीशी विसंगत उपाय अवलंबल्यामुळे अशा प्रकारचे शासकीय प्रयत्न यशस्वी झालेले दिसत नाहीत. या कारणाला जोडूनच सार्वजनिक सुविधेतील काही मुद्यांबाबत आदिवासींमध्ये जाणीवजागृती, शिक्षण नसल्याने अशा योजनांमध्ये त्यांच्या सहभागाचा अभाव जाणवतो.

**राजकीय दुर्बलता :** आदिवासींच्या दृष्टीने त्यांच्या विकासाची राजकीय बाजू खूप महत्वाची आहे. विकासाच्या कारभाराच्या (Governance) प्रक्रियेमधील सरकारची भूमिका व स्थान व त्याचबरोबरीने या कारभाराच्या प्रक्रियेतील आदिवासींची भूमिका व स्थान हे दोन अतिशय प्रभावशाली घटक आदिवासी समाजाच्या सध्याच्या राजकीय दुर्बलतेमध्ये महत्त्वाचे ठरतात. या परिप्रेक्ष्यामधून सध्याच्या आदिवासींच्या स्थितीकडे पाहिल्यास आदिवासींसमोर पुढील अडचणी दिसतात.

१. आदिवासींची राजकीय समज आणि राजकीय शिक्षण हा एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. आदिवासी समाजाला शासनाने राज्यकारभार आणि सरकारात राखीव मतदारसंघाच्या माध्यमातून आरक्षण व प्रतिनिधित्व दिले असले तरीही, सर्वसामान्य आदिवासी नागरिकांचे राजकीय शिक्षण न झाल्यामुळे आरक्षणाचा उपयोग त्यांना फारसा होत असल्याचे दिसत नाही. त्याशिवाय सार्वजनिक क्षेत्रे आणि पशासकीय पातळीवरती नोकऱ्यांबाबत आरक्षण असले तरीही, खाजगी क्षेत्रामध्ये आदिवासी समाजास आरक्षण नसल्याने आदिवासींना नोकऱ्यांच्या संधीपासून वंचित रहावे लागते आहे.

२. सरकारी पातळीवरती आदिवासींच्या विकासासाठी अनेक योजना असल्या तरीही योजनांची आखणी, नियोजन व अंमलबजावणीमध्ये आदिवासींची भूमिका निश्चित नसल्यामुळे या प्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग व खरेखुरे प्रतिनिधित्व नसते. त्यामुळे विकासाच्या योजनांचा अतिशय नगण्य फायदा आदिवासींना होतो. गावपातळीवरील निर्णयप्रक्रियेत आदिवासींना ग्रामसभेद्वारे काही प्रमाणात स्थान मिळाले असले तरीही आदिवासींच्या वस्त्या मूळ गावात नसून गावालगतच्या वाडा, पाडे, फलिया, टोला अशा स्वरुपात आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीमधील निर्णयप्रक्रियेमधून आदिवासी इतर समाजाच्या दबावाखाली बाहेर फेकले जातात. परिणामी ग्रामपंचायत स्तरावरील विकास योजना व इतर अधिकारी यापासून आदिवासी समाज वंचित राहतो.

३. विकासाच्या योजना अमलात आणणे सोयीचे जावे यासाठी शासनाने आदिवासी बहुल भागात प्रशासकीय

हद्दींची (अनुसूचित क्षेत्रे) रचना केली. परंतू स्थलांतराच्या प्रश्नामुळे इतर भागांमध्ये विखुरलेले आदिवासी अनुसूचित क्षेत्रामध्ये दिल्या जाणाऱ्या विकासाच्या फायद्यांपासून वंचित असल्याचे आढळते.

४. गरिबी रेषेचे सर्वेक्षण किंवा जनगणना किंवा इतर अशा महत्त्वाच्या सर्वेक्षणाच्यावेळी आदिवासींच्या जीवनशैलीशी जुळवून घेतल जात नाहीत. उदा. आदिवासी काही हंगामामध्ये स्थलांतरित झालेले असतात तेव्हा सर्वेक्षण होते. अशा सर्वेक्षणात आदिवासी समाज समाविष्ट होत नाही. गरीबीरेषेच्या आधारावर अनेक योजना निश्चित केल्या जातात, त्यामुळे अनेक आदिवासी विकास योजनांपासून वंचित राहातात. त्याचप्रमाणे आदिवासी समाजास आरक्षण असल्याने मिळणारे फायदे मिळवण्यसाठी इतर समाजातील लोकांनी बोगस आदिवासी प्रमाणपत्र मिळवल्याने आदिवासींवर अन्याय होत आहे.

**सांस्कृतिक दुर्बलता/परिघीकरण :** समाजातील आर्थिक-राजकीयदृष्ट्या ताकदवान घटकांच्या संस्कृतीपेक्षा आदिवासी समाजांची संस्कृती दुर्बल अथवा सदोष नसून उलट त्यात अनेक उन्नत घटक आहेत. मात्र आर्थिक-राजकीय दुर्बलतेमुळे आदिवासींच्या संस्कृतींना ह्या घटकांनी बाजूला टाकून दिले आहे. त्या अर्थाने त्यांचे परिघीकरण करण्यात आलेआहे. विविध कारणांनी व विविध मार्गांनी वर उल्लेखलेल्या ताकदवान घटकांच्या संस्कृतींचा आदिवासी संस्कृतीवर अनेक अंगांनी प्रभाव पडतो आहे. आदिवासी समाजातील पारंपारिक ज्ञान, समानतेची मूल्ये, त्यांच्या नीती-अनीतीच्या कल्पना या सगळ्या बाबी बदलत्या परिस्थितीमध्ये लोप पावत चालल्या आहेत. आदिवासी भाषेतील शब्दसंपदा आणि प्रत्यक्ष बोलीभाषा यावरही याचा दुष्परिणाम होतो आहे. गैरआदिवासी समाजांकडून आदिवासींचे पूर्वीपासून होत असलेले शोषण, पिळवणूक याचाही आदिवासी संस्कृतीवर विपरित परिणाम झाल्याचे आढळते. सरकारने मानवी हक्कांचे संरक्षण आणि आदिवासींचे शोषण रोखण्यासाठी काही उपाययोजना केल्या असल्या तरीही त्यांची अंमलबजावणी नीट होत नसल्याने त्याचा फारसा फायदा आदिवासींना मिळत नसल्याचे दिसते.

### ४. नव्या धोरणाच्या मसुद्यावरील सूचना / प्रतिक्रिया

आदिवासी समाजांसमोरील दारिद्र्य, कुपोषण यांसारख्या समस्या व इतर प्रश्नांच्या गाभ्याशी आदिवासी समाजाची विविधांगी दुर्बलता आहे हे आपण पाहिले. आदिवासींच्या सर्वांगीण उन्नतीच्या प्रयत्नासाठी ह्या गाभ्याच्या समस्येचा सामना करण्यासाठी आदिवासी समाजांचे विविधांगी सबलीकरण करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पाहता, कोणत्याही सरकारच्या आदिवासी धोरणाच्या गाभ्याशी आदिवासी समाजाचे सबलीकरण असे स्पष्ट व नेमके उद्दिष्ट असायला हवे. अशा गाभ्याच्या, स्पष्ट व नेमक्या उद्दिष्टाचा अभाव केंद्र सरकारने मांडलेल्या आदिवासी धोरणाच्या मसुद्यामधील प्रमुख दोष आहे व तो दूर करणे ही ह्या मसुद्यातील सुधारणेची पहिली पायरी ठरेल. या विभागात पुणे येथील दोन दिसांच्या चर्चासत्रातून पुढे आलेल्या विविध सूचना व प्रतिक्रिया तीन उपभागांमध्ये मांडल्या आहेत.

### ४.१ मसुद्यात असणाऱ्या उणीवा आणि मसुद्यातील मुद्यांवरील स्पष्टीकरणे

१ मसुद्यात आदिवासी घटकांना देशाच्या मुख्य प्रवाहात सामील करण्याबाबत काही सूचना आढळतात. परंतु मुख्य प्रवाह कशाच्या आधारे ठरवायचा ? मुख्य प्रवाहात आदिवासींना सामील करायचे म्हणजे नेमके काय अभिप्रेत आहे ? यांसारख्या प्रश्नांवर काहीही स्पष्टीकरण आढळत नाही. एका बाजूने मुख्य प्रवाहात आदिवासींचे सामीलीकरण करणे व दुसऱ्या बाजूने त्यांची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती जपणे ही दोन्ही उद्दिष्टे परस्परविरोधी भासतात, ती कशी साध्य करणार याविषयी मसुद्यामधे स्पष्टता नाही.

- मसुद्यात राजकीय अंगाचा समावेश नाही. अनुसूचित जमातींच्या सर्वांगीण विकासात राजकीय संघटना, राजकीय सहभाग आणि एकूणच राजकीय सबलीकरणाचे स्थान काय असेल यावर काहीही भाष्य केलेले नाही.

- या मसुद्यानुसार अनुसूचित जमातींच्या विकास प्रयत्नांमध्ये ज्या संस्था-व्यक्ती यांचा सहभाग आहे त्या सर्वांच्या कामाचे निश्चित स्वरुप व त्यांच्यावरील जबाबदाऱ्या याची स्पष्टता करणे गरजेचे आहे.
- मसुद्यामध्ये दारिद्र्याचे प्राथमिक आणि मर्यादित आकलन गृहित न धरता दारिद्र्याचे विविध आयाम (जसे की सत्ताहीनता, वंचितता, अभावग्रस्तता, निराधारता, अक्षमता इ.) तसेच दारिद्र्यामागील सामाजिक, राजकीय, मानसिक, सांस्कृतिक इ. बिगर आर्थिक घटकांची दखल घेतलेली नाही.
- आदिवासी विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या अनेक मुद्यांवर सरकारी धोरणाच्या मसुद्यात भर दिलेला नाही. ते असे, १) शेती २) जंगल ३) उपजीविका व अन्न सुरक्षा ४) आदिवासी स्वशासन कायदा-पेसा ५) आदिवासी आरक्षण धोरण ६) स्त्री हक्क संरक्षण व विकास आणि ७) दारिद्र्य रेषा निश्चितीची प्रक्रिया व यातील आदिवासींचा सहभाग इ. त्याचप्रमाणे संपूर्ण मसुद्यामध्ये आदिवासींच्या वर उल्लेखलेल्या समस्यांचे विश्लेषण मांडण्यात आलेले नाही.
- आदिवासी प्रश्न सोडवणे व त्यांचा अभ्यास करणे याबाबतीत राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर अनेक समित्यांची (उदा. अनुसूचित जाती व जमातीबाबतचा आयोग) नेमणूक होत असते. या समित्यांनी दिलेल्या अहवालातील सूचना व प्रस्तुत राष्ट्रीय आदिवासी धोरण यात काय फरक आहे ? या धोरणाचा आणि इतर अशा अहवालांचा परस्परसंबंध कसा लावावा? याबाबत धोरणशमध्ये कुठेही उल्लेख आढळत नाही. त्याचबरोबर आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे कायदे व त्याअंतर्गत असणाऱ्या तरतुदी उदा. आदिवासी स्वशासन कायदा (पेसा - Panchayat's Extension to Scheduled Areas) किंवा इतर धोरणे (उदा. खाण क्षेत्रातील वजीवक्षेत्रातील धोरणे) यांचा या धोरणाशी असलेले परस्परासंबंध याबाबत काहीही उल्लेख आढळत नाही.
- मसुद्यातील मांडणीमध्ये संदर्भ विशिष्टतेकडे (context specificity) संपूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. भारतातील विविध ठिकाणी असणाऱ्या आदिवासी जमातींची भौतिक, प्राकृतिक, सामाजिक-सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थिती अतिशय भिन्न आहे आणि स्थानिक संदर्भातील प्रश्नांमधील वैविध्यामुळे गुंतागुतीची बनलेली आहे. आदिवासींचा सर्वांगीण विकास घडवताना ही परिस्थिती कशी हाताळणार याबाबत काहीही उल्लेख नाही.
- सध्या भारतामध्ये राबवले जात असणारे विकासाचे प्रतिमान (mode) याचा या धोरणाशी काय संबंध आहे याबद्दल मसुद्यात स्पष्टीकरण नाही. आर्थिक सुधारणाच्या अनुषंगाने सध्याचे विकासाचे अग्रकम कायम ठेवून आदिवासींच्या विकासामधील समस्यांचे निराकरण करणे कसे शक्य आहे ? सध्याच्या या प्रस्तापित विकासाच्या प्रतिमानाचा आदिवासींच्या विकासावर विपरित परिणाम होत आहे. परंतु याविषयी सरकारी मसुद्यात काही विश्लेषण आढळत नाही.
- या मसुद्यात आदिवासींच्या उपजीविकेची सध्याची परिस्थिती काय आहे आणि त्यांच्या उपजीविकेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सरकारने कुठली धोरणात्मक पावले उचलायला हवीत याबाबत कुठलीच मांडणी केलेली आढळत नाही. आदिवासींना उपजीविका मिळवण्यासाठी कुठले आर्थिक उपक्रम घ्यावेत अथवा तशा संधी निर्माण करता येतील यादृष्टीने सरकारच्या मसुद्यामध्ये कुठलीच मांडणी नसून त्यामध्ये आर्थिक अंगाकडे जवळजवळ संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.
- मसुद्यामध्ये आदिसींचे पारंपरिक ज्ञान तसेच बौद्धिक संपदेवर अधिकार याबाबत उल्लेख आढळतो. परंतु सद्यपरिस्थिती लक्षता घेता आदिवासींमधील ज्ञान आणि माहिती जतन करणाऱ्या पारंपरिक संस्था बदलल्या समाजव्यवस्थेमध्ये विस्कळीत होत आहेत. त्यामुळे बौद्धिक संपदेवरील अधिकार कुणाला व कसे देणार याचे स्पष्टीकरण मसुद्यामध्ये अभिप्रेत आहे.

- 'ट्रायबल' या शब्दाची व्याख्या मसुद्यामध्ये केलेली नाही. वास्तविक पाहता, इंग्रजी भाषेच्या व्याकरणाच्या संदर्भात या शब्दाकडे पाहिल्यास असे दिसते की 'ट्रायबल' हा शब्द, हे 'नाव' नसून 'विशेषण' आहे. त्यामुळे ट्रायबल हा शब्द कुणालाही उद्देशून वापरता येत नाही. हा शब्द वापरला म्हणजे तो एखाद्या जातीस वा जमातीस किंवा अशा जातीजमातींच्या मानवसमूहाला उद्देशून वापरला असा त्याचा अर्थ होत नाही. त्यामुळे हा शब्द वापरल्यामुळे जी संदिग्धता निर्माण झाली आहे ती स्पष्ट होणे आवश्यक वाटते. त्याबरोबरच ट्रायबल या शब्दामध्ये एक मानहानीकारक अर्थ आहे. या मुळे हा शब्दाचा वापर अयोग्य वाटतो.

**४.२ मसुद्यात समाविष्ट व्हावीत अशी व्यापक धोरणेसूत्रे**

विषयवार धोरणसूत्रांची चर्चा करण्याआधी मसुद्यामध्ये व्यापक दृष्टीने महत्त्वाची असणारी सर्वसाधारण धोरणसूत्रे मांडणे आवश्यक आहे. त्यापैकी काही धोरणसूत्रे पुणे येथील चर्चेमधून पुढे आली. त्यांचा उल्लेख येथे आहे.

- आदिवासींच्या जीवनाशी संबंधित वेगवेगळ्या अंगांचा एकत्रितपणे विचार करुन समग्र दृष्टिकोन घेऊन धोरणात विवेचन केले जावे.
- आदिवासींच्या समोरील समस्यांवर उपाय म्हणून आदिवासींचे आर्थिक, सामाजिक व राजकीय सबलीकरण करणे हे धोरणाचे सर्वसाधारण उद्दिष्ट असावे, त्यासाठी नवीन कायदेशीर तरतुदी व जुन्या कायद्यांमध्ये दुरुस्त्या व त्या कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी करावी.
- सरकारी पातळीवर कार्यक्रम व योजना तयार करण्याच्या प्रक्रियेबाबत दिशादर्शक सूत्रे, योजनांची आखणी, नियोजन व अंमलबजावणी करताना सहभागिता, पारदर्शकता आणि उत्तरादायित्व या सूचनांचे पालन करण्याबाबतच्या स्पष्ट सूचना असाव्यात.
- देशभरच्या आदिवासींच्या जीवनातील संदर्भविशिष्टता म्हणजेच भौतिक, प्राकृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक व सांस्कृतिक विविधतेकडे पुरेसे लक्ष देऊन विकासाची धोरणसूत्रे ठरवली जावीत.
- धोरणात्मक मसुद्यामध्ये अनुसूचित जमातींच्या विकासाचे मुख्य उद्दिष्ट स्पष्ट करुन भारतातील अनुसूचित जमातींना सुरक्षित, शाश्वत आणि समृद्ध जीविका मिळवण्यासाठीचे धोरण, अशा तऱ्हेचे स्पष्ट उद्दिष्ट असायला हवे.
- आदिवासी क्षेत्राचे नियोजन करताना आदिवासींची समृद्ध जीविका हे ध्येय केंद्रीभूत ठेवून उपजीविकेचे दोन मुख्य आधार-नैसर्गिक संसाधने व श्रमाचा वापर - संरक्षित करण्यात यावा. त्यासाठी, नैसर्गिक संसाधने म्हणजे जमीन, जंगल, पाणी, मासे वन्य प्राणी यावर स्थानिक गावसमूहांचा सामूहिक अधिकार संरक्षित करण्यात यावा. पर्यावरण आणि अन्य जीवांचे संतुलन राखण्याची गरज व पूर्वअटींसह हे अधिकार व जबाबदाऱ्या संरक्षित करण्यात यावेत.
- आदिवासी समाजाच्या उपजीविकेचे विस्थापन होऊ नये हा देखील राष्ट्रीय व राज्य पातळीवरील नियोजनाचा गाभा असायला हवा. रोजगाराच्या शोधात स्थलांतर, पाणी प्रदूषण, शहरीकरण, औद्योगिकरण या मार्गांनी होणारे आदिवासींच्या उपजीविकेचे अप्रत्यक्ष विस्थापन टाळणारे विकासाचे धोरण असायला हवे.
- व्यापक विकासाच्या अथवा व्यापक समाजहिताच्या नावाखालीदेखील आदिवासींचे विस्थापन करण्यावर अतिशय कडक निर्बंध असावेत. आदिवासींना प्रकल्पविषयक संपूर्ण माहिती देऊन त्यांची आगाऊ व सामूहिक संमती घेतल्याशिवाय विस्थापनाचा निर्णय घेतला जाऊ नये. आदिवासींना मान्य असा पुनर्वसन कार्यक्रम आदिवासींच्या देखरेखीखाली समाधानकारकरित्या अंमलात आणल्याशिवाय त्यांचे विस्थापन केले जाऊ नये.
- आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील भागात, जिथे

आदिवासी विखुरलेले व अल्पसंख्यांक आहेत, त्यांच्या जीविकेच्या संरक्षणासाठी विशेष विकास योजना आखण्यात याव्यात व केंद्र सरकारने त्यासाठी निधी उपलब्ध करावा.

- प्रशासनाच्या कारभाराची निर्णय प्रक्रिया स्थानिक पातळीवर होणे आवश्यक आहे. यासाठी लोकांच्या सहभागास अधिकाधिक महत्त्व द्यावे. स्थानिक पातळीवरच्या सामान्य लोकांना समजून घेऊन आणि त्यांच्या विचारांना प्राधान्य देऊन निर्णय घेतले जावेत आणि त्याप्रमाणे कृतीचे नियोजन व्हावे. नियोजनामध्ये आदिवासी जनांना प्रतिनिधित्व असायला हवे.

**४.३ मसुद्यामधे केलेल्या सूचना**

या विभागात पुणे येथील चर्चेमधून पुढे आलेली विविध विषयवार धोरणसूत्रे, धोरणे व कार्यक्रमाबाबतच्या तपशीलवार सूचना व मसुद्यातील विवरणाच्या संदर्भातील सूचना मांडल्या आहेत. या सूचनांचे मसुद्यातील दुसऱ्या प्रकरणामध्ये मांडल्यानुसार अनुक्रमे आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक या चार गटांमध्ये वर्गीकरण केले आहे.

**आर्थिक सबलीकरणाच्या अनुषंगाने येणाऱ्या सूचना**

**१. नैसर्गिक संसाधने**

१ **जमीन :** आदिवासींचा जमिनीवरील हक्क कायद्याद्वारे व कागदोपत्री अबाधित रहावा. यासाठी खालील बाबी करणे आवश्यक आहे.

- **जमीन हस्तांतरण :** आदिवासी जमिनीचे गैरआदिवासींकडे कुठल्याही मार्गाने हस्तांतरण होऊ देऊ नये. जमिनीच्या हस्तांतरणाच्या सर्व मार्गांवर (खंड, करार, विक्री, बक्षिसपात्र इ.) कायद्याद्वारे प्रतिबंध करावा. जमीन सार्वजनिक अथवा इतर संस्थेच्या किंवा ट्रस्टच्या अखत्यारित हस्तांतरित होत असल्यास मालकी अथवा कराराने घेणाऱ्या ट्रस्टचे ८०% सदस्य आदिवासी असावेत व ट्रस्टची आदिवासी सदस्य संख्या कायम रहावी. त्यापुढील हस्तांतरण अशाच ट्रस्टकडे अथवा आदिवासी व्यक्तीकडे व्हावे. पूर्वी हिरावल्या गेलेल्या जमिनीवर आदिवासींच्या हक्कांची पुनर्प्रस्थापना व्हावी. ज्यांनी आदिवासींच्या जमिनी बळकावल्या आहेत त्यांच्या -वर नुकसानभरपाई म्हणून कर लावला जावा व ह्या करातून मिळणारा पैसा आदिवासींच्या विकास कामांसाठी वापरावा.
- **जमिनीविषयीची प्रलंबित प्रकरणे :** सरकारने जमिनीविषयक सर्व प्रकरणे कागदपत्राअभावी अवैध न ठरवता निकाली काढावीत. यामधे वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनींचे प्रश्न मोडतात जसे की, दळी, एकसाली, कूळ कायद्याद्वारे मिळणारी, वनअतिक्रमित, महसूल अतिक्रमित जमिनी, कमाल जमीन धारण (सिलिंग) कायद्याखालील जमिनी, गायरान जमिनी व इतर अशा स्थानिक जमिनींची सर्व प्रकरणे व नोंदी पूर्ण करुन अशी सर्व प्रकरणे निकाली काढावीत. हे प्रश्न सोडवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारावी व यासाठी योग्य त्या तरतुदी करुन कायद्याने संरक्षण मिळावे.
- **जमिनीच्या नोंदी :** आदिवासींच्या जमिनीसंदर्भातील सर्व अव्यवस्थित आणि अपूर्ण असलेल्या नोंदी विशिष्ट कालावधीत पूर्ण कराव्यात व आदिवासींच्या जमिनीवरील अधिकार कागदोपत्री सिद्ध करावा.
- **किमान जमीन धारणा :** कुठलाही आदिवासी भूमीहीन राहाता कामा नये. किमान ५ एकर कोरडवाहू अथवा २.५ एक सिंचित जमीन प्रत्येक आदिवासी कुटुंबाकडे असणे/देणे आवश्यक आहे. जमीन उत्पादक नसल्यास अशा जमिनीची सुधारणा करण्याचा अधिकार कायद्यामध्ये असावा. यासाठी शासकीय योजनेद्वारे आर्थिक पाठबळ मिळावे. फिरत्या शेतीवर प्रतिबंध लावण्याआधी सरकारने आदिवासी कुटुंबाना कायमस्वरुपी जमिनी द्याव्यात.
- **भू संपादन :** कुठल्याही विकास प्रकल्पासाठी आदिवासींची जमीन संपादित करण्यात येऊ नये.

- शेती तंत्रज्ञान : शेतीच्या टिकाऊ व चिरंजीवी पद्धती व त्यासाठी मूळचे तंत्रज्ञान जोपासून त्याला पूरक ठरेल असे आवश्यक ते नवीन तंत्रज्ञान पोचवण्याचे कार्यक्रम आखावेत व त्यासाठी आवश्यक तरतुदी करण्यात याव्यात.

- **मूळ धोरणाविषयक मसूद्यामधील सूचना (जमिनीशी फारकत : Land alienation - Point No. 1,2,3,4,5,6)** अंमलात आणण्याकरिता ग्रामपंचायत कायद्यामध्ये दुरुस्ती करावी लागेल. ती करावी.

- १४ सेक्शन व ३५ सेक्शन संदर्भातील जमिनीची मुदत संपून गेली आहे ती वाढवून मिळावी तशी कायद्यात दुरुस्ती व्हावी.

- आदिवासींमध्ये जमीन हक्काबाबत जाणीव-जागृती वाढवण्यासाठी व जमीनविषयक कायद्यांमधील तरतुदी लोकांपर्यंत पोचवण्यासाठी त्याचा वापर सरकारने योग्य त्या सरकारी/गैरसरकारी प्रसार माध्यमातून करावा.

**वने**

- वनग्रामे (Forest Villages) ही महसूल ग्रामे (Revenue villages) म्हणून जाहीर करण्यात यावीत.

- वनक्षेत्रामधील अतिक्रमित जमिनी आदिवासींच्या नावावर व्हाव्यात. संयुक्त वन व्यवस्थापनाचे प्रकल्प (सं.व.व्य.) राबवतांना वनक्षेत्रामधील अतिक्रमित जमिनी नियमानुकुल व्हाव्यात, म्हणजेच संयुक्त वन व्यवस्थापनाचे प्रकल्प राबवण्याची प्रक्रिया आणि वनक्षेत्रातील शेतजमिनी/लागवडीखालील आदिवासींच्या जमिनी नियमानुकुल करण्याची प्रक्रिया एकाच वेळी व्हावी. यामुळे आदिवासींचा सहभाग सं.व.व्य. मधे मिळू शकेल. अशा प्रकारची दुरुस्ती १९९३ सालच्या वन कायद्यामध्ये करण्यात यावी.

- जंगल उत्पादनावर अधिकार मिळण्यासाठी योग्य त्या तरतुदी कराव्यात आणि वन्य उत्पादनांवर गावसमूहाचा सामूहिक अधिकार संरक्षित करण्यात यावा.

**पाणी**

- आदिवासी भागात असणाऱ्या धरणातील ५०% पाणी मोफत उचलण्याची परवानगी आदिवासींना असावी. यासाठी वीजबिलामध्ये माफी मिळावी.

- राज्यात एकूण उपलब्ध होणाऱ्या पाण्यापैकी, आदिवासींच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात म्हणजेच महाराष्ट्राच्या संदर्भात ९% पाणी आदिवासींसाठी राखून ठेवण्यात यावे यासाठी योग्य ती कायदेशीर तरतूद करण्यात यावी. (या दोन्ही सूचना एकाच मुद्याबाबत भिन्न मते दर्शविणारी आहेत त्याबाबत काय करावे ?)

२. **विकास प्रकल्प**

जिथे आदिवासींच्या क्षेत्रात धरणे व वीज प्रकल्प आहेत तिथे, निर्माण होणाऱ्या उर्जेवर, पाण्यावर व सिंचित जमिनीवर प्राधान्याने अधिकार तेथील आदिवासी गावे व समूहांचा असावा.

३. **विस्थापन व पुनर्वसन**

पुनर्वसन कायद्याची अंमलबजावणी सदोष आहे. त्यामुळे पुनर्वसन योग्य पद्धतीने होत नाही. अंमलबजावणी उचित पद्धतीने व्हावी याकरीता योग्य त्या कायदेशीर तरतुदी कराव्यात आणि विस्थापितांचे पुनर्वसन योग्य पद्धतीने व्हावे. कुठल्याही विकासप्रकल्पांमुळे होणाऱ्या विस्थापनाच्या प्रक्रियेत विस्थापन होण्या/करण्याआधी पुनर्वसनाच्या सोयी होणे आवश्यक आहे. त्याबरोबरच कुठलेही नवीन विस्थापन करण्याआधी पूर्वीच्या विकासप्रकल्पांमुळे अपूर्ण राहिलेली पुनर्वसनाची कामे पूर्ण करावीत. तत्पूर्वी नवीन पुनर्वसन होईल असे प्रकल्प हाती घेऊ नयेत.

४. **श्रम व रोजगार**

आदिवासी क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात याकरिता संसाधने विकसित व समृद्ध करणे व त्यास आदिवासींच्या श्रम शक्तीची जोड देत त्या

संसाधनांवर अधिकार संरक्षित करणे व त्यासाठी लागणाऱ्या क्षमता, कौशल्यांचा विकास यासाठी आवश्यक त्या तरतुदी करण्यात याव्यात. निकृष्ट जमिनी उत्पादक करण्याचे काम हे रोजगार हमी योजना (रोहयो, महाराष्ट्र) सारख्या योजनांअंतर्गत रोजगार हक्कांशी जोडून करण्यात यावेत. रोहयोसारखी योजना देशाच्या स्तरावर राबवण्यात यावी व वर्षभर पुरेल असा रोजगार देण्यात यावा. बागायत, फळे लागवड या क्षेत्रातील मजुरांना कुशल कामगार मानण्यात यावे. आदिवासी क्षेत्रात रोजगार निर्मिती तेथील संसाधने, आदिवासींची जीविका, जीवनशैली, शेतीच्या व इतर कामांच्या वेळा लक्षात घेऊन करण्यात यावी. आदिवासी विकास योजना प्राधान्याने या उद्देशासाठी राबवण्यात याव्यात.

५. किमान वेतन

शेतमजूर, बागायत, फळे लागवड तसेच अन्य बांधकाम, खाणकाम, वीटभट्ट्या व शेती इ. क्षेत्रात काम करणाऱ्या असंघटित कामगारांच्या किमान वेतनाचे संरक्षण करावे व किमान वेतनास महागाई भत्त्याची जोड देऊन दर सहा महिन्यांनी वेतनाचे पुनर्निर्धारण करण्यात यावे. किमान वेतन न देणे वा वेठबिगार ठेवणे यासारख्या गुन्ह्यावर नियंत्रण आणण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात यावी, व किमान वेतन कायद्याचे उल्लंघन हा दखलपात्र गुन्हा मानण्यात यावा.

६. आर्थिक उपक्रम

सबलीकरणासाठी आदिवासींना फायदेशीर ठरतील असे आर्थिक उपक्रम त्यांना करता यायला हवेत. शहरी व औद्योगिक व्यवस्थेशी संबंधित असणारे आर्थिक उपक्रम बहुसंख्य आदिवासींना फायदेशीर ठरत नाहीत असा आजवरचा अनुभव आहे. तेव्हा सभोवतालच्या नैसर्गिक संसाधनांवर (जमीन, जंगल, पाणी) आधारित व आदिवासींच्या आवाक्यात असणारे आर्थिक उपक्रम (शेती, मासेमारी, पशुपालन, यांसारखे) त्यांना सक्षमपणे करता यावेत यावर आदिवासी धोरणामध्ये भर द्यायला हवा. त्याबरोबरच या आर्थिक उपक्रमांची उत्पादकता वाढवून ते उपक्रम आदिवासींना जास्तीत जास्त फायदेशीर कसे ठरतील यासाठी उपयायोजना करायला हवी.

७. बाजारपेठ

आदिवासींचा शेतीमाल व अन्य उत्पादनांच्या विक्रीला हमीभाव देऊन व योग्य त्या यंत्रणा उभारुन बाजारपेठेतील त्यांचा माल संरक्षित करण्यात यावा. तसेच आदिवासी क्षेत्रातील आठवडी बाजारांना आवश्यक त्या सोयी पुरवून त्या बाजारपेठा संरक्षित करण्यात याव्यात.

८. अर्थसंकल्पाचा वाटा

केंद्रीय स्तरावर एकूण अर्थसंकल्पापैकी आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पाचा वाटा आदिवासी विकासासाठी खर्च झाला पाहिजे तसेच प्रत्येक राज्याला देखील तेथील आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात एकूण अर्थसंकल्पाचा वाटा आदिवासी विकासासाठी उपलब्ध व्हायला हवा.

९. दारिद्र्य रेषा

दारिद्र्य रेषेच्या आधारे सरकारच्या विकास योजना छोट्या गटांसाठी आरक्षित केल्या जातात. पाच एकर व त्यापेक्षा कमी जमीनधारणा असणारे सर्व आदिवासी व कायमस्वरूपी नोकरी नसणारे सर्व आदिवासी दारिद्र्यरेषेच्या खाली गणले जावेत. रेशन दुकानाद्वारे मिळणारे स्वस्त: धान्य मिळण्याचा अधिकार सगळ्या आदिवासींना पूर्वीप्रमाणेच सार्वत्रिक मिळायला हवा, तो आता आहे त्याप्रमाणे लक्ष्याधारित नसावा.

**राजकीय सबलीकरणाच्या अनुषंगाने येणाऱ्या सूचना**

१. विकासप्रक्रियेतील सहभाग

- गावपातळीवरील विकासासाठीच्या सगळया योजनांची आखणी, नियोजनामध्ये आदिवासी समूहांचे प्रतिनिधित्व असावे व त्याबरोबरच

अंमलबजावणीमध्ये त्यांचा सहभाग असावा. रोजगार हमी योजनांसारख्या योजनांचे नियोजन नीट करावे व नियोजनामध्ये आदिवासी गावसमूहांचा सहभाग असावा.

- गावपातळीवर ग्रामसभेसारख्या व ग्रामपंचायतीसारख्या संस्थांच्या माध्यमातून लोकसहभाग वाढवतानाच पंचायत समितीच्या पातळीवरही आदिवासी लोकांचा सहभाग वाढवण्यास प्रयत्न व्हावेत. त्यासाठी आवश्यक अशा तरतुदी असाव्यात.

२. **आरक्षण धोरण**

- प्रशासकीय व सार्वजनिक क्षेत्रामदील आरक्षणाच्या तरतुदी कायम ठेवाव्यात व त्याबरोबरच खाजगी क्षेत्रामध्ये नोकऱ्यांसाठी आरक्षण धोरण लागू करण्यात यावे. यामध्ये आदिवासींमधील शिकलेल्या पहिल्या पिढीस आरक्षण असावे व ते नीट राबवले जावे.

- बोगस आदिवासी प्रश्न आणि आदिवासी प्रमाणपत्र दाखला व ओळख पटवणे व ठरवणे याचे अधिकार स्थानिक आदिवासींकडे असावेत. यामध्ये सरकारी अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करु नये.

- आदिवासी समाजास सरकार स्थापनेमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळावे याकरिता आदिवासी मतदारसंघ राखीव ठेवऱ्याचे धोरण कायम ठेवतानाच काही ठिकाणच्या मतदारसंघांची पुनर्रचना करावी, जेणे करुन आदिवासी मतदार इतर मतदारसंघांमध्ये विभागला न जाता आदिवासी समाजास योग्य प्रतिनिधित्व मिळू शकेल.

३. **प्रशासन**

- प्रशासकीय हद्दीची पुनर्रचना सध्या भौगोलिक पातळीवर आणि लोकसंख्येच्या आधारावर केलेली आहे. ती बदलून जमातनिहाय प्रशासकीय हद्दी करण्यात याव्यात. यासाठी आदिवासी स्वायत्र तालुका किंवा स्वायत्त जिल्हा किंवा स्वायत्त राज्य अशा प्रकारे प्रशासकीय हद्दी ठरवण्यात याव्यात. उदा. भिलखंड राज्य

- ग्रामसभेच्या धर्तीवर प्रत्येक ग्रामपंचायतस्तरावर वाडी-सभा किंवा पाडासभा असणे आवश्यक आहे. यानुसार आदिवासी स्वशासन कायद्यामध्ये करावी. या वाडीसभांना ग्रामसभेला असणाऱ्या अधिकारांबरोबरच निर्णयप्रक्रियेमध्ये सकारात्मक आणि नकारात्मक अधिकार असणे आवश्यक आहे. उदा: जातीच्या प्रमाणपत्रांचा दाखला, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची निश्चिती इ.

- गावामध्ये एक वाडी-गाव पंचायत विकास केंद्र असावे. या केंद्रामध्ये लोकांसाठी सर्व सरकारी योजनांची व कायद्यांची माहिती असायला हवी.

- आदिवासी उपपोजनेतील निधीचा लाभ हा आदिवासींना होतो आहे व योग्य रीतीने नियम व आदेश यांना अनुसरुन होतो आहे हे तपासण्यासाठी केंद्र शासनाने स्वतंत्र आढावा व परीक्षण समिती नेमावी. याचबरोबर राज्यपातळीवर शासनातर्फे अधिकृत स्वयंसेवी व शिक्षणक्षेत्रातील अभ्यासक - कार्यकर्त्यांची परीक्षण समिती नेमावी. या समित्यांच्या सूचना शासनावर बंधनकारक असाव्यात.

४. **इतर वंचित आदिवासींचा प्रश्न**

आदिवासी उपाय योजना बाहेरील क्षेत्रातील भागात जिथे आदिवासी विखुरलेले व अल्पसंख्य आहेत तिथे त्यांच्या जीविकेच्या संरक्षणासाठी विशेष विकास योजना आखण्यात याव्यात व केंद्र सरकारने त्यासाठी निधी उपलब्ध करावा.

## सांस्कृतिक सबलीकरणाच्या अनुषंगाने येणाऱ्या सूचना

१. **आदिवासी ओळख व अस्मिता**

- मसुद्यातील 'ट्रायबल' हा शब्द हे नाम नसून विशेषण आहे. त्याऐवजी ट्रायबल पीपल किंवा कम्युनिटी असे म्हणावे. अनुसूचित जमाती या शब्दप्रयोगाऐवजी

आदिवासी (इंडिजिनस पीपल) असा शब्दप्रयोग करावा.

- आदिवासी लोकांना प्रमाणपत्र देताना प्रमाणपत्रात हिंदू असा शब्दप्रयोग करु नये.
- मोठ्या प्रमाणावर बोगस प्रमाणपत्र बाळगणाऱ्या आदिवासींची संख्या वाढली आहे. या प्रश्नाचा सखोल अभ्यास करुन यावर उपाय शोधणे आवश्यक आहे.
- याबरोबरच आदिवासी जमातींची अनुसूची पुन्हा तयार करुन त्यांना '**आदिवासी/इंडिजिनस पीपल**' असे जाहीर करावे.

**२. आदिवासी संस्कृती**

- संस्कृती टिकवणे हे त्या त्या मानवमूहाचे काम असले तरीही संस्कृतीस मारक प्रवृत्तींना प्रतिबंध करण्याची धोरणे बनवून ती अंमलात आणता येऊ शकतात. या प्रकरणी विशेष अध्ययन करुन तशा प्रकारची धोरणे बनवण्याची आणि राबवण्याची जबाबदारी सांस्कृतिक मंत्रालयाने घ्यावी.
- आदिवासी भाषा हळूहळू लोप पावते आहे. याकरिता किमान पातळीवर प्राथमिक शिक्षण हे मायबोलीतून द्यावे. इयत्ता १२ वी पर्यंत आदिवासी भाषा जाणणाऱ्या शिक्षकांमार्फत अध्यापनाचे काम करावे. याबरोबरच भाषा टिकवणे याकरिता शासनातर्फे इतर उपक्रम हाती घ्यावेत.

**३. मानवी हक्क**

- आदिवासी समूहाचे मूलभूत हक्क कायम राहतील अशाच तऱ्हेने सर्व उपाययोजना केल्या पाहिजेत. आदिवासींना सन्मानाचे आणि दहशतमुक्त जीवन जगता येईल अशी परिस्थिती असावी. सामाजिक अत्याचार, शोषण, अन्याय यापासून कायद्याचे संरक्षण असावे.
- आदिम जमातीच्या लोकसंख्येचा उत्तरोत्तर ऱ्हास होत असल्याने या जामतींना कुटुंब नियोजनाच्या योजनांपासून संरक्षण मिळावे.

**४. मुख्य प्रवाह**

- मुख्य प्रवाहामध्ये आदिवासींचे सामिलीकरण करणष असा दृष्टिकोन घेणे योग्य नाही. आदिवासी संस्कृतीचा एक स्वतंत्र प्रवाह असून त्यास मान्यता देणे आवश्यक आहे. त्यामुळे सामिलीकरणाची कल्पना रद्द करावी. आदिवासी लोक स्वतंत्रपणे समाजातील इतर प्रवाहांशी देवाणघेवाण करतील ही भूमिका स्वीकारून त्यास अधिकृतरित्या मान्यता द्यावी.

## सामाजिक सबलीकरणाच्या अनुषंगाने येण्याऱ्या सूचना

**१. शिक्षण**

- आदिवासींची मायबोली (मातृभाषा) जाणणाऱ्या शिक्षकांची नेमणूक करावी व प्राथमिक शिक्षण आदिवासी भाषेतून द्यावे. कॉलेजमध्ये मायबोली हा वेगळा विषय अभ्यासाकरिता असावा. आदिवासी भागातील शिक्षकांची गळती रोखण्यास व शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकरिता गावपातळीवर शिक्षण समिती नेमण्यात यावी व या समितीस शिक्षणाच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याचे योग्य ते अधिकार देण्यात यावेत. मोफत व सक्तीचे शिक्षण असावे. प्रत्येक शिक्षकास अभ्यापन पद्धतीचे (बी. एड.) शिक्षण सक्तीचे असावे. प्रत्येक पाड्यांवर शाळा असावी आणि वर्षातून ३००० दिवस पाड्यावर राहणारा शिक्षक असावा.
- सर्व शिक्षा अभियान ही योजना २०१० पर्यंतच न ठेवता शासनाने ती कायमस्वरुपी चालवावी. सर्व उच्च शिक्षणासाठी लागणारी प्रवेश फी शासनाने माफ करुन त्यांना शिक्षणाची संधी द्यावी. यामध्ये आर्थिक निकष व गुणवत्ता पडताळून आर्थिकदृष्ट्या कमजोर असणाऱ्यांना प्राधान्य द्यावे.
- प्रत्येक शाळा ही द्विशिक्षकी असावी. त्या ठिकाणी पटाचा (उपस्थितीचा) विचार केला जाऊ नये. आदिम आदिवासींसाठी, त्याचप्रमाणे ज्या भागात मुलांची

गळती जास्त आहे त्या ठिकाणी स्वतंत्र आश्रम शाळा काढाव्यात व ह्या शाळा सर्व शिक्षणाच्या सोयीसुविधांनी संपन्न असाव्यात. आदिवासी भागातील भोंगा शाळा वस्तीशाळा ह्या आदिवासींच्या शैक्षणिक ऱ्हासाचे कारण ठरले आहे. त्या बंद करुन त्या ठिकाणी जिल्हा परिषदनेने शाळा चालू कराव्यात.

- प्राथमिक शिक्षणामध्ये काही इयत्तांमध्ये परीक्षा पद्धती बंद असल्याने मूल्यमापनाच्या पद्धती बदलून मूल्यमापन गुणवत्तेवर आधारित असावे. अनौपचारिक शिक्षणाच्या पद्धती अंगिकारुन त्यासाठी शिक्षण योजनांमध्ये तशा प्रकारच्या तरतुदी कराव्यात. त्याबरोबरच उपजीविका अर्जित करण्यासाठी उपयुक्त अशी तंत्रे व कौशल्ये निर्माण करण्यासाठी तंत्रशिक्षणाची सोय करावी.
- प्राथमिक शिक्षणाच्या विद्यार्थ्यांना पूरक आहाराऐवजी सकस आहार असावा.

२. **आरोग्य**

- आदिवासी समाजातील परंपरागत उपचारपद्धतींशी सांगड घालण्याच्या उद्देशाने सरकारी दवाखान्यात ॲलोपॅथीपेक्षा आयुर्वेदावर अधिक भर द्यावा.
- प्रत्येक सरकारी रुग्णालयामध्ये आरोग्य दक्षता समिती. रुग्णालयातील दक्षता समितीमध्ये स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांना आणि आदिवासी समाजाला प्रतिनिधित्व असावे.
- रुग्णालयाची निर्मिती करतेवेळी लोकसंख्येचा विचार न करता भौगोलिक परिस्थितीनुरुप विचार करावा. दुर्गम भागामध्ये योग्य त्या सोयी सुविधा निर्माण करण्यात याव्यात.
- आदिवासी स्वशासन कायदा - २४४/६ वी अनु. ग्रामसभेचे, आरोग्य व शिक्षण कर्मचाऱ्यांवर नियंत्रण असावे.
- पोषक आहाराला प्राधान्य देताना पोषक आहाराच्या स्थानिक स्त्रोतांना जसे की परसबाग, घरगुती वनौषधी, यावर भर द्यावा. त्यासाठी योग्य त्या योजना आखून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.
- प्रजनन व बाल आरोग्य, किशोरवयीन मुला-मुलींचे आरोग्य याबाबत जाणीवजागृतीचे उपक्रम हाती घेऊन 'आरोग्यशिक्षण' व स्त्रियांचे आरोग्य व बाल आरोग्य या समस्या सोडवण्यासाठी योग्य उपाययोजना हाती घ्याव्यात. 'आरोग्यशिक्षण' व इतर योजना एकमेकांशी जोडून अंमलात आणाव्यात.

३. **सार्वजनिक सुविधा**

- अपारंपरिक उर्जेचा व सौर ऊर्जेचा वापर वाढवण्याच्या दृष्टीने उपक्रम हाती घ्यावेत.
- कायमस्वरूपी स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करणे. पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्यक्रम आदिवासी भागामध्ये व्हावे. यांना प्राधान्य देताना पिण्याच्या पाण्याचे कार्यक्रम/योजना पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमांशी जोडून घ्याव्यात.
- गावामध्ये प्रसाधनगृहे (शौचालये) बांधणे.
- प्रत्येक वाड्या-पाड्याला पक्के रस्ते असावेत.
- आदिवासी भागातील वीजपुरवठा पुर्ववत चालू करणे. राज्याच्या एकूण वीज उत्पादनापैकी ९% (लोकसंख्येच्या प्रमाणात) वीज आदिवासींना पुरवण्यात यावी.

४. **सामाजिक सुरक्षा**

- आदिवासी समाजातील निराधार स्त्रिया व मुले, अंध व अपंग व्यक्ती यांना सामाजिक सुरक्षेचे उपाय कायद्याद्वारे मिळावेत म्हणजे कायमस्वरुपी खात्रीचा लाभ मिळेल. ही योजना ग्रामपंचायतीकडे देण्यात यावी.

● ● ●

# अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत जंगलवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम २००६

## कायदा व न्याय मंत्रालय

नवी दिल्ली २ जानेवारी २००७
(या कायद्यास २९ डिसेंबर २००६ रोजी राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली.)

*वनांमध्ये पिढ्यानूपिढ्या वास्तव्य असलेल्या; परंतु ज्यांच्या हक्कांची नोंद होऊ शकली नाही अशा वनांत राहणाऱ्या अनुसूचित जमातींच्या व अन्य परंपरागत जंगलवासींच्या वनांवरील हक्क व वहिवाटीला मान्यता देणे व ते त्यांच्याकडे विहित करणेसाठी आणि अशाप्रकारे मान्यता दिलेल्या व विहित केलेल्या वन जमिनी संदर्भातील हक्कांच्या नोंदी करण्यासाठी व ते मान्य करण्यासाठी आवश्यक पुराव्यांच्या स्वरुपाची रुपरेषा पुरवण्यासाठी विधेयक.*

*ज्याअर्थी, वनांत राहणाऱ्या अनुसूचित जमातींच्या व अन्य परंपरागत जंगलवासींच्या मान्यता प्राप्त हक्कांमध्ये वनांचा शाश्वत वापर, जैवविविधतेचे जतन आणि पर्यावरणीय संतुलन राखणे यासाठीच्या जबाबदाऱ्या व हक्कांचा समावेश आहे आणि त्यायोगे वनांत राहणाऱ्या अनुसूचित जमातींच्या व अन्य परंपरागत जंगलनिवासींच्या उपजीविका व अन्य सुरक्षेची निश्चिती करतानाच वन संवर्धन करणाऱ्या यंत्रणाही सशक्त होतात.*

*आणि ज्या अर्थी, वनांमधील पर्यावरणीय व्यवस्थांचे अस्तित्व टिकवण्यासाठी व त्यांच्या शाश्वततेसाठी ज्या, वनांत राहणाऱ्या अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत जंगल निवासी अंतर्भूत आहेत, त्यांच्या वडिलोपार्जीत जमिनींवरील व त्यांच्या वस्ती स्थानांवरील वन हक्कांना वसाहत काळात तसेच स्वतंत्र भारतात शासकिय वनांचे एकत्रिकरण करताना पुरेशी मान्यता न दिल्यामुळे त्यांचेवर ऐतिहासिक अन्याय झालेला आहे.*

*आणि ज्याअर्थी वनांत राहणाऱ्या व शासकिय विकासकामांच्या हस्तक्षेपामुळे ज्यांना आपले निवास स्थान इतरत्र हलवणे भाग पडले अशा अनुसूचित जमातींच्या व अन्य परंपरागत जंगलनिवासींच्या वनांतील प्रवेशाच्या व उपभोगाच्या दीर्घकालीन असुरक्षिततेवर उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे.*

*भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी हे विधेयक लोकसभेने पुढील प्रमाणे पारित करावे.*

# प्रकरण १

## प्रस्तावना

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ**

१) या अधिनियमाला अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत जंगलवासी वन अधिकार मान्यता विधेयक २००६ असे म्हणता येईल.

२) तो, जम्मू आणि काश्मीर राज्या व्यतिरिक्त भारताला लागू आहे.

३) तो, केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचितेद्वारे जी तारीख नेमली त्या तारखेस अंमलात येईल.

**२. व्याख्या**

ए) सामुदायिक वन संसाधन म्हणजे गावाच्या परंपरागत हद्दीतील परंपरागत सामायिक जंगल जमीन किंवा धनगर जमातीच्या बाबतीत त्या हंगामी चराईसाठी वापरत असलेला भू-प्रदेश ज्यात समाजाचा परंपरागत अधिकार असलेली राखीव वने, संरक्षित वने आणि अभयारण्ये व राष्ट्रीय उद्योग यांसारख्या संरक्षित क्षेत्राचा समावेश होतो.

बी) कलम ४ च्या पोटकलम (१) व (२) मधून उद्भवणाऱ्या प्रक्रियेच्या आवश्यकतेसाठी क्षेत्रे ठरवताना 'आणीबाणीग्रस्त वन्यजीवांचे वसतीस्थान' म्हणजे सरकारने नेमलेल्या स्थानिक तज्ञ व आदिवासी व्यवहार मंत्रालयाचा एक प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या तज्ञांच्या समितीच्या सल्लामसलतीच्या खुल्या प्रक्रियेनंतर केंद्र सरकारच्या पर्यावरण व वनमंत्रालयाने निश्चित करुन जाहीर केलेली राष्ट्रीय उद्याने व अभयारण्यांतील अशी क्षेत्रे ज्यात शास्त्रीय व वस्तुनिष्ठ निकषांवर प्रत्येक उदाहरणात हे स्पष्ट निश्चित झाले आहे की ही क्षेत्रे वन्यजीव संवर्धनासाठी हस्तक्षेप विरहित ठेवणे गरजेचे आहे.

सी) वनांत राहणाऱ्या अनुसूचित जमाती म्हणजे अनूसूचित जमातींमधील असे सदस्य किंवा गट जे प्राथमिकदृष्ट्या जंगलात राहतात आणि वनजमिनीवर आपल्या खऱ्या-खुऱ्या निर्वाहाच्या गरजांसाठी अवलंबून आहेत. यात अनुसूचित धनगर जमातींचा समावेश आहे.

डी) ''वन जमीन'' म्हणजे वन क्षेत्रात असलेली कोणत्याही वर्णनाची जमीन आणि त्यात अवर्गीकृत वने, असीमांकित वने, अस्तित्वात असलेली किंवा गृहीत वने, संरक्षित वने, आरक्षित वने, राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य यांचा समावेश होतो.

इ) ''वनावरील अधिकार'' म्हणजे कलम ३ मध्ये उल्लेखलेले वनावरील अधिकार.

एफ) वन ग्रामे म्हणजे कोणत्याही राज्य शासनाच्या वनखात्याने वनक्षेत्राच्या आतमध्ये वनीकरणाच्या कामासाठी बसवलेल्या किंवा वनाच्या आरक्षणाच्या प्रक्रियेत ज्या गावाचे वन गावात रुपांतर झाले अशी गावे, वन जमाबंदीगावे, टाँग्या इत्यादी कोणत्याही नावाने संबोधली जाणारी गावे आणि शासनाने परवानगी दिलेल्या लागवडी व इतर वापराच्या जमिनींचा समावेश होतो.

जी) ग्रामसभा म्हणजे गावातील सर्व प्रौढ ग्रामस्थांची, महिलांचा पूर्ण अबाधित सहभाग असलेली गावसभा आणि ज्या राज्यात पंचायती नसतील तेथे पाडा, टोला व इतर पारंपरिक गावसंस्था आणि निर्वाचित गाव समित्या.

एच) ''वसतीस्थान'' मध्ये आदिम आदिवासी जमाती, शेतीपूर्व समाज आणि इतर जंगलवासी अनुसूचित जमातींची रुढ आणि राखीव व संरक्षित वनांतील

वसतीस्थाने असलेल्या क्षेत्राचा समावेश होतो.

आय) ''गौण वनोपज'' म्हणजे इमारती लाकडाव्यतिरिक्त सर्व वनस्पतीजन्य वनोपज ज्यात बांबू, ब्रशवुड, खोडे, वेत, टसर, कोष, मध, मेण, लाख, तेंदूपत्ता, औषधी वनस्पती, मुळे, कंद यासारखी इतर उत्पादने यांचा समावेश होतो.

जे) ''नोडल एजन्सी'' म्हणजे कलम ११ मध्ये निश्चित केलेली नोडल एजन्सी.

के) ''जाहीरनामा'' म्हणजे सरकारी राजपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहीरमाना.

एल) ''विहित'' म्हणजे या अधिनियमांतर्गत ठरवून दिलेल्या नियमांनुसार.

एम) ''अनुसूचित क्षेत्र'' म्हणजे संविधानाच्या कलम २४४ पो. क. (१) मध्ये नमूद केलेले कोणतेही अनुसूचित क्षेत्र.

एन) ''चिरंजीवी वापराचा'' अर्थ जैविक विविधता अधिनियम २००२ च्या कलम (२) मधील पोटवाक्य (ओ) मधील अर्था प्रमाणे असेल.

ओ) अन्य परंपरागत जंगलवासी म्हणजे असे सदस्य किंवा गट जे १३ डिसेंबर २००५ पूर्वी किमान तीन पिढ्या प्राथमिकदृष्ट्या जंगलात राहात आहेत व जे वन किंवा वनजमिनींवर आपल्या खऱ्याखुऱ्या निर्वाहाच्या गरजांसाठी अवलंबून आहेत.

**स्पष्टीकरण :** या पोटकलमांसाठी 'पिढी'चा अर्थ २५ वर्षांचा कालावधी होय.

पी) गाव म्हणजे

i) स्वशासन कायदा, १९९६ मधील कलम ४ मधील पोटकलम (ब) मध्ये संदर्भ असलेले गाव किंवा

ii) अनुसूचित क्षेत्रांव्यतिरिक्त पंचायती संदर्भातील कोणत्याही राज्याच्या कायद्यात गांव म्हणून संबोधलेले क्षेत्र किंवा.

iii) वनगावे, जुन्यावस्त्या किंवा वसतीस्थाने आणि सर्वेक्षण न झालेली गावे ''गाव'' म्हणून जाहीर झालेली असोत अगर नसोत किंवा

iv) ज्या राज्यात पंचायती नाहीत तेथे कोणत्याही नावाने ओळखले जाणारे परंपरागत गाव.

क्यू) वन्यजीव म्हणजे वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ च्या अनुसूची १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या आणि निसर्गात रानटी सापडणाऱ्या प्राण्याच्या कोणत्याही जाती.

# प्रकरण २

## वन अधिकार

### ३. वनात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या व अन्य परंपरागत जंगलवासींचे वन अधिकार.

१) या अधिनियमाच्या हेतूसाठी वनात राहणाऱ्या अनुसूचित जमातीचे आणि अन्य परंपरागत जंगलवासींचे सर्व जंगल जमिनींवर वन अधिकार पुढील प्रमाणे असतील जे व्यक्तिगत किंवा सामूहिक किंवा दोन्ही प्रकारच्या भोगवट्याचे असतील.

ए) वनांत राहणाऱ्या अनुसूचित जमातींच्या किंवा अन्य परंपरागत जंगलवासींच्या एक किंवा अनेक सदस्यांचा, त्यांच्या वस्तीसाठी किंवा उदर-निर्वाहासाठी कसण्यासाठी त्यांच्या वैयक्तिक किंवा सामुदायिक वहिवाटी खालील वनजमीन धारण करण्याचा आणि तिच्यावर राहण्याचा अधिकार

बी) कोणत्याही नावाने संबोधले जाणारे निस्तार सारखे आणि जुन्या राजेरजवाडे, जमिनदारी किंवा इतर कारभारात वापरात असलेले अधिकार.

सी) गावांच्या हद्दीमधील किंवा बाहेरील परंपरेने गोळा करत आलेले गौण वनोपजावरील मालकीचा, ते गोळा करण्याचा, वापरण्याचा आणि त्याची विल्हेवाट लावण्याचा अधिकार

डी) मासे आणि जलाशयातील इतर जीव मिळवण्याचे व वापरण्याचे, भटक्या किंवा धनगर जमातींचे गुरे

चारण्याचे (स्थिर किंवा फिरते दोन्ही) आणि पारंपरिक हंगामी संसाधने मिळवण्याचे व वापरण्याचे यांसारखे अन्य सामुदायिक अधिकार.

ई) आदिम जमाती व (शेतीपूर्व समूह) यांचा वस्ती करण्याचा अधिकार

एफ) जिथे दावे विवादास्पद आहेत अशा कोणत्याही राज्याच्या कोणत्याही परिभाषेतील विवादास्पद जमिनीतील किंवा जमिनीवरील अधिकार.

जी) कोणत्याही स्थानिक प्राधिकारी संस्थेने किंवा कोणत्याही राज्य शासनाने वन जमिनींवरील दिलेले पट्टे, लीज किंवा ग्रँट हे स्वामित्वात बदलण्याचा अधिकार.

एच) वन ग्रामांचे, जुन्या वस्त्यांचे, सर्व्हेक्षण न झालेल्या गावांचे आणि नोंदलेल्या, जाहीर केलेल्या असोत किंवा नसोत अशा वनांमधील गावांचे निवाडे करुन महसुली गावांत रुपातर करण्याचा अधिकार.

आय) ज्या वनांतील सामुदायिक संसाधनांचे ते परंपरेने दीर्घकालीन उपयोगासाठी संरक्षण व संवर्धन करीत आले आहेत अशा कोणत्याही संसाधनांचे संरक्षण, करण्याचा, ते पुनर्जीवित करण्याचा किंवा संवर्धन किंवा व्यवस्थापन करण्याचा अधिकार

जे) कोणत्याही राज्याचे कायदे किंवा स्वायत्त जिल्हा/ विभागीय परिषदांचे कायदे यांच्या अन्वये मान्यता मिळालेले किंवा कोणत्याही राज्यांच्या परंपरागत प्रथेनुसारच्या कायद्याने त्या आदिवासींचे हक्क म्हणून मान्य केलेले अधिकार.

के) जैवविविधता उपलब्धतेचा अधिकार व जैवविविधता आणि सांस्कृतिक विविधता यांच्या संदर्भातील बौद्धिक संपदेचा आणि पारंपरिक ज्ञानाचा सामुदायिक अधिकार

एल) वर 'अ' पासून 'क' पर्यंत नमूद केलेल्या अधिकारात समाविष्ट नसलेले परंतु वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती किंवा अन्य परंपरागत जंगलवासी पारंपरिकरित्या उपभोगात असलेले इतर कोणतेही अधिकार, मात्र त्यात कोणत्याही जातीच्या वन्य जनावरांची शिकार करणे किंवा त्यांना पकडणे किंवा त्यांच्या शरीराचा कोणताही भाग काढणे या अधिकाराचा समावेश असणार नाही.

एम) ज्या अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत जंगल निवासींना १३ डिसेंबर २००५ पूर्वी कोणत्याही प्रकारच्या वन जमिनींवरुन कोणत्याही कायदेशीर पुनर्वसनाचा अधिकार मिळाल्याशिवाय बेकायदेशीरपणे हुसकावून लावले आहे किंवा विस्थापित केले आहे. अशाच in situ पुनर्वसनाचा अधिकार ज्यात पर्यायी जमिन मीळण्याच्या अधिकारांचा समावेश आहे.

२) वन संवर्धन कायदा १९८० मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी शासकीय व्यवस्थापनाखाली असलेल्या निम्नलिखीत सुविधांसाठी ज्यामध्ये प्रत्येक हेक्टर मागे पंच्याहत्तरपेक्षा जास्त वृक्षांची तोड करावी लागणार नाही. अशा वन जमिनींचे रुपांतर करण्याची तरतूद केंद्र सरकार करेल.

(ए) शाळा (बी) दवाखाना किंवा हॉस्पिटल (सी)अंगणवाड्या (डी)रास्तभाव दुकाने (ई) विद्युत आणि दूरसंचार लाईन (एफ) तलाव व अन्य गौण जलाशये (जी) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि नळयोजना (एच) पाणी व पावसाचे पाणी साठवण्याच्या रचना (आय) लघु पाटबंधारे (जे) अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत (के) कौशल्य विकास व धंदे शिक्षण केंद्रे (एल) रस्ते आणि (एम) समाज मंदीरे

वन जमिनीचे असे रुपांतर करण्यास केवळ खालील अटींवर परवानगी दिली जाईल.

i) या पोटकलमात नमूद केलेल्या बाबींसाठी रुपांतर करण्यात येणाऱ्या वनजमिनींचे क्षेत्र प्रत्येक प्रकरणात एक हेक्टर पेक्षा कमी असेल.

ii) अशा विकास प्रकल्पांना या अटीवर परवानगी दिली जाईल की त्यांची शिफारस ग्रामसभेने केली असली पाहिजे.

# प्रकरण ३

## वन अधिकारांची मान्यता, पुनर्स्थापना व ते सुपूर्द करणे आणि अन्य बाबी.

### ४. वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत जंगलवासींच्या वन अधिकारांना मान्यता देणे व ते सुपूर्द करणे.

१) सध्या अस्तित्वात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी आणि या अधिनियमाच्या अधिन केंद्रशासन याद्वारे खालील लोकांचे अधिकार मान्य करुन सुपूर्द करीत आहे.

ए) ज्या राज्यांत किंवा राज्यातील क्षेत्रात त्या अनुसूचित जमाती म्हणून जाहीर केलेल्या आहेत अशा वनात राहणाऱ्या अनुसूचित जमातींना कलम ३ मधील उल्लेख केलेले सर्व वन अधिकार.

बी) अन्य परंपरागत जंगलवासींना कलम ३ मध्ये उल्लेख केलेले वन अधिकारी

२) वन्यजीव संवर्धनाकरीता हस्तक्षेप विरहित क्षेत्र निर्माण करण्यासाठी आणीबाणीग्रस्त वन्यजीवांचे वस्तीस्थान असलेल्या अभयारण्य व राष्ट्रीय उद्यानात या अधिनियमांतर्गत मान्यता दिलेल्या वन अधिकारांमध्ये कालांतराने सुधारणा करता येतील, परंतु यासाठी खालील सर्व अटींची पूर्तता केल्याशिवाय कोणत्याही वनअधिकार धारकाची पुनर्स्थापना किंवा त्याच्या अधिकारांवर परिणाम करता येणार नाही.

ए) विचाराधीन सर्व क्षेत्रांमध्ये कलम ६ मध्ये नमूद केलेली हक्क मान्यतेची आणि सुपूर्द करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे.

बी) वन्यजीव (संरक्षण) कायदा १९७२ खालील अधिकारांचा वापर करुन राज्यशासनाच्या संबंधित यंत्रणेने हे प्रस्थापित केले आहे की त्या क्षेत्रातील वन्यजीवांपैकी त्या जातीच्या व तिच्या वस्तीस्थानाच्या अस्तित्वाला धोका उत्पन्न करण्यासाठी आणि भरुन न येणारे नुकसान करण्यासाठी वन अधिकार धारकांची उपस्थिती किंवा कृती पुरेशी आहे.

सी) सहअस्तित्वासारखा अन्य योग्य पर्याय उपलब्ध नसल्याचा निष्कर्ष राज्य शासनाने काढलेला आहे.

डी) केंद्रशासनाच्या सुसुंगत कायदे व धोरणांनुसार अशा बाधित व्यक्तिंच्या व सामुदायांच्या आवश्यकतांची पुर्तता करणारे आणि बाधितांना सुरक्षित उपजीविका पूरविणारे पुनर्स्थापन करणारे किंवा पर्यायी पॅकेज तयार केले गेले आहे व त्याची माहिती संबंधितांना दिली आहे.

सी) प्रस्तावित पुनर्स्थापना आणि पॅकेज बद्दल संबंधित क्षेत्रातील ग्रामसभेला संपूर्ण माहिती देऊन ग्रामसभेची मुक्त लेखी संमती घेतली आहे.

एफ) आश्वासित पॅकेज प्रमाणे पुनर्स्थापनेच्या ठिकाणी जमिनी उपलब्ध करुन दिल्याशिवाय व सोयी सुविधा पूर्ण केल्याशिवाय कोणाचीही पुनर्स्थापना केली जाणार नाही.

वन्यजीव संवर्धनासाठी वन अदीकार धारकांना ज्या आणीबाणीग्रस्त वन्यजीव वस्तीस्थानातून हलवून इतरत्र बसवले गेले ते क्षेत्र कालांतराने राज्य अथवा केंद्र शासनाकडून किंवा अन्य कोणाकडून रुपांतरीत केले जाणार नाही.

३) संबधित वनात राहणाऱ्या अनुसूचित जमातींचा व अन्य परंपरागत जंगलवासींचा वनजमिनीवरील ताबा १३ डिसेंबर २००५ पूर्वीचा असला पाहिजे. या अटीवर कोणत्याही राज्यातील किंवा केंद्रशासित प्रदेशातील वनांत राहणाऱ्या अनुसूचित जमातींचे व अन्य परंपरागत जंगलवासींचे वनजमिनी व त्यांची

वस्तीस्थाने याबाबतचे वनअधिकार या कायद्याखाली मान्य व सुपूर्द केले जातील.

४) पोट कलम (१) ने दिलेले हक्क वारसा परंपरेने सोडून इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करता येणार नाहीत. विवाहित व्यक्तिच्या बाबतीत हे अधिकार पती-पत्नीच्या संयुक्त नांवे व एकट्या कुटुंबप्रमुखाच्या बाबतीत त्यांच्या नांवे नोंदले जातील. थेट वारसांच्या अनुपस्थितीत यांचा वारसा अधिकार जवळच्या नात्यातील व्यक्तींकडे जाईल.

५) अन्य तरतूद केल्याशिवाय वनांत राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या किंवा अन्य परंपरागत जंगलवासींच्या कोणत्याही व्यक्तिला त्याचे वनअधिकार मान्य करुन ते तपासण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय त्यांच्या वहिवाटी खालील वनजमिनीवरुन हुसकावले किंवा काढून टाकले जाणार नाही.

६) जिथे पोटकलम (१) खाली मान्यता दिलेले व सुपूर्द केलेले वनांवरील हक्क कलम ३ पोटकलम, च्या (a) मध्ये नमूद केलेल्या जमिनीसंबंधी असतील तेथे अशी जमीन हा कायदा अंमलात येण्याच्या तारखेला कोणाही व्यक्तिच्या किंवा कुटुंबाच्या किंवा समूहाच्या वहिवाटीला असेल आणि त्यावरील अधिकार प्रत्यक्ष वहिवाटीच्या क्षेत्रापुरता असेल; परंतु कोणत्याही परिस्थितीत हे क्षेत्र ४ हेक्टरापेक्षा जास्त असणार नाही.

७) वन अधिकार या कायद्यात नमूद केलेल्या शर्ती सोडून इतर सर्व शर्ती व बोजांपासून मुक्त असे बहाल केले जातील ज्यात वनसंवर्धन कायदा १९८० नुसारचा परवाना, चालू भावाने किंमत अदा करणे, भरपाई वनीकरण करणे याही अटींचा समावेश आहे.

८) वनांत राहणाऱ्या अनुसूचित जमाती व परंपरागत जंगलवासी मधील जे असे प्रस्थापित करु शकतील की पर्यायी जमीन भरपाई न मिळता शासकिय विकासकामाच्या हस्तक्षेपामुळे ते आपल्या निवासस्थानातून व फसवणूकीपासून विस्थापित झाले आणि सदर संपादित केलेली जमिन संपदनापासून ५ वर्षांच्या कालावधीत ज्या कामासाठी संपादित केली त्यासाठी वापरली नाही. अशांच्या जमीन मिळण्याच्या अधिकाराचा या कायद्याने मान्यता दिलेल्या व सुपूर्द केलेल्या वन अधिकारात समावेश असेल.

**५. वनअधिकार धारण करणाऱ्यांची कर्तव्ये.**

कोणत्याही वन अधिकाराचे धारक आणि ज्या क्षेत्रात असे धारक आहेत तेथील ग्रामसभा व गांवपातळीवरील संस्था यांना खालील अधिकार आहेत.

ए) वन्यजीव, वने आणि जैव विविधतेचे रक्षण करणे.

बी) नजिकची पाणीसाठा क्षेत्रे, पाण्याचे स्त्रोत आणि पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राचे पुरेसे संरक्षण होत आहे याची दक्षता घेणे.

सी) त्यांच्या सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसाला धक्का पोचवणाऱ्या विध्वंसक प्रथांपासून वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत जंगलवासींच्या वसतिस्थानांचे रक्षण होईल याची खबरदारी घेणे.

# प्रकरण ४

## वन अधिकार सुपूर्द करणारी प्राधिकरणे आणि प्रक्रिया

### ६. वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत जंगलवासींचे वन अधिकार त्यांना सुपूर्द करण्यासाठी प्राधिकरणे व कार्यपध्दती

१) या कायद्याखाली वनांत राहणाऱ्या अनुसूचित जमाती आणि अन्य परंपरागत जंगलवासी यांना देता येतील अशा व्यक्तिगत किंवा सामुदायिक किंवा दोन्ही प्रकारच्या वन अधिकारांचे स्वरुप व व्याप्ती ठरवण्याची प्रक्रिया सुरु करण्यासाठी तिच्या स्थानिक अधिकार क्षेत्रात ग्रामसभा प्राधिकरण म्हणून काम

पाहील. हे अधिकार कार्यान्वित करण्यासाठी ठरवून दिलेल्या पध्दतीने, ग्रामसभा दावे स्वीकारुन, ते एकत्र करुन, तपासून आणि शिफारस केलेल्या प्रत्येक दाव्यातील क्षेत्राच्या सीमा दर्शवणारा नकाशा तयार करुन त्यासंबंधीचा एक ठराव संमत करेल व त्यानंतर त्याची एक प्रत उपविभागीय स्तरीय समितीकडे सादर करेल.

२) ग्रामसभेच्या ठरावामुळे दुखावलेल्या कोणत्याही व्यक्तीला पोटकलम (३) अन्वये गठीत केलेल्या उपविभाग स्तरीय समितीकडे विनंती अर्ज करता येईल. ही समिती या अर्जाचा विचार करुन तो निकाली काढील.

परंतु ग्रामसभे ठराव केलेल्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत असा विनंती अर्ज केला पाहिजे.

तसेच बाधित व्यक्तिला त्याची बाजू मांडण्याची योग्य ती संधी दिल्याशिवाय असा कोणताही विनंती अर्ज त्याच्या विरुद्ध निकाली काढला जाणार नाही.

३) ग्रामसभेने संमत केलेले ठराव तपासण्यासाठी राज्य सरकार उपविभाग स्तरावरील समितीचे गठन करेल. ही समिती वन अधिकारांच्या नोंदी तयार करुन त्या उपविभागीय अधिकाऱ्यामार्फत जिल्हास्तरीय समितीकडे अंतिम निर्णय करण्यासाठी सादर करेल.

४) उपविभाग स्तरीय समितीने दिलेल्या निर्णयामुळे दुखावलेल्या (बाधित) व्यक्तिला अशा निर्णयाच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत जिल्हा स्तरीय समितीकडे विनंती अर्ज करता येईल. जिल्हा स्तरीय समिती या अर्जाचा विचार करून तो निकाली काढेल.

परंतु ग्रामसभेने केलेल्या ठरावाविरुद्धभेट जिल्हा स्तरीय. समितीकडे कोणालाही विनंती अर्ज देता येणार नाही उपविभाग स्तरीय समितीकडे अर्ज देऊन निर्णय झाल्यानंतरच जिल्हा स्तरीय समितीकडे अर्ज करता येईल.

तसेच बाधित व्यक्तिला त्याची बाजू मांडण्याची योग्य ती संधी दिल्याशिवाय असा कोणताही विनंती अर्ज त्याच्या विरुद्ध निकाली काढला जाणार नाही.

५) उपविभाग स्तरीय समितीने तयार केलेल्या वन अधिकारांच्या नोंदी तपासून त्यांना अंतिम मान्यता देण्यासाठी राज्य शासन जिल्हास्तरीय समितीचे गठन करेल.

६) वन अधिकारांच्या नोंदीबाबतचा जिल्हास्तरीय समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

७) वन अधिकार मान्य करणे आणि ते सुपूर्द करणे या प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी, त्याचप्रमाणे नोडल एजन्सी कडून मागितले गेलेले माहितीचे कागदपत्र व अहवाल सादर करण्यासाठी राज्य शासन एका राज्यस्तरीय देखरेख समितीची रचना करेल.

८) उपविभाग स्तरीय समिती, जिल्हा स्तरीय समिती आणि राज्य स्तरीय देखरेख समितीवर प्रत्येकी राज्य सरकारच्या महसूल, वन व आदिवासी व्यवहार खात्याचे अधिकारी आणि त्या-त्या स्तरावरील पंचायत राज्य संस्थांनी योग्य त्या स्तरावर नेमलेले तीन सदस्य राहतील. त्यापैकी दोन सदस्य अनुसूचित जमातींपैकी असतील व किमान एक महिला सदस्य असेल.

९) उपविभाग स्तरीय समिती, जिल्हा स्तरीय समिती आणि राज्य स्तरीय देखरेख समिती यांची रचना, कामे आणि ही कामे पार पाडण्यासाठी त्यांनी अनुसरण्याची कार्यपद्धती ही नेमून दिल्याप्रमाणे असेल.

# प्रकरण ५

## अपराध व दंड

### ७. प्राधिकरणांच्या किंवा समित्यांच्या सदस्यांनी किंवा अधिकाऱ्यांनी या कायद्याखाली केलेले अपराध.

जेव्हा कोणतेही प्राधिकरण किंवा समिती किंवा अधिकारी किंवा प्राधिकरणाचा सदस्य या कायद्याच्या कोणत्याही तरतुदीच्या किंवा त्या खालील कोणत्याही नियमांच्या विरुद्ध वर्तन करील त्याला या कायद्याखाली गुन्हेगार गृहित धरले जाईल आणि त्यांचे विरुद्ध कारवाई व १ हजार रुपये पर्यंत दंडास तो पात्र ठरेल.

मात्र जर असा प्राधिकरणाचा अथवा समितीचा सदस्य किंवा खात्याचा प्रमुख किंवा इतर कोणीही व्यक्ती हे सिध्द करु शकली की गुन्हा त्याच्या माहिती शिवाय घडलेला आहे किंवा गुन्हा टाळण्यासाठी त्याने पूर्ण काळजी घेतलेली आहे तर त्या व्यक्तीस उपरोक्त कलमांमधील कोणतीही कारवाई लागू होणार नाही.

### ८. अपराधांची दखल

गामसभेच्या एखाद्या ठरावासंदर्भात वनांत राहणाऱ्या अनुसूचित जमातींनी किंवा कोणत्याही वरिष्ठ प्राधिकाऱ्याविरुद्ध ठरावाद्वारे ग्रामसभेने, राज्यस्तरीय देखरेख समितीला ६० दिवसांपेक्षा कमी नसेल अशा कालावधीची नोटीस दिली असेल व राज्यस्तरीय देखरेख समितीने अशा प्राधिकाऱ्याविरुद्ध कारवाई केली नसेल अशा परिस्थिती शिवाय कोणतेही न्यायालय या कायद्याच्या कलम ७ खालील गुन्हाची दखल घेणार नाही.

# प्रकरण ६

## संकीर्ण बाबी

### ९) प्राधिकरणाचे सदस्य सार्वजनिक सेवक असणे.

चौथ्या प्रकरणामध्ये उल्लेखिलेल्या प्राधिकरणाचा प्रत्येक सदस्य आणि या कायद्यानुसार अधिकार देण्यात आलेला कोणताही अधिकारी भारतीय दंड संहितेच्या कलम २१ नुसार सार्वजनिक सेवक मानला जाईल.

### १०) सदभावनेचे केलेल्या कृतीला संरक्षण

१) कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा केंद्र वा राज्य सरकारच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने या कायद्यानुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करायचे ठरवलेल्या कोणत्याही कृती करता त्याचेवर दावा, फिर्याद अथवा कायदेशीर प्रक्रिया चालवता येणार नाही.

२) या कायद्यान्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करायचे ठरवलेल्या कोणत्याही कृतीमुळे झालेल्या वा होऊ घातलेल्या नुकसानीसाठी राज्य वा केंद्र सरकार अथवा त्यांच्या कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यावर दावा, फिर्याद किंवा कायदेशीर प्रक्रिया चालवता येणार नाही.

३) चौथ्या प्रकरणामध्ये उल्लेखलेल्या कोणत्याही प्राधिकरणांच्या अध्यक्ष, सदस्य, सचिव, अधिकारी वा अन्य कर्मचारी यांनी या कायद्यानुसार सद्भावनेने केलेल्या कोणत्याही कृत्यासाठी त्यांच्यावर दावा अथवा कायदेशीर प्रक्रिया चालवता येणार नाही.

### ११. नोडल एजन्सी

या कायद्याखालील तरतुदींच्या अंमलबजावणी करिता केंद्र सरकारचे आदिवासी व्यवहार मंत्रालय किंवा केंद्र सरकारने त्यांच्या वतीने नेमलेला एखादा अधिकारी वा प्राधिकरण हे नोडल एजन्सी म्हणून काम पाहील.

### १२. केंद्र सरकारचा निर्देश देण्याचा अधिकार

चौथ्या प्रकरणात उल्लेख केलेले प्रत्येक प्राधिकरण जे या कायद्यांतर्गत आपले कर्तव्य बजावते वा अधिकारांचा अंमल करते ते केंद्र सरकारने दिलेल्या सर्वसाधारण वा विशिष्ट लेखी निर्देशांच्या अधीन राहील.

**१३. हा कायदा अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतूदी हिरावून घेत नाही.**

या कायद्यात किंवा पंचायती (अनुसूची क्षेत्रांसाठी विस्तारीत) अधिनियम १९९६ मध्ये तशी यापेक्षा वेगळी तरतूद केलेली असेल तर ती सोडून या कायद्यातील तरतुदी अन्य प्रचलित कायद्यांमधील तरतुदी हिरावून न घेता त्यात भर टाकणाऱ्या असतील.

**१४. नियम बनवण्याचा अधिकार**

१) या कायद्यातील तरतुदी अंमलात आणण्याकरीता केंद्र शासन सरकारी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि यापूर्वीच्या प्रकाशनाच्या अधीन राहून नियम गठित करेल.

२) वरील सामान्य अधिकाराबाबत पूर्वग्रह न बाळगता विशेषत: निम्नलिखित सर्व किंवा कोणत्याही बाबींमध्ये नियम करता येतील.

ए) कलम ६ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीबद्दलचा तपशिल.

बी) वनांवरील अधिकार बजावण्यासाठी कलम ६ मधील पोटकलम १ नुसार दावे स्विकारणे, ते एकत्रित करुन तपासणे आणि प्रत्येक शिफारस प्राप्त दाव्यातील क्षेत्राच्या ० सीमा दर्शवणारा नकाशा तयार करणे यांबाबतची कार्यपध्दती तसेच त्या कलमातील पोटकलम २ नुसार उपविभाग स्तरीय समितीकडे विनंती अर्ज सादर करण्याची रीत.

सी) कलम ६ च्या पोटकलम ८ नुसार उपविभाग स्तरीय समिती, जिल्हा स्तरीय समिती आणि राज्य स्तरीय देखरेख समितीवर नेमणूक करायच्या राज्यशासनाच्या महसूल, वन व आदिवासी व्यवहार खात्याच्या अधिकाऱ्यांची श्रेणी.

डी) कलम ६ च्या पो• कलम १ नुसार उपविभाग स्तरीय समिती, जिल्हा स्तरीय समिती आणि राज्य स्तरीय समिती याची रचना, कामे व ही कामे पार पाडण्यासाठी त्यांनी अनुसरण्याची कार्यपध्दती.

ई) अन्य कोणत्याही आवश्यक बाबी नेमून दिल्या जातील.

३) केंद्र सरकारद्वारे या कायद्याखालील करण्यात आलेला प्रत्येक नियम केल्यानंतर लवकरात लवकर एक वा सलगची दोन किंवा जास्त सत्रे मिळून बनलेल्या एकूण ३० दिवसांच्या कालावधीसाठी लोकसभेच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडला जाईल. वर उल्लेख केलेल्या सत्रानंतरच्या लगेचच्या सत्राच्या समाप्तीपूर्वी जर दोन्ही सभागृहात त्या नियमात काही बदल करण्याबाबत किंवा तो न बनवण्याबाबत सहमती झाली तर त्यानंतर परिस्थितीप्रमाणे तो नियम एकतर सुधारीत रुपातच परिणामकारक राहील किंवा तो नियमच राहणार नाही. परंतु अशा सुधारणा करण्यापूर्वी किंवा नियम रद्द करण्यापूर्वी या नियमाखाली काही कारवाई केली असेल तर तिच्या वैधतेस यामुळे बाधा येणार नाही.

**के. एन. चतुर्वेदी**
भारत सरकारचे सचिवे
अनुवाद : इंदवी तुळपुळे

• • •

# जमातीतील जोडीदाराची निवड

प्रा. साधना बी. जावळे

विवाहसंस्था ही समाजातील एक महत्त्वपूर्व संस्था आहे. जगातील सर्वच समाजात ती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आढळते. सृष्टीचक्रात मानवी समाजाच्या अस्तित्त्वाबरोबरच विवाहसंस्था अस्तित्त्वात आली. विवाह संस्थेचा पूर्ण अभाव अशी परिस्थिती कोणत्याच समाजात आढळून येत नाही. भारतीय संस्कृतीत विवाहसंस्थेला अधिक महत्त्व दिले जाते.

के. एम. कापाडिया यांच्या मते 'धर्म, प्रजनन व कामतृप्ती ह्या उदिष्टांच्या पूर्तीसाठी धार्मिक विधी व सामाजिक प्रथा यांनी मान्य केलेला एक स्त्री व एक पुरूष यांच्या कायदेशीर संबंध म्हणजे विवाह होय.'

विवाह मुळे लैंगिक संबंध प्रस्थापित करण्याबरोबरच प्रजोत्पादन, संततीविषयक हक्क, कर्तव्य व त्याला समाज व कायद्याची मान्यता असणे गरजेचे आहे.

आदिवासी जमातीत व्यक्तीला आपला जोडीदार निवडताना स्वातंत्र्य दिले जात नाही. व्यक्तीने कोणत्या वयात, कोणत्या समूहातील व्यक्तीशी कोणत्या पद्धतीने विवाह करावा याबाबत अनेक बंधने प्रचलित आहे. व्यक्तीने केव्हा व कोणत्या समूहातील व्यक्तीशी विवाह करावा, याविषयी समाज जागृत असतो. जोडीदार निवडीच्या पद्धती त्या त्या समाजातील सामाजिक परिस्थितीला अनुसरून असतात. विवाह हा धार्मिक संस्कार नसून एक व्यावहारिक करार आदिवासी मानीत असल्याने त्यांच्या विवाह विधीत कोठेही धार्मिक क्रिया आढळत नाही. वधू संपादनाच्या विविध पद्धतींना समाजाची अनुमती असते. आदिम समाजातील विवाह संबंधात वैयक्तीक हितसंबंधापेक्षा कौटुंबिक हितसंबंध गुंतलेले असतात. सर्वसामान्यपणे भिन्न भिन्न आदिम समाजात जोडीदार निवडीचे दोन भागात वर्गीकरण केले जाते.

अ) **रूढ संप्रदायानुसार पद्धती** - या पद्धतीत वधू-पित्याच्या आर्थिक नुकसानीचा विचार केला जातो. ही नुकसान भरपाई कोणत्या पद्धतीने केली जाते, यावरुन विविध पद्धती स्पष्ट होतात. त्यात खालील सर्वसामान्य पद्धती आढळतात.

१) **क्रय विवाह** - वधू पित्याला योग्य ते वधू मूल्य देऊन वधू विकत घेतली जाते. ही पद्धत अत्यंत मानाची व प्रतिष्ठेची मानली जाते. वधूला विकत घेण्याचे वधूची किंमत किंवा मान कमी होतो असे न मानता वधूसाठी बहुमूल्य देणे ही तिची पात्रता व तिच्या अंगच्या गुणांची पावती मानली जाते.

२) **सेवा विवाह** - वधू-मूल्य देण्याइतकी परिस्थिती नसल्यास ते सेवारुपात देण्याचा प्रयत्न या प्रकारात केला जातो. ज्या जमातीत वधू-मूल्य जास्त असते, त्या जमातीतील तरुण वधू-पित्याच्या घरी राहून त्यांच्या घरची कामे वधू-पित्याच्या इच्छेप्रमाणे करतात. तरूणांच्या दृष्टीने हा मार्ग कष्टाचा असतो.

३) **विनिमय विवाह अगर साटेलोटे** - वधूमल्य देता येणे शक्य नसल्यास साटेलोटे हा विवाह प्रकार अस्तित्त्वात आला. एका कुटुंबातील बहीण-भाऊ दुसऱ्या कुटुंबातील बहीण भावाशी विवाहबद्ध होतात. या अदला- बदलीत कोणी कोणाला वधू-मूल्य देत नाही. काहीही खर्च न करता पत्नी मिळावी, त्याचे हे एक साधन आहे. कारण एका व्यक्तीच्या पत्नीच्या भाऊ त्याच्या बहिणीचा पती असतो.

ब) **रूढ संप्रदायाविरुद्ध विवाहपद्धती** - या पद्धतीचे स्वागत समाज करीत नाही. रूढ संप्रदायानुरूप नसतानाही तिकडे कानाडोळा करण्याची प्रवृत्ती समाजाची असते, म्हणून रूढ संप्रदायानुसार

नसलेल्या पद्धतीने वधू संपादन केल्यास वराला कोणतेही शासन होत नाही.

१) **अपहरण विवाह** - वर-वधूचे तिच्या मनाविरोधी जबरदस्ती अपहरण करीत असतो. यामध्ये वधू-पिता व प्रत्यक्ष वधूच्या इच्छेचा विचार केला जात नाही. त्यामुळे रूढीप्रमाणे वधू-पित्याला वधू-मूल्य दिले पहिजे. या रीतीचे पालन केले जात नाही.

२) **परीक्षा विवाह** - वधू मिळविण्याचा हा एक धैर्याचा मार्ग आहे. वराच्या शौर्य, धैर्य, गुण, पात्रता, पुरुषार्थ इत्यादी गुणांची ही कसोटी असते. वराच्या गुणांची कसोटी घेतल्याविना त्यांचा विवाह होणे शक्य नसते. आदिम जमातीत द्याव्या लागणाऱ्या कसोट्या एकाच प्रकारच्या नसत. त्यातून वराच्या गुणांची परीक्षा केली जात असे.

३) **सहपलायन** - तरूण तरू‍णी समाजाचे कोणतेही बंधन न मानता परस्पर संमतीने विवाहबद्ध होतात. त्यांच्या कुटुबियांना हा विवाह पसंत नसतो. तेव्हा कोणत्याही बंधनाचा मुलाहिजा न ठेवता कुटुंबियांच्या मनाविरूद्ध दूर पळून जाऊन तरूण-तरूणी एकमेकांशी विवाहबद्ध होतात. यालाच सहपलायन बिवाह म्हणतात.

४) **हठागमन विवाह** - यात स्त्री स्वत: पुढाकार घेऊन मनाने वरलेल्या पुरुषाला हटाने पती म्हणून मिळविते. मुलीला आवडलेल्या तरूण तिच्याशी विवाह करण्यास राजी नसतो. त्याच तरूणाशी लग्न करायचे या निश्चयाने ती त्याच्या घरी आगांतूकपणे घुसते व इतर कुटुंबियाप्रमाणे प्रियकराच्या घरात वावरते. तिचा आगंतूकपणा घरात कोणालाही मंजूर नसतो. तिला दिली जाणारी वागणूक अत्यंत अपमानाची असते. सुरूवातीला गोडीगुलाबाने तिची समजूत काढून तिचे मन बदलविण्याचा प्रयत्न करतात. त्याचा उपयोग न झाल्यास दंडाचा वापर करून मारहाण केली जाते. व अपमानास्पद वागणुकीचा अर्थ तिने कंटाळून निघून जावे असा असतो. पण ती आपला निश्चय बदलत नाही व शेवटी प्रियकराला तिचा पत्नी म्हणून स्वीकार करावा लागतो.

५) **पारस्परिक संमती विवाह** - हा एक प्रीतिविवाहाचा प्रकार आहे. या विवाहात वधू-वर बयाने मोठे असतात. आदिम जमातीत बालविवाहाची प्रथा नसल्याने या विवाहाची शक्यता अधिक असते. तरूण-तरूणींचे एकत्रित येणे व मुक्तपणे वावरणे हे आदिम जमातीन मंजूर असल्याने त्यांच्यात प्रेमभावना निर्माण होते.

**भिल्ल**

सातपुडा प्रदेश हा भिल्लांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. गुजरात आणि मध्यप्रदेशातील पर्वतरांगांचा भाग सोडला तर सातपुडा पर्वताच्या रांगा महाराष्ट्रात अमरावती, धुळे, जळगाव आणि औरंगाबाद जिल्ह्यात पसरलेल्या आहेत.

चालीरीतीनुसार भिल्लांमध्ये बहुपत्नीत्त्वाची व प्रौढ विवाहाची पद्धती रूढ आहे. विधवा विवाह देखील होतात. वधू-वरांचे विवाह वडीलधाऱ्या मंडळीच्या सल्ल्याने होतात. विवाहाच्या वेळी नृत्यगायन, आनंदोत्सव साजरा केला जातो. भिल्लांमध्ये विवाहाच्या वेळी वर पित्यास वधुपित्याला काही रक्कम द्यावी लागते. त्याला 'देज' म्हणतात. काही थोड्या फार सुधारलेल्या भिल्लांमध्ये वधूपित्यास वरपक्षाकडून हुंडा म्हणून रक्कम द्यावी लागते. सर्वसाधारणपणे भिल्लांमध्ये आईवडील व पंच यांच्या उपस्थितीत प्रथेनुसार विवाह करण्याचे ठरविले जाते. पुरोहिताकडून विवाह विधी काढून समारंभ निश्चित होतो. हुंडा देखील या बैठकीत ठरविला जातो.

याशिवाय अविवाहित मुलगा मुलीस पळवून नेतो. हे मुलीच्या बापास समजल्यावर तो आपल्या बरोबरीच्या पंचांना घेऊन वरपित्याकडे जातो. यावेळी पळून गेलेल्या मुला मुलींच्या विवाहाबाबतची चर्चा होते आणि मुलीसाठी घ्यावयाचा पैसा निश्चित होत असतो व ठरलेली रक्कम देऊन विवाह होतो. ही रक्कम देण्याची वरपक्षाची कुवत नसेल,

पैशाच्या मोबदल्यात मुलीच्या बापाची नोकरी नवरा मुलगा करतो. या प्रथेस 'खंडालियो' म्हणून ओळखले जाते.

याशिवाय मुलगा-मुलगी यांनी विवाह करायचे ठरविल्यास, पालकांच्या संमतीने त्यांना विवाह करता येतो. एखाद्या विवाहीत मुलीस दुसरा मुलगा पसंत असल्यास ती जबरदस्ती त्या मुलाच्या घरात राहते. तिला 'घरघुशी' म्हटले जाते. मुलाच्या कुटुंबियांकडून तिला विरोध होतो. यावेळी तिच्या वागण्यातून ती या कुटुंबियांची मने जिंकून त्यांना स्वीकार करण्यास भाग पाडते. प्रथम पतीला नवीन प्रियकराकडून द्याव्या लागणाऱ्या रकमेस 'झगडा' म्हटले जाते.

भिल्ल समाजात नवरा मुलगा-मुलीला यात्रेत किंवा बाजारात पाहतो व लग्नाची मागणी घालतो. मागणीप्रमाणे लग्न जमले नाहीतर मुलगा मुलीला तिच्या संमतीने पळवून नेतो. मुलीकडून दहेज न घेता मुलाकडूनच मुलीला दहेज दिले जाते. याप्रमाणे महाराष्ट्रातील अनेक जमातीत जोडीदार निवडीच्या वेगवेगळ्या पद्धती प्रचलित आहेत.

**संदर्भ ग्रंथ -**


१) कपादिया के. एम. - मॅरेज अँड फॅमिली इन इंडिया, १९६६ ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, कलकत्ता.

२) पी. के. कुलकर्णी, गंदेवार - संस्थांचे समाजशास्त्र

३) महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर जळगाव जिल्हा


● ● ●

---

(पृष्ठ २२ वरुन पुढे)

विकासाच्या प्रक्रियेत हे जे प्रश्न तयार होतात त्यांची उत्तरे केवळ पैशाच्या किंवा तंत्रज्ञानाच्या भाषेत देता येत नाहीत. कारण हे नैतिक प्रश्न असतात. नैतिक सोडवण्याच्या पद्धतीलाच नीती असे म्हणतात. नैतिक प्रश्नांपासून आपली सुटका नाही, कारण मानवी समाजाची उभारणीच नीतीतत्त्वांवर झाली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानसुद्धा नीतीपासून मुक्त नाही. तसे ते आहे असे समजले तर मग आपण 'क्लोनिंग' करू देणार का हा प्रश्न फणा काढून समोर येतो.

माणसाने निसर्गाशी कसं वागायचं हा एक महत्त्वाचा नैतिक प्रश्न आहे. तसेच माणसाने माणसाशी कसं वागायचं हाही एक नैतिक प्रश्न आहे. शेती ही एकमेव अशी व्यवस्था आहे की जिथे हे दोन्ही प्रश्न एकाचवेळी समोर येतात. आणि शेती हीच अशी प्रक्रिया आहे की जिच्यातून ह्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे मिळण्याची शक्यता असते. तशी उत्तरे प्रत्येकाला मिळणे ही विकासाची प्रक्रिया आहे. हा विकास शोषणमुक्त, दारिद्र्यरहित आणि अहिंसक पद्धतीने करणे ह्याला नीती असे म्हणतात. शेतीची व्यवस्था उत्पादक आणि व्यवहार्य करणे, तिच्यातील विषमता हटवून दारिद्र्य दूर करणे आणि निसर्गाशी समतोल राखून तिला संपन्न बनवणे हीच ग्रामीण विकासनीती. काही वर्षांनी ग्रामीण आणि शहरी असा भेद विरून जाईल तेव्हा तीच माणसाची विकासनीती असेल.

● ● ●

१९८० - १. जबरन जोत जंगल जमीन
२. आदिवासी व शिक्षण
३. आदिवासी वनसंवर्धन
४. आदिवासी साहित्य व कला
१९८१ - १. दलितांना सवलती व राखीव जागा
२. आदिवासी व आरोग्य
३. वनशेती व संवर्धन
४. रोजगार हमी योजना
१९८२ - १. धरणे व विकास
२. धरणे व विकास
३-४. जंगल व्यवस्थापन
१९८३ - १. आदिवासी व दारु
२. आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
३. प्रा. सरदार गौरव अंक
४. आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
१९८४ - १-२ आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
३. आदिवासी स्त्री
४. आदिवासी आरोग्य व शिक्षण
१९८५ - १. आदिवासी संघटन
२. जमीन हस्तांतर
३. आदिवासी महिला
४. आदिवासी व सरकार
१९८६ - १. जंगल व धरण
२. आदिवासी कला
३. आदिवासी व वेठबिगारी
४. आदिवासी विषयक ग्रंथ : मानवशास्त्र परिचय
१९८७ - १. भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
२. आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
३-४. राष्ट्रीय वननितीचा प्रश्न
१९८८ - १. सवलती अपहरणाची समस्या
२. आदिवासी साहित्य
३.-४. आदिवासी समाज व संस्कृती
१९८९ - १-२. डॉ. वेरिअर एल्विन विशेषांक
३-४. व्यवसाय मार्गदर्शन
१९९० - १-२. १महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
३. जागतिक अदिवासी
४. गं. बा. सरदार स्मृति विशेषांक
१९९१ - १. आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
२. आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
३. आदिवासी जीवन व संस्कृती
१९९२ - १-२. आदिवासी समाज जीवन
३-४. अनुताई वाघ विशेषांक
१९९३ - १-२. आदिवासी धर्म, सण व उत्सव
३-४. धरण - विस्थापन व पुनर्वसन
१९९४ - १. आदिवासी संस्कृती
२. आदिवासी एकता परिषद
३. आदिवासी विकासाची सैध्दांतिक भुमिका
४. आदिवासी जमाती
१९९५ - १-२. राणीपूर अभ्यास विशेषांक
३. कुपोषण विशेषांक
४. पर्यावरण विशेषांक
१९९६ - १. आदिवासी जमाती
२. महाराष्ट्र, ओरिसा अदिवासी अध्ययन
३. आदिवासी जमाती
४. आदिवासी शिक्षण
१९९७ - १-२. वारली लोकगिते व बोलीभाषा
३. पंचायत राज विशेषांक
४. साहित्य संमेलन विशेषांक
१९९८ - १. वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
२. आदिवासी व प्रशासन
३-४. आदिवासी समाज व संस्कृती
१९९९ - १. आदिवासी व आर्थिक धोरण
२. आदिवासी विकास व संस्कृती
३-४. बोर्डी परिसर अभ्यास
२००० - १. आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
२. स्त्रिया आणि आरोग्य
३. पाणी टंचाई आणि पाणलोट विकास
४. आदिवासी जीवन व संस्कृती
२००१ - १-२. अस्मिता व विकास विशेषांक
३. आदिवासी समाज व शासन
४. अस्मिता व विकास : दिशा २००१
२००२ - १. अदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास
२-३. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : महाराष्ट्र
४. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : पर्यायी उपाययोजना
२००३ - १-२. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : मध्यप्रदेश
३. आदिवासी समाज
४. आदिवासी संस्कृती
२००४ - १. पुस्तक परिचय
२. आदिवासी समाज व संस्कृती
३-४. आदिवासी विकास धोरण
२००५ - १. प्रस्तावित वनकायदा
२. डॉ. बानू कोयाजी स्मृती विशेषांक
३-४. आरोग्य व शिक्षण - नंदूरबार अभ्यास विशेषांक
२००६ - १-२. डॉ. इरावती कर्वे स्मृति विशेषांक
३-४. आदिवासी अस्मिता व साहित्य कला
२००७ - १-२ संस्कृती व समाज - आदिवासी पायाभूत सर्वेक्षण विशेषांक
३-४ आरोग्य- आदिवासी पायाभूत सर्वेक्षण विशेषांक
२००८- २. स्वयंसेवी संस्था व आदिवासी विकास
३-४. डॉ..राज आरोळे गौरव विशेषांक
२००९- १. जव्हारचे आदिवासी जीवन व संस्कृती

Registered with the Registrar of Newspaper of India under No. 35835/80

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस - मास)

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना १९७६ साली पुणे विद्यापीठात झाली. शासन, सामाजिक कार्यकर्तेव संशोधक यांना एका व्यासपीठावर आणून आदिवासी ग्रामीण तसेच शहरी समाजातील लोकांच्या समस्या समजावून त्या सोडविण्यासाठी ज्ञान व अनुभवाचा उपयोग करणे हे परिषदेचे मुख्य ध्येय आहे. आदिवासी भागात काम करणारे कार्यकर्ते तसेच आदिवासी साहित्यिक यांना महाराष्ट्रात प्रथमच परिषदेचे एका व्यासपीठावर आणले.

केवळ आदिवासींच्या प्रश्नांना वाहिलेले हाकारा त्रैमासिक गेली २५ वर्षेपरिषदेतर्फे प्रकाशित होत आहे. लोकांच्या समस्या त्यांच्या नजरेतून समजून, त्यांचा सहभागातून एकात्मिक विकास साधण्याची परिषदेची वैचारिक बैठक आहे. आर्थिक विकास व समता हे परिषदेचे ब्रीद आहे.

यापुढील काळामध्ये आर्थिक परिवर्तनाद्वारे सामाजिक क्षेत्रांचा विकास घडवून आणणाऱ्या सरकारी व स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने वाटचाल करण्याचा परिषदेचा मानस आहे. परिषदेची कार्यकक्षा अधिक विस्तृत व्हावी या हेतूने दोन केंद्रांची स्थापना केली आहे.

१. स्वास्थ व विकास संशोधन केंद्र      २. आदिवासी व ग्रामीण विकास केंद्र

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व**

हाकारा वार्षिक सभासद १०० रुपये (व्यक्तींसाठी)      हाकारा वार्षिक सभासद १५० रुपये (संस्थासाठी)

परिषद आजीव सभासद १००० रुपये (व्यक्तींसाठी)

परिषदेच्या आजीव सभासदांना हाकारा विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक / आजीव वर्गणी कृपया खालील पत्त्यावर महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनिऑर्डर पाठवावी. मनिऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

